किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434- Licence No. 53.
Licensed to post without prepayment

नोव्हेंबर १९६१

# अर्थ

दिवाळी विशेषांक



## सगळ्या उत्सव प्रसंगीं

दिवाळी, विवाह, वाढदिवस वगैरेसारख्या मंगल प्रसंगी आपण आपल्या इष्टमित्रांना भेटी देतां ना! या भेटी तुम्ही पोस्ट ऑफीस बचत देणगी कूपनांच्या रुपानें कां देत नाही! प्रत्येक वेळेला वृद्धिंगत होणारा हा देणगीचा प्रकार आहे. त्याचप्रमाणें तुमची आठवणहि दीर्घकाल टिकवून ठेवण्याचें कार्य त्यामुळें होतें.

रु. ५, १०, ५०, १०० आणि १००० अशा दर्शनी किंमतीचीं हीं कूपनें पोस्टांत मिळतात. या कूपनांबद्दल नंतर १२ वर्षांची राष्ट्रीय योजना बचत सर्टिफिकेटें मिळूं शकतात.

भेट म्हणून तुम्हीं बक्षीस-रोखेंहि देऊं शकतां




## बचत योजनेमुळें
## सर्व उत्सवप्रसंग अधिक आनंददायी होतात

महाराष्ट्र सरकारच्या अल्पबचत संचालनालयातर्फे प्रकाशित

ही दीपावलि आमचे ग्राहकांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीची जावो !

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी – पुणें

| मांडवल | | रुपये |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : | ३८,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | : | १७,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | १९,००,००,००० चे वर |

**महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश**
**यांत बँकेच्या एकूण ७१ शाखा**

★ अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात.

★ तीन व पांच वर्षें मुदतीचीं रु. १००, रु. ५०० व रु. १,००० चीं कॅश सर्टिफिकेट्स् मिळतात.

★ योग्य तारणावर कर्जें, कॅश क्रेडिट, हुंडी खरेदी, वगैरे व्यवहार केला जातो.

★ सरकारी कर्जरोखे, शेअर्स, वगैरेंची खरेदी-विक्री केली जाते.

★ रक्षागृहांची सोय मुख्य कचेरीचे ठिकाणीं व इतर १५ शाखांचे ठिकाणीं आहे.

★ स्टर्लिंग व डॉलर चलनांतील प्रवासी चेक मिळतात.

★ परदेशी हुंडणावळीच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांची सोय.

★ जगांतील सर्व प्रमुख शहरीं एजन्सीज.

★ बँकेची पोट कंपनी, विश्वस्तपत्र, व्यवस्थापत्र, वगैरेंचे विश्वस्त व एक्झिक्यूटर्स म्हणून काम करते.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

अधिक माहितीसाठीं लिहा अगर नजीकचे कचेरीस भेट द्या.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक

## लिमिटेड, सोलापूर

( स्थापना १९१८ )

पोस्ट बॉक्स नं. ३२
फोन नं. २११

तारेचा पत्ता—कृषी बँक
हेड ऑफिस : सोलापूर

शाखा:—पंढरपूर, कुर्डूवाडी, करमाळा, मंगळवेढा, अक्कलकोट, अकलूज, नातेपुतें, सिद्धार्थ ( सोलापूर ), वैराग, बार्शी व मंद्रूप

—[ पे ऑफिसः—मोहोळ, मोडलिंब, माढा, सांगोला. ]—

| | | |
|---|---|---|
| १. खपलेलें शेअर भांडवल | रु. | १६,३६,२३० |
| २. रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४,२८,८१४ |
| ३. सर्व प्रकारच्या ठेवी. | रु. | १,५६,४७,६२० |
| ४. एकूण खेळतें भांडवल | रु. | २,४८,१९,२०० |
| ५. सन १९६०-६१ चा नफा | रु. | १,८८,१२७ |

जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केन्द्रस्थान असलेल्या, व ठेवीदार व संबंधित गिऱ्हाइकांच्या विश्वासास पात्र झालेल्या व सतत ४३ वर्षे प्रगतिपथावर असलेल्या ह्या बँकेतून पुढील प्रकारचे व्यवहार केले जातात.

१. सर्व शेतकरीवर्गाला सोसायट्यांमार्फत अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जे दिलीं जातात.
२. सर्व शाखांमार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
३. सोलापूर येथील हेड ऑफिसमध्यें मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे.
४. ठेवीवरील व्याजाचे दर आकर्षक ठेवगेंत आले आहेत.
५ मोठ्या रकमा ठेवणारांनीं समक्ष ऑफिसांत येऊन चौकशी करावी. त्यांना सवलतीचा व्याजाचा दर दिला जातो.

के. के. परबत, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर

मच्छेन्द्र लक्ष्मण पाटील
चेअरमन



# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड

★ माळीनगर ★ जि. सोलापूर

साखर विचार—

## अन्न, स्वच्छ पाणी आणि सूर्यप्रकाश

यांची मानवी जीवन विकासास जितकी आवश्यकता आहे .... तितकीच ....

सहकार, सचोटी आणि श्रम यांची महाराष्ट्रांतील साखर धंद्याच्या विकासास

जोड मिळाल्यास....

## उंसाचा शेतकरी साखर कारखानदारी आदर्श बनवूं शकतो

हें स्वकर्तानें सिद्ध केल्यानंतर...

प्रत्येक व्यक्तीचे अंगीं या गुणांचा संचय व्हावा हीच आमची

## दिवाळी आणि नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा!

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर.

मुंबई ऑफिस :
सर विठ्ठलदास चेंबर्स,
१६ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५२५३४

रजिस्टर्ड ऑफिस :
माळीनगर, जि. सोलापूर.
टेलिफोन नं. २१

तारेचा पत्ता : 'माळीशुगर' माळीनगर व मुंबई.

बँक आपुली जिल्ह्याची । करील सोय पैशाची ॥
फुलविल कणसं मोत्याचीं । 'ठेव' ठेवा सर्वांची ॥

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.,

तार : कोडिको बँक] कोल्हापूर. [फोन २४२

हेड ऑफिस : शिवाजी रोड, कोल्हापूर

विश्वस्त ठेवी आणि म्युनिसिपालिटी व लोकल बोर्ड अशा निमसरकारी संस्थांच्या ठेवी स्वीकारणेस सरकारची मान्यता असलेली, तसेंच शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी झटणारी जिल्ह्यांतील एकमेव बँक.

या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतीस व सहकारी संस्थांना साह्यकारी आहे.

अधिकृत शेअर भांडवल :

रु. १,००,००,०००

खपलेलें शेअर भांडवल :

अ) शेअर होल्डर्सनीं घेतलेलें रु. ३५,४४,०००
ब) महाराष्ट्र सरकारनें घेतलेलें रु. १४,००,०००

एकूण रु. ४९,४४,०००

एकूण ठेवी रु. १,७३,१८,०००
खेळतें भांडवल रु. ४,७५,००,०००

या बँकेच्या जिल्ह्यांत १७ शाखा व १ पे-ऑफिस आहे. शाहुपुरी शाखेंत लॉकर्सची सोय आहे. शाहू मार्केट यार्ड येथें शाखा काढल्यामुळें त्या भागांतील लोकांची बँकेची सोय झाली आहे. आकर्षक व्याजाच्या दरानें मुदत बंद ठेवी स्वीकारण्यांत येतात.

चालू खातें १ टक्का, सेव्हिंग्ज ३ टक्के,
मुदत बंद ३½ ते ४½ टक्के,
कॉल डिपॉझिटस् ३½ ते ३¾ टक्के

कोल्हापूर, दि. १६-१०-६१ व्ही. बी. शिंदे, मॅनेजर.

# पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., जळगांव

[स्थापना १९१६]

मुख्य कचेरी : महात्मा गांधी पथ, जळगांव, पू. खा.
चेअरमन : श्री. जे. एस्. पाटील, बी. ए., एलएल. बी.
व्हाईस चेअरमन : श्री. सुपडू भादू पाटील.
शाखा : जिल्ह्यांत या बँकेच्या एकूण ४३ शाखा आहेत.
जिल्ह्यांतील कोणतेंहि महत्त्वाचें बाजारपेठेचें गांव शाखेविना नाहीं.

बँकेच्या कामकाजाबाबत बोलके आंकडे—

१. अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
२. खपलेलें भांडवल ... रु. ४१,४०,७००
३. गंगाजळी व इतर फंड ... रु. ३५,३९,१५४
४. एकूण ठेवी ... रु. ४,३२,७६,५७१
५. एकूण खेळतें भांडवल ... रु. ६,१२,८७,७७४
६. सहकारी संस्थांना ५९-६० सालीं दिलेलें कर्ज रु. ४,९१,९१,७८४

१. या बँकेंत गुंतवलेल्या पैशाचा उपयोग प्रामुख्येंकरून जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना शेतकी सहकारी संस्थांमार्फत शेतीच्या चालू लागवडीकरितां कर्जाऊ देण्याकरतांच केला जातो.
२. बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. १ ते १० वर्षे लांब मुदतीच्या ठेवीचाहि व्यवहार केला जातो.
३. जळगांव येथील मुख्य कचेरी, चोपडें, चाळीसगांव, जामनेर, पारोळें व यावल येथील शाखांतून माफक भाड्यांत सेल्फ डिपॉझिट सुरक्षित कप्पे लॉकर्स मिळण्याची सोय आहे.

आधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

पी. एल. सूर्यवंशी
शासनाधिकारी व कार्यसंचालक




बेडेकर लोणचीं आतां मेट्रिक वजनांत, मशिननें बसविलेल्या सीलबंद झांकणांच्या बाटल्यांतून मिळूं लागलीं आहेत. तसेंच सर्व प्रकारचे मसाले, पापड, तयार भजीपीठ, पोळीबरोबर खाण्यास मँगो चटणी आणि बेलफळ, आवळा, सफरचंद व आंबा हे मुरांबे नेहमीं तयार असतात.

# बेडेकर मसालेवाले मुगभाट, मुंबई ४

शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ

# अर्थ

## दिवाळी अंक

१ नोव्हेंबर, १९६१



स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस व वाचकांस सुखाचें जावो !**

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ मुळशी सत्याग्रह यशस्वी झाला असता, तर ! | ... | ६ | ११ निर्यातीची मोहीम यशस्वी कशी होईल ! | ... | २९ |
| २ भारताच्या वाढत्या लोकसंख्येचें आव्हान | ... | ९ | १२ सहकारी चळवळीचें वाढतें परावलंबित्व | ... | ३१ |
| ३ युरोपियन समाईक बाजारपेठ | ... | ११ | १३ इंडस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशन | ... | ३३ |
| ४ रशियाचा तिसरा प्रचंड कार्यक्रम | ... | १३ | १४ 'गोगटे माइन्स 'चें पुढें पाऊल | ... | ३५ |
| ५ अर्बन को. बँकांची पाहणी | ... | १७ | १५ सहकारी संस्थांच्या नोकरांची समस्या | ... | ३७ |
| ६ सहकारी चळवळीची संपत्ति-साधनें | ... | १९ | १६ नफ्याची कमाई, हाच उद्योगधंद्यांचा पाया | ... | ४१ |
| ७ महाराष्ट्र राज्यांतील बँकांचें विलिनीकरण | ... | २१ | १७ चलनाच्या किंमतीची घसरगुंडी | ... | ४२ |
| ८ पूरग्रस्त व्यापारी-कारखानदारांचें पुनर्वसन | ... | २३ | १८ साखरेच्या उत्पादनावर नियंत्रण | ... | ४३ |
| ९ आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून लोकांच्या अपेक्षा | ... | २५ | १९ अँग्लो इंडियन लोकांचें ब्रिटनला देशांतर | ... | ४४ |
| १० ब्रिटनमध्यें स्थायिक होणारे हिंदी नागरिक | ... | २७ | २० तुमचा बँकांवर विश्वास आहे की नाहीं ! | ... | ४५ |


**"अर्था"चा ह्यापुढील अंक एक सुटीनंतर दि. ६ डिसेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.**

★ आमचे ग्राहक व हितचिंतकांना नवीन वर्ष सुख-समृद्धीचें जावो ! ★

सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करीत असलेला—

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

तार :— SANCOSOP ]     १२५, भवानी पेठ, पुणें २.     [ फोन :— ३११५

आपल्यासाठी :—

(*) संस्थेनें साडेपांच लाख रुपये खर्च करून शेतीमधील नाशवंत मालासाठी अद्ययावत् शीतगृह विकत घेतलें आहे. त्या ठिकाणीं भाजीपाला, फळफळावळ, अंडीं, दुधाचे पदार्थ चांगल्या रीतीनें राहूं शकतात.

(*) भरघोस उत्पादनासाठी उत्कृष्ट खतांचा पुरवठा करीत आहे. तसेंच संघानें स्वतःचें मिश्रखत उसासाठी व भाजीपाल्यासाठी तयार केलेलें आहे.

(*) शेती मालाच्या किफायतशीर विक्रीसाठी हुकमी गिऱ्हाईक मिळविण्याची व्यवस्था केली आहे.

(*) शेतकऱ्यांना लागणारीं खतें, बीं-बियाणें, अवजारें, लोखंड, सिमेन्ट, पत्रा, वगैरे माल नियंत्रित दरांत पुरविण्याची व्यवस्था संघामार्फत होत असते.

(*) उत्तम प्रकारचा आंबेगांवचा निर्भेळ आंबेमोहोर तांदूळ ४० किलोच्या पिशव्यांमध्यें विक्रीस ठेवला आहे.

(*) खात्रीचे स्नो-बॉल कॉली-फ्लॉवरचें बीं परदेशांतून मागवून विक्रीसाठी ठेवलें आहे.

**संस्थेचें खेळतें भांडवल : रु. ६५,७५,०००।— ★ व्यापार २ कोटींचे वर ★**

मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख, अध्यक्ष. बबुराव बळवंतराव घुमाळ, उपाध्यक्ष.

श्री. म. उपळेकर, एम्. ए., एलएल्. बी., कार्यकारी संचालक. सं. सा. काकडे, बी. ए., एलएल्. बी. व्यवस्थापक.

# मुळशी सत्याग्रह यशस्वी झाला असता, तर ?

## बदलत चाललेला आर्थिक दृष्टिकोन

पानशेत आणि खडकवासला धरणें फुटून हाहाकार उडाला आणि धरणाखालील खेडीं आणि पुणें शहर ह्यांतील जीवित आणि घरें ह्यांचें फार नुकसान झालें; उपजीविकेचीं साधनें नष्ट झालीं. पुण्याला पाणीपुरवठा करणारें खडकवासला धरण रितें झाल्यामुळें नागरिकांचे हाल सुरू झाले; नवें धरण बांधून पुरें होईपर्यंत टाटांनीं आपल्या मुळशी धरणांतलें पाणी देऊं केल्यामुळें पुण्याच्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मावळांतील हें धरण बांधण्याविरुद्ध ४० वर्षांपूर्वी जो सत्याग्रह करण्यांत आला, तो जर यशस्वी झाला असता तर पुणें शहर खाली करण्यावांचून गत्यंतर उरलें नसतें आणि शहराच्या आसपासचे नवे कारखाने पाण्याच्या अभावीं बंद पडून राष्ट्रीय आपत्ति ओढवली असती.

टाटांच्या धरणांत सांठवलेल्या पाण्यानें महाराष्ट्रांत प्रचंड स्वरूपांत वीज निर्माण करण्यांत येत आहे; खोपोली, भिवपुरी आणि भिरा येथील पॉवर–स्टेशन्समध्यें एकूण २,७४,००० कि. वॅ. वीज तयार होते. मुंबई–पुण्याच्या विभागांत ह्या विजेनेंच लहान-मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ केली आहे, आणि कोयना योजनेची कल्पना ह्यामुळेंच वाढीस लागून मूर्त स्वरूप धारण करीत आहे. स्वस्त आणि मुबलक वीजपुरवठ्यासाठी उंच जागीं धरणें बांधणें आवश्यकच असतें; औद्योगिक उपक्रमांस अशा शक्तीची फारच गरज असते. खेडेगांवीं छोटे उद्योगधंदेहि विजेवर चालावेत, असें आपलें स्वप्न आहे.

सुमारें ४० वर्षांपूर्वी टाटांच्या मुळशी धरणाला विरोध करणारांची भूमिका काय होती, हें लक्षांत घेणें उद्बोधक होईल. मोठ्या प्रमाणावरील औद्योगीकरणाची तेव्हां कित्येकांना भीति कां वाटत होती, भारत स्वतंत्र होऊन इंग्रजांवरील अवलंबन नष्ट होईल ह्याची कल्पनाहि कशी नव्हती, आर्थिक उत्कर्षापेक्षा परंपरागत कनिष्ठ जिण्याला प्राधान्य कसें दिलें गेलें, इत्यादि गोष्टींचा त्यामुळें खुलासा होईल. तारतम्यासाठी सुप्रसिद्ध असलेली पुढारी मंडळीहि ह्या सत्याग्रहांत सामील झाली होती. आर्थिक आणि औद्योगिक दृष्टिकोणाच्या इतिहासाचे दृष्टीनें त्यांची विचारसरणी उद्बोधक आहे. स्वतंत्र भारतांतील औद्योगीकरणाच्या प्रश्नांचा विचार करतांनाहि त्याचा उपयोग होईल.

### मुळशी सत्याग्रहींची विचारसरणी

"मुळशी पेट्यांतील धरण पुरें झाल्यास सुमारें ४४ गांवें बुडतील. लँड ॲक्विझिशन ॲक्ट आणि कॉंपेन्सेशन या दोन शस्त्रांच्या आधारावर सरकार व कंपनीचे चालक भिस्त ठेवून मुळशी पेट्यांत जलप्रलय करण्यास व तेथील लोकांना देशोधडीस लावण्यास तयार झाले आहेत. या दृष्टीनें मुळशी पेट्यांत उपस्थित झालेला प्रश्न स्थानिक अगर प्रांतिक नसून तो सार्वजनिक अगर राष्ट्रीय स्वरूपाचा आहे. एखादें धरण किंवा कारखाना बांधण्यासाठी प्रथम पांच गांव, नंतर पंचवीस गांव आणि शेवटीं चाळीस–पन्नास गांव बुडविणें कंपनीस आवश्यक दिसलें, आणि ही आवश्यकता भासतांच जर कंपनी व सरकार कायद्याच्या व पैशाच्या जोरावर त्याप्रमाणें घडवून आणूं शकत असेल, तर हिंदुस्थानांत सामान्य माणसाचें जीवित व जमीनजुमला केव्हांहि सुरक्षित नाहीं, असें म्हणावें लागेल. कारण, आज जो कायदा मुळशी पेट्यांत जलप्रलय करूं शकतो, तोच कायदा उद्यां पुण्यासारखीं शहरें अगर पवित्र देवालयें यांचा वाटेल तेव्हां विध्वंस करूं शकेल. या आसुरी तत्त्वाचा मोड प्रारंभींच खुडून टाकणें प्राप्त आहे.

"शेतकऱ्यांना मजूर बनविण्यांत सरकारचें काय धोरण आहे, हें समजणें कठीण आहे. पण ह्या धोरणाचे परिणाम सर्वस्वीं अनिष्ट होतील, हें खास. जगभर बेबंदशाही व अराजक माजलें असून आमच्या देशांत शांतता नांदत आहे ह्याचें मुख्य कारण आमचा बहुजनसमाज दरिद्री असला तरी तो स्वतःच्या घरांत राहणारा व स्वतःच्या शेतांत राबणारा आहे. या दोन गोष्टींस तो मुकला, म्हणजे त्याला युरोपांतील मजुरांप्रमाणें शहरांत राहून सोशालिझमच्या व बोल्शेविझमच्या कल्पनांमागें धाव घेणें भाग पडेल. युरोपांत तरी हेंच घडून आलें. प्रचंड कारखाने वाढून कष्टाळू शेतकऱ्यांचा वर्ग ठार झाला. त्याबरोबर, समाजांत मत्सराचें प्राबल्य वाढून "सर्व कारखाने राष्ट्रीय मालकीचे झाले पाहिजेत," "श्रीमान् व धनाढ्य लोक समाजाचे शत्रु आहेत, त्यांची सरसहा कत्तल केली पाहिजे", वगैरे मतें इंग्लंड, जर्मनी, रशिया, वगैरे देशांत रुजूं लागलीं. तोच अनुभव येथें येणार, अशीं लक्षणें दिसत आहेत. संप व मजूर वर्गाची दांडगाई यामुळें इंग्लंडमधील बऱ्याच भांडवलवाल्यांना इंग्लंडांत पैसा गुंतविण्यापेक्षा हिंदुस्थानांत तो पेरणें श्रेयस्कर वाटूं लागलें आहे. असें केल्यानें इंग्लंडांतील भांडवलास चांगलें सोईचें क्षेत्र मिळेल असा त्यांचा अंदाज आहे. त्यामुळें हिंदुस्थानांत इंग्रजी कंपन्यांची झपाट्यानें वाढ होणार व त्याप्रीत्यर्थ आमच्या समाजास जबर धक्का बसेल यांत शंका नाहीं.

"आजपर्यंत सरकारी सवलती व प्रोत्साहन यांच्या अभावामुळें आमच्या देशांत उद्योगधंद्यांची व कारखान्यांची उभारणी फारशी झाली नाहीं. पण तो काळ एकदम पालटून मोठ्या भांडवलावर चालणारे कारखाने सुरू करण्याची व त्यांना लागणारा मोठा मजूरवर्ग या देशांत निर्माण करण्याचीहि व्यवस्था होत आहे. या गोऱ्या भांडवलवाल्यांचे व आमच्या देशांतील धनाढ्य वर्गाचे संगनमतानें हा प्रकार घडून येण्याचा संभव आहे, पण तो आमच्या समाजाची घडी विस्कळीत करून क्रांति घडवून आणील, हें निश्चित दिसतें. कारण, कंपन्या व भांडवलवाले यांचें सरकारदरबारीं स्वाभाविकपणेंच फार वजन असल्यामुळें त्यांची भीड सरकारास पडते, व त्यांना इतरांशीं अन्यायानें वागण्याची बुद्धि होते. यामुळें समाजांत निराशा व संताप यांचा फैलाव होतो. उदाहरणार्थ, इरिगेशन खात्याचा कारभार पाहा. अहमदनगर जिल्हा दुष्काळी. तेव्हां, अवर्षणामुळें शेतकरी बुडूं नयेत यासाठी कालवा काढतो असें सरकारनें प्रारंभीं म्हटलें होतें. पण यंदा ऐन दुष्काळाचे वेळीं उन्हाळ्यांत शेतकऱ्यांना पाटाचें पाणी मिळणार नाहीं, अशी इरिगेशन खात्यानें दवंडी दिली ! कां तर बेलापूर येथील साखरेच्या कंपनीला सरकारनें गॅरंटी दिली म्हणून ! यावरून, शेतकऱ्यांचें उघड नुकसान करून कंप-

पाणी देण्यांत आलें त्यामुळें तेथील शेतकऱ्यांना स्वाभाविकपणें असें वाटूं लागलें आहे, कीं शेंकडों रुपये कर्ज काढून पाटस्थळ जमिनींत लागवड करावी आणि भर उन्हाळ्यांत इरिगेशनखात्यानें पाणी बंद करून आपलें पीक बुडवावें असा प्रकार होण्यापेक्षा जमिनी विकून मोकळें झालेलें काय वाईट? आणि या जमिनी विकत घेण्यास बेलापूर शर्करा कंपनीसारख्या भांडवलवाल्या कंपन्या टपलेल्याच आहेत. अशा रीतीनें आमचे लोक जमिनीच्या मालकीस मुकून त्यांना कारकून किंवा मजूर बनणें भाग पडणार.

### "आम्हांला गुलाम बनायचें नाहीं"

"आमच्या लोकांची जमिनीवरची मालकी बुडवून डोईजड कंपन्यांचें प्रस्थ वाढविणें घातुक आहे आणि औद्योगिक उन्नति व कालव्यांची वाढ यांसाठी जर या गोष्टी करणें अपरिहार्यच असेल तर ते प्रचंड उद्योगधंदे व नवे कालवे सध्यां मुळींच न निघाले तरीहि पुरवेल. आधींच आमच्या लोकांची स्थिति गुलामाप्रमाणें कष्टमय झाली आहे. कोरडवाहू जमिनी अवर्षणामुळें व दारिद्र्यामुळें शेतकऱ्यास फायदेशीर पडत नाहींत. पाटस्थळ जमिनींची मालकी कंपन्यांखेरीज इतर लोकांकडे राहणें अशक्य झालें आणि परदेशांत कांहीं कमाई करून स्थाईक बनावें असें मनांत आणल्यास तिकडेहि आम्हांस पाऊल टेवूं देत नाहींत. त्यामुळें स्वदेशांत किंवा परदेशांत कोठेंहि हिंदी मनुष्यास कायमचा आसरा न मिळतां व त्याला आपल्या मालकीचें कांहीं एक न राहतां तो कोठेंहि गेला तरी चाकरच बनला पाहिजे अशी परिस्थिति निर्माण होत आहे. तेव्हां ह्या कष्टमय परिस्थितीचें बेढें ढिलें करण्यासाठी आम्हीं विचारानें व निश्चयानें वागलें पाहिजे. औद्योगिक उन्नति या गोड नांवानें आम्हीं फसतां कामा नये. आम्हांस गुलाम बनावयाचें नाहीं; मालक राहावयाचें आहे.

"देशाच्या औद्योगिक उन्नतीप्रीत्यर्थ लोकांनीं स्वार्थत्याग करावयास तयार असलें पाहिजे, हा सामान्य सिद्धान्त कोणासहि मान्य होण्याजोगा आहे. मात्र हा सिद्धान्त आमच्या देशांत लागूं करतांना बरीच सावधगिरी ठेवली पाहिजे. कारण, ती न ठेवल्यास 'तेल नाहीं व तूपहि नाहीं,' असें होऊन धुपाटणें हातीं येण्याचा संभव दिसतो. हिंदुस्थानांत औद्योगिक व आर्थिक उन्नतीच्या नांवाखालीं मोठ्या बँका व कंपन्या काढण्याचे अनेक प्रयत्न आजवर झाले. पण, काय असेल तें असो, बहुतेक सर्व प्रयत्न फसले आणि जे थोडे सावरले किंवा जीव धरून आहेत त्यांचा ओढा आमच्या समाजाच्या हितापेक्षा परकीय धनाढ्य लोकांच्या इच्छेनुसार चालण्याकडे मुख्यत: असतो. याचें कारण असें कीं, या जबर भांडवलाच्या कारखानदारांना कोणत्याहि कारणानें 'सोळाबारा' करण्याचा प्रसंग आला—आणि व्यापारांत हे प्रसंग केव्हांना केव्हां यावयाचेच—कीं त्यांना लाखों रुपयांची तूट येते व ती भरून काढण्याचें सामर्थ्य हिंदी लोकांत नसून युरोपियन सावकारांत आहे. याचा परिणाम असा होतो कीं, आमच्या देशांत ज्या मानानें कारखान्याचें भांडवल मोठें असेल, त्या मानानें तो 'स्वदेशी' न राहतां 'परदेशी' भांडवलाची त्याच्यावर छाप पडते. यावरून, विद्युच्छक्तीच्या जोरावर व कोट्यवधि रुपयांच्या भांडवलावर उभारलेले कारखाने आमच्या समाजाच्या प्रगतीस पोषक होण्याऐवजीं बाधक होण्याचाच संभव फार आहे.

### डोईजड धनाढ्य नकोत

"इंग्लंडसारख्या धनाढ्य देशास असे प्रचंड कारखाने मानवत असतील, पण आम्हांस ते मानवतात किंवा नाहीं ह्याची जबरदस्त शंका आहे. अशा स्थितींत सावधगिरीनें पाऊल न टाकल्यास मुळशी पेट्यांतील जमिनीस मावळे मुकतील, व नंतर टाटाच्या ऐवजीं गोरे लोक कंपनीचे मालक होतील. तथापि, क्षणभर टाटा कंपनी कायम चालणार असें गृहीत धरलें तरी आमच्या समाजाची सद्य:स्थिति पाहतां एकीकडे अशिक्षित मजूरवर्गाची बेसुमार वाढ व शेतीची अवनति आणि दुसरीकडे दहावीस कंपन्यांनीं कोट्यवधि रुपयांच्या भांडवलावर प्रचंड कंपन्या चालविणें हा देखावा समाजास हानिकारक झाल्याविना राहणार नाहीं. आधीं समाजांत क्रमाक्रमानें शिक्षण, यंत्रज्ञान, व्यापारी धाडस, ह्यांचा फैलाव झाला पाहिजे. म्हणजे ठिकठिकाणचे लोक औद्योगिक उन्नतीचें महत्त्व ओळखून भांडवलाची उभारणी करतील व ते कारखाने आपल्या पचनीं पडतील, आणि समाज खऱ्या उन्नतीच्या पंथास लागेल. उसनें बळ आणून आज या कामासाठी घाई करण्यांत अर्थ नाहीं. आमच्यांतीलच चार लोकांना सरदार किंवा जहागिरदार बनविण्यानें तो वर्ग समाजास शेवटीं डोईजड होऊन बसतो. आयर्लंडमध्यें पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींत इंग्रजांना थोड्याशा सवलती दिल्या गेल्या त्याचा परिणाम अल्स्टरच्या रूपानें त्या देशास भोगावा लागत आहे. आसाम व सीलोनमध्यें मळेवाल्यांचें प्रस्थ वाढवूनच तद्देशीय लोक बहुतांशीं मजूर बनले आहेत. हिंदुस्थानांत देखील चहाच्या मळेवाल्यांना विशेष सवलती दिल्यानें हिंदी लोकांचा कोणताहि फायदा न होतां तोटाच झाला आहे. सारांश, मावळ्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या जमिनी काढून घेऊन टाटा कंपनीस त्या सवलतीनें देण्यासाठीं लँड ॲक्विझिशनचा कायदा उपयोगांत आणणें शुद्ध अन्यायाचें होणार आहे.

### भिकार झोपडी आणि सोन्याचा पिंजरा

"टाटा कंपनीशीं हिंदुस्थान सरकारनें धरणाच्या बाबतींत केलेला करारनामा जाहीर झाला आहे. त्यांत सरकार, एक अधिकारी नेमून जमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज करविणार व आजच्या भावानें त्यावरून शेताची किंमत ठरवून तेवढें कॉंपेन्सेशन कंपनीनें दिलें पाहिजे, असा निर्बंध घालणार आहे. यावरून, आपणांस योग्य वाटेल तें कॉंपेन्सेशन देऊन वाटेल त्याची जमीन वाटेल त्यास देण्याचा अधिकार सरकारास आहे हें तत्त्व नोकरशाही प्रस्थापित करूं पाहात आहे. पण तें प्रस्थापित झाल्यास आमच्या समाजाचें सर्व स्थैर्य नष्ट होऊन त्याला निराळीच राहाटी पत्करावी लागेल. आमच्या देशांत अनेक राज्यक्रान्त्या झाल्या; स्वकीय व परकीय अशा शेंकडों राजांनीं येथें राज्यें चालविलीं; पण गांवच्या गांव जबरदस्तीनें उठवून तेथील लोकांना भणंग बनविण्याचा विचार आजपर्यंत एकाहि कारकीर्दींत उपस्थित झाल्याचा दाखला महाराष्ट्राच्या इतिहासांत नाहीं. "गांव करील तें राव करूं शकणार नाहीं" अशी म्हण प्रचारांत आली होती. मोठमोठे पराक्रम गाजवून देखील एक जमिनीचा तुकडा अगर वतनी हक्क मिळवितां आल्यास सर्व श्रमांचें सार्थक झालें असें आमचे लोक मानीत, आणि आपण कमाविलेल्या जमिनीचा उपभोग आपले वंशज "यावच्चंद्रदिवाकरौ" घेतील अशी त्यांची खात्री असल्यामुळें त्याप्रीत्यर्थ ते तेथें आपलें रक्त सांडण्यास एका पायावर तयार होत. मुळशी पेट्यांत पिकणारें भात खाण्यांतच मावळ्यांच्या पूर्वजांचा हेतु पूर्ण होणार व मावळ्यांचा पुन: उदयकाल व्हावयाचा असेल तर तो या जमिनींशीं संबद्ध असलेल्या पूर्वजांच्या स्मृतीनेंच होणार हें उघड आहे. हें कार्य मोबदल्यांत दुसरी जमीन घेण्यानें अगर विक्रीची किंमत मिळण्यानें केव्हांहि होणार नाहीं. आपल्या मालकीच्या जमिनींत रात्रंदिवस खपून देखील आपणावर उपासमारीचा व भिकार झोपडींत राहण्याचा प्रसंग आला तरी तसें

राहणें पुरवलें; तें राघूप्रमाणें गोड खाणें व सोन्याच्या पिंजऱ्यांत राहणें ह्यापेक्षा वरच्या दर्जाचें आहे, हें समजण्याइतकी, मालक व मजूर यांतील भेद कळण्याइतकी अक्कल मावळ्यांत आहे. जमिनींसच जलसमाधि दिल्यानंतर परंपरागत जमिनीच्या व अत्यंत पूज्य अशा देवळाच्या आधारास आपणच नव्हे तर आपले वंशज देखील कायमचे मुकतात हें ज्ञान मावळ्यांना आहे. त्यामुळें स्वार्थाच्या व परमार्थाच्याहि दृष्टीनें मुळशी पेट्यांतील मावळ्यांनीं "आधीं जान व नंतर जमीन" असे जे उद्गार काढले ते त्यांच्या अंतःकरणांतील सळवळीचे खरे निदर्शक आहेत, असें आम्हांस वाटतें. केवळ आधुनिक पाश्चात्य दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहणारास ही जुनी विचारसरणी कदाचित् पटणार नाहीं, पण परस्पर दुसऱ्याच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यापूर्वी खऱ्या मालकाची भावना समजावून घेतली पाहिजे. अशिक्षित लोक जमिनीपासून सुटले म्हणजे पोरक्या मुलाप्रमाणें निराधार बनून परंपरेस मुकतात. हिंदी शेतकऱ्याच्या भावनेची कमान धर्म व परंपरागत जमीन या दोन खांबांवर उभारलेली असते. मुळशी पेट्यांत होणाऱ्या जलप्रलयानें हे दोनहि स्तंभ नष्ट होऊन मावळे लोक कांहीं वर्षांनीं डोंवारी बनतील."


## २८ वर्षांची दीर्घ तपश्चर्या

कोल्हापूर जिल्हा व शहर यांतील अग्रेसर नागरी सहकारी बँक

# श्री महालक्ष्मी

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

( १६७, बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर )

स्थापना १९३१ ] [ फोन नं. १३७

शाखा :—शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| १ ) अधिकृत भाग भांडवल | रु. | ४,००,००० |
| २ ) वसूल भाग भांडवल | रु. | १,६९,९०५ |
| ३ ) सभासद संख्या | | ३,७३३ |
| ४ ) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,८४,९१८ |
| ५ ) ठेवी | रु. | २४,८१,५०० |
| ६ ) खेळतें भांडवल | रु. | ३०,७९,००० |

संस्थेचें वैशिष्ट्य:—

व्यापार व लघु उद्योगधंदे यांना उत्तेजन देणें.

आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.

सर्व तऱ्हेच्या बँकिंग कामासाठी भेटा अगर लिहा.

मा. कृ. पित्रे, बी. ए., बी. कॉम. मॅनेजर.

रा. गं. अष्टेकर, बी. ए., प्रेसिडेंट.



# दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | : रु. | २३,३८,३५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | : रु. | ३,४९,८८२ |
| ठेवी | : रु. | १,०३,९३,४८९ |
| खेळतें भांडवल | : २ कोटी, ८ लाखांचे वर | |

★दक्षिण सातारा जिल्ह्यांत बँकेच्या १० शाखा कार्य करीत आहेत.

★सरकारनें या बँकेचे रु. ७ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.

★सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठी प्रामुख्यानें कर्जे दिलीं जातात.

★आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

गुलाबराव रघुनाथराव पाटील, चेअरमन.

पंडीतराव भाऊराव टाकवेकर, मॅनेजर.



# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणें ४.

फोन नं. ७९८६

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें.
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या, व प्रत्येक खोलींत पंखा.

शिवाजीराव शिरोळे, मॅनेजिंग पार्टनर

पत्रानें आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.

# भारताच्या वाढत्या लोकसंख्येचें आव्हान

## जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनांत मोठी वाढ झाली पाहिजे

१९६१ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणतीवरून जे तात्कालिक निष्कर्ष काढण्यांत आले, ते प्रसिद्ध करण्यांत आल्यावर सर्व देशाला मोठा धक्का बसला. १९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांच्या कालांत भारताच्या लोकसंख्येंत ७.७२ कोटींची भर पडलेली आहे. गेल्या पांच दशकांत लोकसंख्येची जितकी वाढ झाली त्याच्या ६० टक्के वाढ वरील एकाच दशकांत झालेली आहे. म्हणजे, ब्रिटन, जर्मनी अगर फ्रान्स ह्यांपैकीं कोणत्याहि एका देशाच्या लोकसंख्येइतकी वाढ १९५१–१९६१ ह्या एका दशकांत भारतामध्यें झाली आहे. तेव्हां लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप किती भयंकर आहे, ह्याची कल्पना लोकांना एकाएकीं चरचरून आली ह्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. भारताच्या लोकसंख्येच्या प्रश्नाला प्रादेशिक, राजकीय, अर्थशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अशीं अनेक अंगें आहेत. भारतामधील लोकांच्या दरडोई उत्पन्नावर लोकसंख्येच्या वाढीचा काय परिणाम झाला आहे तें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. १९५१ ते १९६१ ह्या कालांत आर्थिक विकासासाठीं दोन पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यांत आले. त्यामुळें राष्ट्रीय उत्पन्नांत ४२ टक्के वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं नियोजन समितीनें असा हिशोब केला होता कीं, १९६१ च्या सुमारास देशाची लोकसंख्या ४०.८ कोटींच्या आसपास असेल. हा हिशोब खरा ठरला असता तर लोकांच्या दरडोई उत्पन्नांत २४ टक्के वाढ झाली असती. परंतु नियोजन समितीनें लोकसंख्येच्या वाढीचा अंदाज दुरुस्त केला आणि लोकसंख्या ४३.१ कोटी होईल असा अंदाज नव्यानें केला. १९६१ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणतींत लोकसंख्या प्रत्यक्ष ४३.८ कोटी झाल्याचें आढळून आलें. त्यामुळें गेल्या दहा वर्षांत लोकांच्या दरडोई उत्पन्नांत झालेल्या वाढीचा अंदाज २४ टक्क्यांवरून १६ टक्क्यांवर आणावा लागला. नियोजन समितीनें ह्या बाबतींत केलेला मूळ अंदाज अर्थातच चुकला. पंचवार्षिक कार्यक्रमांत भांडवलाची नियोजित पद्धतीनें गुंतवणूक करण्यांत येत होती. त्याचा परिणाम म्हणून लोकांच्या सरासरी उत्पन्नांत व खर्चांत वाढ होईल अशी अपेक्षा करण्यांत येत होती. परंतु १९६१ च्या शिरगणतीनें ह्या अपेक्षा फोल ठरविल्या. त्याचबरोबर दुसरीहि एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येण्यास मदत झाली. दरडोई उत्पन्नाच्या पातळींत ठरविल्याप्रमाणें वाढ होण्यास हवी असेल तर भांडवल-गुंतवणुकीच्या पूर्वी ठरविलेल्या दरांत वाढ करण्यांत आली पाहिजे ही ती गोष्ट होय. पुढील काळांत भारतामधील लोकसंख्येच्या वाढीचा वेग कमी करण्यासाठी विशेष जारीनें प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत हाहि मुद्दा शिरगणतीनें स्पष्ट केला आहे.

### १९७६ मध्यें लोकसंख्या ६२.५ कोटी

१९६१ सालांतील शिरगणतींत जी आंकडेशास्त्रीय माहिती उपलब्ध झाली तिचा अधिक तपशीलवार विचार करणें अगत्याचें आहे. लोकसंख्येच्या वाढीचा वेग कमी करण्यासाठी जें धोरण स्वीकारण्यांत येईल त्याच्या अंमलबजावणीच्या कामांत येणाऱ्या अडचणींचा तर विचार करावा लागेलच. पण हें धोरण यशस्वी झालें तरीसुद्धां त्याचे परिणाम दिसूं लागण्यास वेळ लागेल ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागेल. म्हणून पुढील कांहीं वर्षांत लोकसंख्येची आणखी बरीच वाढ होईल हें समजून असलें पाहिजे. नियोजन समितीनें ह्याची जाणीव ठेवली आहे. तिच्या अंदाजाप्रमाणें भारताची लोकसंख्या १९७६ सालीं १८.७ कोटींनीं वाढेल. ह्याचा अर्थ असा कीं पुढील १५ वर्षांत १९६१ सालाच्या मानानें भारताची लोकसंख्या ४२ टक्क्यांनीं वाढेल अशी अपेक्षा आहे. गेल्या १० वर्षांत झालेल्या वाढीच्या २.४ टक्के ही वाढ असेल. तेव्हां १९६१ सालीं ४३.८ कोटी असलेली लोकसंख्या येत्या १५ वर्षांत १८.७ कोटींनीं वाढून १९७६ सालीं ६२.५ कोटी होईल असें समजून, ह्या घटनेच्या अर्थाचा आर्थिक दृष्टीनें विचार करण्यांत आला पाहिजे. सध्यां जी लोकसंख्या आहे तीच जीवनाला आवश्यक असणाऱ्या गरजांच्या पुरवठ्याच्या दृष्टीनें भयानक पातळीवर आहे. तेव्हां ह्या लोकसंख्येंत नव्यानें भर पडणाऱ्या लोकसंख्येला ह्याच पातळीवर जगवावयाचें असें म्हटलें तरीसुद्धां जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मितींत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली पाहिजे. ह्या आवश्यक गरजांत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य ह्यांचा समावेश होतो. ह्याच फक्त भागवावयाच्या म्हटलें तरी १५ वर्षांच्या कालांत ग्राहकांना लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंची व सोयींची ४२ टक्के वाढ झाली पाहिजे. म्हणजे ही वाढ दरसाल सरासरी २.८ टक्के होणें जरूर आहे. त्यांतहि पुन्हा दोन गोष्टींची दखल घेतली गेली पाहिजे एक अशी कीं, संपत्तीची विषम वांटणी होत आहे हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. दुसरी अशी कीं, देशांतील लाखों लोकांना दरडोई ज्या किमान जीवनावश्यक वस्तु मिळतात त्यांची सरासरी फार कमी आहे. शिवाय राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकड्यांत अशा पुष्कळ वस्तु असतात की त्यांची गणना मूलभूत आवश्यक वस्तूंत करतां येणार नाहीं. उत्पादनांत जरूर ती वाढ घडवून आणावयाची असेल तर बचतीच्या व गुंतवणुकीच्या प्रमाणांत आणखी खूप वाढ करावयास हवी. ही बचत व गुंतवणूक अर्थातच राष्ट्रीय उत्पन्नामधून करावी लागणार. १९६१ सालच्या शिरगणतींत झालेली लोकसंख्येची वाढ आणि त्या वाढीच्या आधारावर पुढील वाढीविषयीं केलेला अंदाज लक्षांत घेतला तर १९७६ च्या सुमारास राष्ट्रीय उत्पन्नांत ७५ टक्के वाढ झाली पाहिजे असें निष्पन्न होतें. तरच १९७६ मध्यें लोकसंख्येंतील प्रत्येक माणसाला दरडोई सध्यांच्या राष्ट्रीय सरासरीप्रमाणें जीवनावश्यक वस्तु उपलब्ध होऊं शकतील. ह्याचाच अर्थ असा कीं, पुढील १५ वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल सरासरी निदान ५ टक्के तरी वाढ झाली पाहिजे.

### मोठ्या गुंतवणुकीची जरुरी

पण अशी वाढ झाली तरी राष्ट्रीय राहणीच्या मानांत कांहीं प्रगति होईल असें नाहीं. १५ वर्षांच्या योजनाबद्ध प्रयत्नानंतर आजच्या इतकेंच असमाधानकारक राहणीचें मान राहणार असेल तर त्यामुळें आनंद वाटण्याचें कांहीं कारण नाहीं हें उघडच आहे. प्रत्येक माणसाला मिळूं शकणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंत वाढ कशी होईल हें आपणांस पाहावयाचें आहे. जीवनावश्यक वस्तूंत दरडोई पुरवठ्याची सध्यांची परिस्थिति टिकवून धरण्यासाठीं जो प्रयत्न करावा लागेल, त्याचा परिणाम म्हणून कांहीं प्रमाणांत जीवनासाठी वस्तूंच्या व सोयींच्या मागणींत वाढ होईल इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. राष्ट्रीय उत्पन्नांत इतकी मोठी वाढ झाली म्हणजे सध्यांच्या विषम वांटणींतहि थोडीफार वाढ होणारच. तशी ती

होणार नाहीं असें मानणें वस्तुस्थितीस सोडून होईल. शिवाय वाटणीने होणारी ही वाढ केवळ अत्युच्च उत्पन्नाच्या गटांतच होईल असें नाहीं. मध्यम व सामान्य प्रतीच्या उत्पन्नाच्या गटांतहि अधिक होईल. जादा लोकसंख्येंतील लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा दरडोई पुरवठा सध्यां इतकाच करावयाचा म्हटलें तर बचत व गुंतवणूक ह्यांचे जें प्रमाण आवश्यक होईल त्यापेक्षा अधिक प्रमाण ठेवावें लागेल असाच त्याचा अर्थ आहे. राष्ट्रीय उत्पन्नांत होणारी दरसालची सरासरी वाढ ५ टक्क्यापेक्षा पुष्कळच अधिक वाढली पाहिजे. तरच सामान्य लोकांच्या जीवनाचें राहणीचे मान लक्षांत भरण्याइतकें वाढूं शकेल. पुढील १५ वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नाच्या सरासरी वाढीचें दरसालचें प्रमाण ९ ते १० टक्के तरी असलें पाहिजे. भारताच्या लोकसंख्येच्या आंकड्यांवरून स्पष्ट होणारा आणखी एक आर्थिक प्रश्न म्हणजे रोजगाराचा. स्वत:चा व स्वत:वर अवलंबून असणाऱ्या माणसांचा योगक्षेम चालविण्यासाठी काम करण्याची इच्छा व पात्रता असलेले किती लोक भारतांत आहेत ह्याचा नक्की अंदाज करणें बरेंच अवघड आहे. नियोजन समितीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें पुढील १५ वर्षांत रोजगार करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या ७ कोटी लोकांची अधिक भर पडणार आहे. १९६१ मध्यें बेकार असलेल्या अगर अर्धबेकार असलेल्या लोकांची संख्या अर्थातच वेगळी आहे. सध्यांच्या अर्थरचनेंत अशा प्रकारची निमबेकारी असणें अपरिहार्यच आहे. वर दिलेला अंदाज कमी असण्याचा संभव आहे. कारण, काम करण्याचें वय झालेलें परंतु रोजगार न मिळाल्यामुळें प्रच्छन्न बेकारींत दिवस काढणारे कित्येक लोक उघड उघड बेकार म्हणवून घेऊं लागतील. त्यांची भर व रोजगार मिळवूं इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या संख्येंत होणारी वाढ ह्यांचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. पण हा मुद्दा सोडून दिला तरी १५ वर्षांच्या काळांत ७ कोटी अधिक लोकांना उत्पादक रोजगार पुरविण्याचें काम खरोखरच प्रचंड आहे. सध्या अमेरिकेंत रोजगार करणाऱ्या लोकांची जितकी संख्या आहे त्यांच्यापेक्षांहि वरील संख्या जास्त आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे त्याच्या प्रचंडपणाची कल्पना येईल. ह्या प्रश्नाकडे दुसऱ्या एका अंगानें पाहतां येईल. येत्या १५ वर्षांत जितका रोजगार आपल्याला निर्माण करावयाचा आहे तो गेल्या ५ वर्षांत निर्माण केल्या गेलेल्या रोजगाराच्या ९ पट आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दरसाल जादा रोजगार निर्माण करावयाचा जो वेग होता त्याच्या तिप्पट वेगानें जादा रोजगाराची निर्मिति दरसाल करण्यांत आली पाहिजे.

### हें एक आव्हान आहे

भारताच्या अर्थव्यवस्थेला लोकसंख्येच्या वाढीमुळें एक भयानक आव्हानच दिलें गेलें आहे ह्यांत शंका नाहीं. पण प्रसंगानुरूप वागून आणि योग्य तें धोरण स्वीकारून ह्या आव्हानाला तोंड देतां येईल. अर्थात् वैयक्तिक आणि अल्पकालीन हितसंबंधांवर त्यामुळें जो ताण पडेल तो सहन करावा लागेल. अखेर श्रम हीच अर्थशक्ति आहे. भारतांत काम करूं शकणाऱ्या माणसांची संख्या अमेरिकेपेक्षां कितीतरी मोठी आहे, त्यांत आणखी ७ कोटींची भर पडणार आहे. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां पुढील १५ वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल ९ ते १० टक्के ह्या वेगानें वाढ करीत राहणें शक्य कोटींतील आहे. देशांत श्रम करणारीं माणसें पुष्कळ आहेत. त्यांत आणखी लक्षावधींची भर पडणेंहि अटळ आहे. कुटुंबनियोजन आणि संतति–प्रतिबंध ह्यांची जरुरी आहेच; पण आपणापुढें असणाऱ्या तांतडीच्या प्रश्नांना ह्या उपायांनीं उत्तर मिळणार नाहीं. रोजखर्चाच्या वस्तु आणि भांडवलाचा संचय ह्यांच्यांत वाढ करावयाची असेल तर मुख्य भार उचलण्यासाठी श्रमांची आवश्यकता आहे. आपल्या जवळ असलेली प्रचंड श्रमशक्ति आर्थिक उत्पादनाकडे वळविण्याचे मार्ग व साधनें आपणास शोधून काढलींच पाहिजेत. १९६१ च्या शिरगणतीचा हाच आर्थिक अर्थ आहे. हें आव्हान यशस्वीपणें स्वीकारता येईल कीं नाहीं, हें सांगणें कठीण आहे.

---

### बँकांतील ठेवींचा विमा

अमेरिकेंत १९३० आणि १९३३ ह्यांच्या दरम्यान ५,००० बँका बुडाल्या. मार्च, १९३३ मध्यें परिस्थिति फारच बिकट झाली आणि त्या वेळचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांनीं फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना केली. सर्व नॅशनल बँकांवर त्यांत सामील होण्याची सक्ति करण्यांत आली. प्रारंभीं प्रत्येक ठेवीदाराच्या २५,००० रुपयांच्या रकमेची हमी घेतली होती; हमीची रक्कम पुढें ५०,००० रु. करण्यांत आली. बँकांतील ठेवींच्या विम्याच्या आधीं अमेरिकेंत दरसाल १,२५० बँका बुडत होत्या. १९३४ ते १९४२ ह्या मुदतींत त्यांची वार्षिक सरासरी ५० वर उतरली. १९४२ नंतर दरवर्षी सरासरीनें फक्त ४ बँका बुडाल्या. प्रारंभीं मंदीचा काल होता; नंतर बँकांवरील देखरेख आणि नियंत्रण वाढत गेलें. तेव्हां, केवळ विम्यामुळेंच बँका बुडणें कमी झालें असा निष्कर्ष काढतां येणार नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्यें ठेवींच्या विम्याची योजना नसूनहि तेथील ठेवीदारांचें नुकसान होण्याची पाळी आलेली नाहीं. बँका न बुडण्यासाठी त्यांची मजबुती वाढायला हवी; बुडल्या तर ठेवीदारांना कांहीं किमान रक्कम परत मिळावी, हा विम्याचा मर्यादित उद्देश आहे. ह्या हमीमुळें ठेवीदारांचा विश्वास टिकण्यास मदत होईल, हें मात्र खरें आहे.


# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

फोन : १२९ पोस्ट बॉक्स : १९

केन्द्र कार्यालय :
१२५१ दामोदर रोड, भद्रकाली, नासिक
नासिक जिल्ह्यांतील २६ शाखांमार्फत
जनतेच्या अविरत सेवेंत
ऑडिट वर्ग 'अ'

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भाग भांडवल | रु. ४४ लाख |
| ठेवी | रु. १८४ लाख |
| दिलेलीं कर्जें | रु. ३१३ लाख |
| खेळतें भांडवल | रु. ४४७ लाख |

## या बँकेंतील पैसा
जिल्ह्यांतील शेती व सहकारी उद्योगधंद्यांच्या विकासासाठीच दिला जातो.

वि. ना. कायदे, मॅनेजर
भाऊसाहेब हिरे, चेअरमन

# युरोपिअन समाईक बाजारपेठ

## ब्रिटन सामील होण्यानें भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

युरोपांतील देशांची एक सुटसुटीत अर्थव्यवस्था असावी हें ध्येय रोमन साम्राज्याइतकें जुनें आहे. त्या वेळीं जगांतील इतर देशांचा विचार करण्याचें कारण नसल्यानें फक्त युरोपीय देशांच्यापुरताच हा प्रश्न मर्यादित झाला. नंतरहि युरोपमधील हॅनसेसिआटिक लीगसारख्या संघटनांनीं वरील ध्येयाचा पुरस्कार केला. कांहीं देशांच्या गटांनीं स्वच्छेनें एकत्र येऊन देशांतर्गत व्यापारावरील बंधनें नष्ट करण्याची खटपट करावी, ह्यांत नवीन असें कांहीं नाहीं. इंपीरिअल प्रेफरन्सची कल्पनाहि वरील कल्पनेशीं जुळतीच आहे. ओटावा कराराच्या मुळाशीं हीच कल्पना आहे. ब्रिटिश कॉमनवेल्थमधील देशांचे संबंध फक्त व्यापारी नव्हे, तर राजकीय दृष्टीनेंहि अधिक दृढ करावेत असाच ओटावा कराराचा हेतु होता. परंतु हळूहळू आज ब्रिटिश साम्राज्यच संघटित राहिलें नाहीं, त्यामुळें एकत्रित राहण्याची इच्छा ओटावा कराराच्या वेळेइतकी प्रबळ राहिलेली नाहीं. भारत स्वतंत्र झाला आहे. दक्षिण आफ्रिका साम्राज्यांतून फुटून निघाली आहे. कॅनडाचा ओढा ब्रिटनपेक्षा अमेरिकेकडे अधिक आहे. ऑस्ट्रेलिआ व न्यूझीलंड ब्रिटनपासून खूपच दूर आहेत. त्यामुळें उभयतांचें सहकार्य कठीण होत आहे. पूर्वी ब्रिटिश साम्राज्यांत असलेल्या देशांचे संबंध आतां कमकुवत झालेले असल्यामुळें स्वतःच्या अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यासाठी दुसरीकडे दृष्टि वळवावी असें ब्रिटनला वाटूं लागल्यास त्यांत नवल नाहीं. युरोपांतील देशांत अधिक आर्थिक सहकार्य घडवून आणण्याच्या पुष्कळ योजना अलीकडे पुढें आल्या. तथापि पश्चिम जर्मनीचे एक माजी अर्थमंत्री मि. रॉबर्ट शूमन ह्यांनीं आर्थिक सहकार्याच्या कल्पनेला नीट आकार दिला.

पश्चिम युरोपांतील राज्यांनीं सहकार्यावर आधारलेला एकसंधी समाजगट स्थापावा अशी कल्पना प्रथम सुचविण्यांत आली. हा समाजगट आर्थिक व राजकीय दृष्टीनेंहि एकसंध ठेवावयाचा होता. त्यांत सामील झालेल्या राज्यांनीं आपलीं कांहीं विशिष्ट कार्यें आपआपल्या सरकारांकडे न ठेवतां समाजगटाकडे सोपवावयाचीं होतीं. अर्थातच राष्ट्रांना संपूर्ण सार्वभौमत्व उपभोगतां येणार नव्हतें. ही कल्पना मुळांतच क्रांतिकारी होती. ती अमलांत आणावयाची तर सभासद-राज्यांच्या राजकीय भूमिकेंत आमूलाग्र बदल करावा लागणार होता. म्हणून सर्वच कल्पना एकदम अमलांत न आणतां कांहीं भागांत तिचा वापर करून पाहावा असें ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें १९५१ सालीं फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, बेल्जम, हॉलंड व लक्झेंबूर्ग ह्या सहा देशांनीं कोळसा व लोखंड ह्या वस्तूंपुरता एक करार केला. कोळसा, अशुद्ध लोखंड, पोलाद, जुनें लोखंड, ह्या वस्तूंची एक समाईक बाजारपेठ वरील करारानें प्रथमच निर्माण करण्यांत आली. समाईक बाजारपेठेचें वैशिष्ट्य असें आहे कीं, ह्या बाजारपेठेंत वस्तूंची खरेदी-विक्री मोकळेपणानें करण्यांत आली पाहिजे. वस्तूंच्या उत्पादनाच्या राष्ट्रीय उगमांचा विचार न करतां खुल्या स्पर्धेत ही खरेदीविक्री करण्यांत आली पाहिजे. कोणत्याहि राज्याला दुसऱ्या राज्याच्या मालावर जकात बसविण्याची अगर त्या मालाच्या आयातनिर्यातीचे कोटे ठरविण्याची मुभा अर्थातच असणार नाहीं किंवा वाहतुकीचे सवलतीचे दर अगर पक्षपाती कर ह्यांचा अवलंब करतां येणार नाहीं. वस्तूंची खरेदी-विक्री सर्व देशांना सारखीच करतां आली पाहिजे. त्यांच्या किंमतींत फक्त खऱ्याखुऱ्या वाहतुकीच्या खर्चाचीच वाढ करतां आली पाहिजे. ह्याचे दोन अर्थ होतात: एक असा कीं, कोणत्याहि देशानें दुसऱ्या कोणत्याहि सभासद असलेल्या देशाचा माल आपल्या हद्दींत अनिर्बंध रीत्या येऊं दिला पाहिजे. दुसरा असा कीं, उत्पादक देशानें आपला माल इतर देशांत मोकळेपणानें मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. ह्या ध्येयाच्या मार्गे एक कल्पना गृहीत धरण्यांत आली आहे. समाईक बाजारपेठेंत सामील झालेल्या ज्या देशांतील उत्पादनाची किंमत अधिक असेल त्यांनीं ती कमी तरी केली पाहिजे अगर त्या मालाचें उत्पादनच थांबविलें पाहिजे. १९५१ सालीं सुरू करण्यांत आलेला हा प्रयोग इतका यशस्वी झाला कीं, १९५६ सालीं समाईक बाजारपेठेची व्याप्ति वाढविण्यासंबंधीं पुन्हा चर्चा होऊं लागली. त्यांतून युरापियन देशांच्या आर्थिक सहकार्याच्या कल्पनेची दुसरी अवस्था निर्माण झाली आणि युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटीची स्थापना करण्यांत आली. २५ मार्च १९५७ रोजीं ट्रीटी ऑफ रोम ह्या दस्तावर वरील सहा देशांनीं सह्या केल्या. ह्या कराराच्या हेतूंची रूपरेषा पुढीलप्रमाणें आहे: देशांदेशांतील जकाती रद्द करणें, व्यापारी देवघेवींतील कोट्यांची पद्धत बंद करणें, समाईक बाजारपेठेच्या बाहेर असलेल्या देशांच्या मालावर सर्वांनीं समान जकात बसविणें आणि समान व्यापारी धोरण अवलंबणें, सभासद-राष्ट्रांत माणसांची, सोयींची व भांडवलाची अधिक मोकळी हालचाल होऊं देणें, सभासद-राष्ट्रांनीं वाहतुकीसंबंधी व शेतीसंबंधी सारखें धोरण ठरविणें, इत्यादि. १९५१ सालीं समाईक बाजारपेठेची स्थापना करण्यांत आली होती. तिची पूर्णता करण्याच्या दृष्टीनें टाकलेलें ट्रीटी ऑफ रोम हें एक महत्त्वाचें पाऊल होतें. ह्या करारामुळें कोळसा व पोलादच काय, पण इतर औद्योगिक मालहि ह्या बाजारपेठेच्या कक्षेंत आला.

येथपर्यंत ह्या सर्व संघटनांपासून ब्रिटन अलिप्त राहिलेलें होतें. तथापि, १९६० च्या जुलै महिन्यांत ब्रिटन, स्वीडन, डेन्मार्क, नॉर्वे, ऑस्ट्रिआ, स्वित्झरलंड व पोर्तुगाल ह्या ७ देशांनीं युरोपिअन फ्री ट्रेड असोसिएशनची स्थापना केली. आर्थिक सहकार्य करण्यासाठी हा दुसरा एक मार्ग काढण्यांत आला होता. ही संघटना युरोपीय समाईक बाजारपेठेइतकी साचेबंद नाहीं. आर्थिक धोरण, चलन-व्यवस्था, भांडवल व मजूर ह्या सर्वांचें एकत्रीकरण करण्याचा ह्या संघटनेचा हेतु नव्हता. युरोपिअन फ्री ट्रेड असोसिएशनमध्यें सामील झालेल्या देशांना कांहीं प्रमाणांत स्वातंत्र्य ठेवलेलें होतें. पण ह्याच सुमारास दोन्ही संघटनांच्या परिणामाबद्दल शंका व्यक्त करण्यांत येऊं लागल्या. पश्चिम युरोपमधील सहा देश युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटीमध्ये सामील झाले होते व सात देश फ्री ट्रेड असोसिएशनमध्यें सामील झाले होते. युरोपांतील देशांची अशा रीतीनें फाळणी होणें कम्युनिस्ट राष्ट्रगटांचा विचार करतां धोक्याचें वाटूं लागलें. वास्तविक ह्या दोन संघटनांचा हेतु परस्परांशीं स्पर्धा करण्याचा कधींच नव्हता. उलट, दोन्ही संघटनांची जुळणी होण्यास मदत

व्हावी असाच ब्रिटनचा हेतु होता. दरम्यान आणखीहि कांहीं घटनांचा विचार करणें प्राप्त होऊं लागलें. ब्रिटनमधील आर्थिक परिस्थिति खालावूं लागली; कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांचे संबंध सैल होऊं लागले; ब्रिटननें आपलें आर्थिक भवितव्य कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांशीं बांधून ठेवूं नये असा आग्रह अमेरिका करूं लागली. ब्रिटननें कांहीं देशांना व्यापारी सवलती देण्याचें बंद करून युरोपियन समाईक बाजारपेठेंत प्रवेश केला, तर युरोपची भरभराट पुन्हा लवकर होईल असें अमेरिका अधिकाधिक आग्रहानें प्रतिपादन करूं लागली. इकडे कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांना, ब्रिटन समाईक बाजारपेठेंत गेल्यास, स्वतःच्या अर्थव्यवस्थांना उत्पन्न होणाऱ्या धोक्याची जाणीव होऊं लागली होती, म्हणून प्रथम कॅनडाच्या मुख्य मंत्र्यांनीं व नंतर ऑस्ट्रेलिआच्या मुख्य मंत्र्यांनीं ब्रिटनच्या प्रवेशाला जोराचा विरोध दर्शविला. ऑस्ट्रेलिआतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, त्यामुळें ऑस्ट्रेलिआची लक्षावधि पौंडांची निर्यात घटेल. न्यूझीलंडनें तर असें जाहीर केलें कीं, ब्रिटन समाईक बाजारपेठेंत गेल्यास आपल्याला कम्युनिस्ट राष्ट्रगटाकडे व्यापारी मदतीसाठी धाव घ्यावी लागेल. कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील कांहीं आफ्रिकन व आशियाई देशांनींहि ब्रिटनच्या प्रवेशास विरोध जाहीर केला. तथापि तरीसुद्धां ब्रिटन युरोपिअन समाईक बाजारपेठेंत सामील झाला तर त्याचा भारतावर काय परिणाम होऊं शकेल तें आतां पाहूं. ब्रिटन समाईक बाजारपेठेंत सामील होणार असें प्रथम दिसूं लागल्यावर भारताचे अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई म्हणाले कीं, त्यांना ह्याबद्दल फारशी चिंता वाटत नाहीं. ह्याला कारण होतें. भारत ब्रिटनला चहा, अभ्रक, ताग, इत्यादि वस्तु निर्यात करतो. ब्रिटनच्या प्रवेशानें ह्या वस्तूंच्या निर्यातीवर फारसा परिणाम होण्यासारखा नव्हता. प्रवेशानंतर ब्रिटन जकातींत जे फेरबदल करील ते सर्वच देशांना लागूं होणार असल्यानें भारतीय चहाच्या ब्रिटनमधील बाजारपेठेवर विपरीत परिणाम होण्याची भीति नव्हती. चहाच्या किंमती वाढल्या असत्या; पण चहा ही एक अशी वस्तु आहे कीं, तिचा खप ब्रिटनमध्यें कांहीं किमान पातळीच्या खालीं जाणें शक्यच नसतें. ब्रिटिश नागरिक एरव्हीं रोज १० कप चहा पीत असेल तर किंमती वाढल्यामुळें ८-९ कप घेतील इतकेच; त्यामुळें निर्यातींत फारशी घट होणार नाहीं. अभ्रकाच्या बाबतींत अशीच स्थिति आहे. ह्या वस्तूच्या बाबतींत भारताला एकच स्पर्धक आहे. तो म्हणजे ब्राझिल. तागाच्या मालाच्या बाबतींतहि फारशी स्पर्धा होण्याची शक्यता नाहीं. थोडक्यांत म्हणजे, परंपरागत निर्यात मालाच्या बाबतींत जे धोके असतील त्यांना विचारविनिमयानें तोंड देतां येण्यासारखें आहे. असा माल सोडून इतर मालाच्या निर्यातीचा विचार करूं लागलों म्हणजे मात्र चित्र निराशाजनक दिसूं लागतें. उदा. तेल व तेलबियांची निर्यात. गेल्या कांहीं वर्षांत सवलतीच्या जकातीमुळें ह्या मालाचा निर्यात—व्यापार विकास पावलेला आहे.

भारत ब्रिटनला जो माल निर्यात करतो त्यांत किंमतीच्या दृष्टीनें वनस्पति तेल आणि तेलबियांच्या निर्यातीचा क्रमांक दुसरा अगर तिसरा आहे. ह्या मालावरील सवलतीच्या जकातीमुळें ब्रिटनच्या बाजारपेठेंत त्याला थोडासा फायदा होतो. एके काळीं वनस्पति तेलाची निर्यात करणाऱ्या देशांत भारत हा प्रमुख होता. परंतु अलीकडे देशांतर्गत खप वाढल्यामुळें भारताचें तें स्थान राहिलेलें नाहीं. अमेरिकेमध्यें सोयाबीनची लागवड अलीकडे फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागली आहे. सोयाबीनची निर्यात भारताच्या तेलबियांशीं स्पर्धा करण्याची शक्यता आहे. भारताच्या निर्यातींत तंबाखू, कॉफी आणि विशेषतः कापड ह्या मालाचा समावेश आहे. त्याच्याबद्दलहि खास विचार झाला पाहिजे. युरोपिअन समाईक बाजारपेठेंत सामील होण्याचा निर्णय ब्रिटननें घेतला तर भारतीय कापडाच्या आयातीचा कोटा ठरविण्यांत येण्याची शक्यता आहे. हा कोटा उदार हातानें ठरविण्यांत आला तर जपानच्या व इतर देशांच्या कापडाबरोबर स्पर्धा करणें भारताला अवघड जाणार नाहीं. परंतु कापडाच्या आयातीच्या बाबतींत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांत व त्याबाहेरच्या देशांत ब्रिटन जर फरक करणार नसेल तर मात्र भारतीय कापडाची परिस्थिति चमत्कारिक होईल. खुद्द युरोपांतच कांहीं देशांजवळ कापडाचीं गुदामें भरून राहिलीं आहेत. त्याची स्पर्धा भारताला जाणवल्याखेरीज राहणार नाहीं. तथापि ह्या बाबतींत विचार-विनिमयाला जागा आहे. भारतीय कापडाची निर्यात कांहीं ठराविक पातळीच्या खालीं जाऊं नये म्हणून आयातीचा कोटा ठरवून घेण्याच्या पद्धतीचा अवलंब करावा लागेल असें दिसतें.

ब्रिटननें युरोपिअन समाईक बाजारपेठेंत प्रवेश केला तर फक्त भारतालाच अडचणींना तोंड द्यावें लागेल असें नाहीं. ब्रिटनहि अडचणींतून सुटणार नाहीं. विशेषतः ब्रिटनमधील शेतीच्या व्यवसायाबद्दल चिंता व्यक्त करण्यांत येत आहे. ब्रिटनमधील हुजूर पक्ष समाईक बाजारपेठेबद्दल भीति व्यक्त करीत आहे. कारण ह्या पक्षाचीं मुळें ज्या वरिष्ठ वर्गांत आहेत तो वर्ग मुख्यतः जमीनदारांचा आहे. त्यामुळें ब्रिटिश शेतीबद्दल त्यांना काळजी वाटणें साहजिकच आहे. युरोपांतील ज्या सहा देशांनीं कोळसा व पोलादापुरती समाईक बाजारपेठेची कास धरली त्यांनाहि कांहीं अडचणी सोसाव्या लागतच आहेत. त्यांतला मुद्दा एवढाच कीं, समाईक बाजारपेठेसारखी संघटना स्थापन करण्यांत आली म्हणजे पुढील भरभराटीसाठी आज प्रत्येकालाच कांहींतरी त्याग करावा लागतो. युरोपची भरभराट, विशेषतः ब्रिटनची भरभराट, ही भारताला उपकारकच होणार आहे. ह्या प्रश्नाला एक राजकीय बाजूहि आहे. युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटीमधील सहा देश व युरोपिअन फ्री ट्रेड असोसिएशनमधील सात देश एकत्र आले तरच रशिआच्या चिरेबंदी ताकतीला तोंड देणें शक्य होईल, ही गोष्ट ब्रिटनमधील लोकमताला आतां पटूं लागली आहे.

फोन नं. ४१४८४ **माधवाश्रम प्रा. लि.** तार : माधवाश्रम बॉम्बे

**भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.**

तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था. ● विवाह—कार्याची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय. ● कुटुंबासह राहणारांसाठी स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम प्रा. लि., गिरगांव, मुंबई ४. ★

# रशियाचा तिसरा प्रचंड कार्यक्रम

## जगाच्या भवितव्यावर चिंताजनक परिणाम करणारा ठरणार

क्रुश्चोव्हच्या जाहीरनाम्यानें सबंध जगांतच खळबळ उडवून दिली आहे. अत्यंत सामर्थ्यवान्, नियोजनाखालीं असलेल्या संघटनेचे ते प्रमुख असल्यामुळें ते येत्या वीस वर्षांच्या प्रगतीची आंखणी आत्मविश्वासानें करूं शकतात. ह्या जाहीरनाम्यांतील कार्यक्रम कितपत प्रत्यक्षांत उतरूं शकेल, आणि रशियाबाहेरच्या जगावर व आंतरराष्ट्रीय संबंधांवर त्याचा काय परिणाम होईल हे दोन महत्त्वाचे प्रश्न येथें उद्भवतात.

रशियन जनतेला आश्वासित अशा सवलतींपैकीं कांहीं सवलती आणि सुखसोयी आजहि कित्येक पाश्चात्त्य राष्ट्रांतून मिळत आहेत. पण रशियांत देऊं केलेल्या सवलतींचा आणि सुखसोईंचा बाहेरील जगावर राजकीय परिणाम होण्याचा संभव आहे. पाश्चात्त्य देशांतील राहणीचें मान अजून रशियांतील राहणीच्या मानापेक्षा चांगलें आहे. परंतु रशिया हळूहळू त्यांच्यामागून येऊन त्यांना गाठत आहे आणि पुढें जाण्याचा संभव आहे अशी तेथील जनतेची भावना झाली, म्हणजे रशियाचा प्रभाव वाढल्याविना राहणार नाहीं. रशियन गटांतील परिस्थिति तुलनेनें मागासलेली होती, तोंवर तो गट जगापासून अगदीं अलिप्त राहिला. पण, तुलनेनें रशियाचा फायदा होण्याची पाळी आली, म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकीय क्षेत्रांत रशिया त्याचा भरपूर फायदा उठवल्याविना राहणार नाहीं. रशियांतील आर्थिक स्थिति सुधारून प्रत्येक तरुण सुशिक्षित झाला, त्याला विश्रांति भरपूर मिळायला लागली, त्याची काळजी कमी झाली, त्याला इतर गोष्टी सुचूं लागल्या, म्हणजे तो जागृत होऊन क्रुश्चोव्हच्या जाहीरनाम्यांतील राजकीय हक्कांच्या उणीवा भरून काढील, अशी पाश्चात्त्य देशांना आशा आहे. रशियन कार्यक्रमाकडे उपहासानें पाहण्याचा काळ संपला असून, त्याच्या संभाव्य परिणामांची चिंता बाकीच्या जगाला आजच लागून राहिली आहे. क्रुश्चोव्हच्या ह्या जाहीरनाम्याचा अभ्यास प्रत्येक जबाबदार नागरिकानें करणें अगत्याचें आहे.

सोविएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या तिसऱ्या कार्यक्रमाचा मसुदा निकेता क्रुश्चोव्ह, ह्यांनीं १७ ऑक्टोबरला मॉस्कोंत भरलेल्या सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या २२ व्या अधिवेशनास सादर केला.

कार्यक्रमाच्या या मसुद्यांत नमूद करण्यांत आलें कीं, 'जो कम्युनिझम् एकेकाळीं निव्वळ छायेसमान भासत होता, तोच आधुनिक काळांतील सर्वांत मोठी शक्ति होऊन बसला आहे; पृथ्वीतलावरील व्यापक प्रदेशावर उभारल्या जाणाऱ्या समाजव्यवस्थेचा एक नमुना होऊन बसला आहे.'

### क्रांतीचा आढावा आणि रूपरेषा

पक्षाचा पहिला कार्यक्रम १९०३ सालीं भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनांत मंजूर करण्यांत आला होता, आणि दुसरा कार्यक्रम १९१९ सालीं भरलेल्या आठव्या अधिवेशनांत मंजूर करण्यांत आला होता. हे दोन्ही कार्यक्रम पूर्ण झालेले आहेत.

हा नवा, तिसरा कार्यक्रम म्हणजे समाजसत्तावादी उभारणींतील अनुभवाचें साररूपानें केलेलें विधायक समालोचन होय; त्यांत सबंध जगांतील क्रांतिकारक चळवळीचा आढावा घेण्यांत आलेला आहे; आणि पक्षाच्या सामुदायिक मतविचारांची अभिव्यक्ति म्हणून त्यांत कम्युनिस्ट उभारणीच्या प्रमुख टप्प्यांची व ठळक ठळक अशा प्रमुख कार्यांची निश्चित् रूपरेषा मांडलेली आहे.

सोविएत युनियनमध्यें कम्युनिस्ट समाजव्यवस्था उभारणें हें सोविएत जनतेचें महान् ऐतिहासिक कार्य असून हें कार्य जगांतील समग्र समाजसत्तावादी व्यवस्थेचें, आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचें व अखिल मानवजातीचें हित लक्षांत घेऊन पार पाडावयाचें आहे, असें सोविएत कम्युनिस्ट पक्ष मानतो.

आज जगांत समाजसत्तावादी समाजव्यवस्था नांदते आहे ही वस्तुस्थिति आहे, आणि समाजसत्तावादी व्यवस्थेच्या निर्मितीचें शास्त्र प्रत्यक्ष उपयोगाच्या कसोटीला उतरलें आहे. समाजसत्तावादाकडे नेणारा हमरस्ता बांधून झाला आहे आणि आज ना उद्यां सर्व लोक याच मार्गानें जाणार आहेत.

श्रम आणि भांडवल यांच्यामधील परस्परविरोध, जनता आणि मक्तेदार यांच्यामधील परस्परविरोध, वाढता लष्करवाद, वसाहतवादी राजवटींचा मोड, साम्राज्यशाही देशांतील परस्परविरोध, नवीं राष्ट्रें आणि जुनीं वसाहतवादी राष्ट्रें यांच्यांतील झगडे व परस्परविरोध आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागतिक समाजसत्तावादाची झपाट्यानें होणारी वाढ; या सर्व घटनांमुळें साम्राज्यवादाचा नाश होऊं लागला आहे, तो क्षीण होऊन कोलमडण्याच्या पंथाला लागला आहे.

### कम्युनिझमची व्याख्या

कार्यक्रमाच्या मसुद्याचा दुसरा भाग हा 'सोविएत युनियन कम्युनिस्ट पक्षाचीं कम्युनिस्ट समाज–रचनेंतील कार्यें' या नांवाचा असून त्यांत कम्युनिझमची पुढील व्याख्या दिली आहे.

'उत्पादनाचीं साधनें एकाच् प्रकारच्या सार्वजनिक मालकी हक्काखालीं असलेली आणि समाजाच्या सर्व सदस्यांना पूर्ण सामाजिक समानता देणारी वर्गरहित समाजपद्धति म्हणजे कम्युनिझम् होय. या समाजव्यवस्थेंत विज्ञानांतील व तंत्रशास्त्रांतील सतत होणाऱ्या प्रगतीच्या योगें उत्पादनशक्तींची वाढ केली जाईल, त्याचबरोबर लोकांचा सर्वांगीण विकास साधला जाईल; सार्वजनिक संपत्तीचे सर्व ओघ घळाघळा वाहावयाला लागतील, आणि 'प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीनुसार काम आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार पुरवठा' या महान् तत्त्वाची अंमलबजावणी केली जाईल. स्वतंत्र, सामाजिक दृष्ट्या जागृत अशा कामकरी उच्च प्रतीची संघटित समाजव्यवस्था म्हणजे कम्युनिझम् होय. त्यांत लोकांचें स्वराज्य प्रस्थापित केलें जाईल, त्यांत समाजाच्या कल्याणासाठी काम करणें ही प्रत्येकाची आद्य जिव्हाळ्याची आवश्यकता होऊन राहील. ही आवश्यकता प्रत्येक जण मान्य करील आणि प्रत्येक माणसाची कुवत जनतेच्या कल्याणासाठी वापरली जाईल.'

सोविएत युनियनमध्यें कम्युनिझमची उभारणी करण्यासंबंधीं कामांच्या क्रमशीर अवस्था या कार्यक्रमाच्या मसुद्यांत दर्शविण्यांत आल्या आहेत.

१९६१ ते १९७० या चालू दशकांत कम्युनिझमसाठी भौतिक व तंत्रविषयक आधार तयार करून सोविएत युनियन, अमेरिका या सर्वांत बलाढ्य व समृद्ध अशा भांडवलशाही देशाला दरडोई

संहतिः कार्यसाधिका ।

## रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय :—
'गुरुकृपा', महात्मा गांधी रोड, रत्नागिरी.

शाखा : १ सावंतवाडी, २ कुडाळ, ३ कणकवली, ४ चिपळूण व ५ दापोली.

चेअरमन :—श्री. बी. जी. खातू, बी. ए., एलएल. बी., चिपळूण.

व्हाईस चेअरमन :—श्री. एस. एल. पेंजे, बी. ए., रत्नागिरी.

| | | |
|---|---|---|
| एकूण शेअर भांडवल | रु. | ३,६०,८०० |
| एकूण ठेवी | रु. | ३५,५१,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ५६,५०,००० |

या बँकेमध्यें गुंतविलेला सर्व पैसा जिल्ह्यांतील सहकारी चळवळीच्या अभ्युदयासाठीच वापरला जातो.

म. चिं. सांखळकर
मॅनेजर.

---

रजिस्टर नं. ७११८. स्थापना १९३५

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मार्गेज बँक लि., कराड

शाखा ऑफिसः—
सातारा व फलटण

शेतकरी बांधवांच्या सोईकरितां लवकरच वाई, वडूज, येथें नव्या शाखा उघडणार.

इंजिन, इलेक्ट्रिक मोटर्स, नवीन विहीर, विहीर दुरुस्त, तगाईचे अर्ज देखील याच बँकेंत दिले जातात. तारण व कारण योग्य असल्यास दीर्घ मुदतीचें भांडवली कर्ज भरपूर मिळून व्याजहि सवलतीचें आहे.

**कर्ज काढा : जमीन सुधारा : उत्पादन वाढवा**

सातारा व सांगली जिल्ह्यांतील सर्व शेतकरी बांधवांना हें नवीन वर्ष सुखाचें जावो.

| | | |
|---|---|---|
| बँकेचें अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| शेअर भांडवल (खपलेलें भांडवल) | रु. | ३,८५,००० |
| रिझर्व्ह फंड ( गंगाजळी ) | रु. | ८९,५०० |
| सन १९६०-६१ सालीं वाटलेलें कर्ज | रु. | ११,४५,४०० |
| बँकेचें खेळतें भांडवल | रु. | ६७,१३,६०० |
| चालू सालचा नफा | रु. | ११,४७३ |

ऑडिट वर्ग 'अ'

म. सि. पुटाणी, मॅनेजर
नी. आ. कल्याणी, चेअरमन

---

ही दिवाळी बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाची जावो!

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

स्थापना—१९३५ ] फोन—५३ [ तार—'अर्बन बँक'

मुख्य कार्यालय—हरभटपथ, सांगली
शाखा—माधवनगर, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें व वसूल भांडवल | रु. | १,०४,८५० |
| गंगाजळी | रु. | १,८४,४०० |
| इतर निधी | रु. | १,७५,६१४ |
| ठेवी | रु. | ५३,००,००० |

तपासणी वर्गः—'अ'

— वैशिष्ट्यें —

★ मौल्यवान् जिनसांचे सुरक्षिततेसाठी दोनहि कार्यालयांत लॉकर्सची सोय.
★ सर्वांच्या सोयीची बचत ठेवींची योजना
★ चांगल्या व्याजानें मुदतीच्या व अन्य ठेवी स्वीकारल्या जातात.
★ शेअर्स खरेदी-विक्रीचे व्यवहाराची सोय.
★ हुंड्या, बिलें, चेक्स, पेन्शन व इतर सरकारी बिलांच्या वसुलीचें काम केलें जातें.
★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

श्री. वि. ह. माईणकर, B. Sc., LL. B. अध्यक्ष.
श्री. ल. य. लागू, B. A., LL. B. मॅनेजर.

---

सेवा व सुरक्षितता यांसाठी

## श्री वीरशैव को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

(स्थापना १९६१)

हेड ऑफिस : कोल्हापूर.
ब्रँच : गडहिंग्लज

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,१५,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,१५,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु. | ६१,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | ११,८७,०३८ |

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा आपल्या बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

व्याजाचे आकर्षक दर

चालू १%
सेव्हिंग्ज १%
मुदत ठेव १% ते ४½

इतर सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

S. D. Ghali, बी. ए., बी. कॉम्, एलएल. बी. मॅनेजर
S. V. Nashte, अध्यक्ष

उत्पादनांत मागें टाकील; लोकजीवनाचा, लोकांचा सांस्कृतिक व तंत्रविषयक दर्जा भरपूर सुधारेल; प्रत्येकाला सुखावह वातावरणांत राहतां येईल; सर्व सामुदायिक व सरकारी शेतें अत्यंत उत्पादनशील व किफायतशीर उत्पादनक्षेत्रें ठरतील. सुव्यवस्थित निवासस्थानांची लोकांची मागणी बहुतांशीं भागविली जाईल. सक्तर अंगमेहनतीचें काम उरणार नाहीं; सोविएत युनियन हा जगांतील सर्वांत कमी कामाच्या तासांचा दिवस असलेला देश ठरेल.

१९७१ ते १९८० या पुढच्या दशकांत कम्युनिझमसाठी भौतिक व तंत्रविषयक आधार तयार केलेला असेल आणि साऱ्या लोकांसाठी भौतिक व सांस्कृतिक सुखसोई भरपूर प्रमाणांत उपलब्ध होतील. सोविएत समाज अशा अवस्थेला पोहोंचेल कीं, लोकांच्या गरजांनुसार पुरवठ्याचें तत्त्व अमलांत आणणें शक्य होईल आणि सारी मालमत्ता हळूहळू एकाच स्वरूपाच्या मालकीची, सार्वजनिक मालकीची, होत जाईल.

अशा प्रकारें कम्युनिस्ट समाजाची उभारणी सर्वसाधारणपणें सोविएत युनियनमध्यें केली जाईल. नंतरच्या काळांत कम्युनिस्ट समाजाची उभारणी पूर्ण केली जाईल, असें या मसुद्यांत म्हटलें आहे.

### कार्यक्रमांतील योजना

कार्यक्रमाच्या मसुद्यांत पुढील योजना आहेत : चालू १० वर्षांत ( १९६१-१९७० ) एकूण औद्योगिक उत्पादन सुमारें १५० टक्के वाढविणें आणि अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादनाची सध्यांची पातळी ओलांडणें. २० वर्षांच्या काळांत औद्योगिक उत्पादन ५०० टक्के इतकें तरी वाढविणें आणि सध्यांच्या अमेरिकेंतल्या एकंदर औद्योगिक उत्पादनाला फार मागें टाकणें.

विजेच्या उत्पादनाच्या विकासाला अग्रहक्क देण्याचें कार्य या मसुद्यांत मांडलें आहे. दुसऱ्या दशकाच्या अखेरीस साऱ्या देशाचें विद्युतीकरण एकंदरीत पूर्ण केलें जाईल. पहिल्या दशकाच्या अखेरीस विजेचें वार्षिक उत्पादन ९०० अब्ज ते १००० अब्ज किलोवाट-तास इतकें झालें पाहिजे आणि दुसऱ्या दशकाच्या अखेरीस तें २७०० अब्ज ते ३००० अब्ज किलोवाट-तास इतकें झालें पाहिजे.

२० वर्षांच्या काळांत लोह-धातू-कारखाने वर्षाकाठीं २५ कोटी टन पोलाद तयार करण्याइतक्या पातळीला पोहोंचतील.

लोकांच्या व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या शेतकीच्या मालाच्या गरजा पूर्णपणें भागविण्यासाठी शेतकीचें उत्पादन दहा वर्षांत सुमारें १५० टक्के वाढविलें पाहिजे आणि २० वर्षांत २५० टक्के वाढविलें पाहिजे. पहिल्या दशकांत सोविएत युनियन अमेरिकेला मुख्य शेतकी-मालाच्या दरडोई उत्पादनांत मागें टाकील.

सामुदायिक व सरकारी शेतें हीं त्यांच्या उत्पादनसंबंधांमुळें, श्रमाच्या स्वरूपामुळें आणि तेथील लोकांच्या जीवनाच्या व संस्कृतीच्या दर्जामुळें कम्युनिस्ट धर्तीचीं उत्पादन-क्षेत्रें बनतील.

मसुद्यांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, शहरी आणि ग्रामीण विभागांतील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक तफावती आणि त्यांच्या लोकजीवनांतील फरक दूर करणें, हा कम्युनिस्ट उभारणीचा एक सर्वांत मोठा विजय होय.

### लोकजीवनाचा दर्जा

कोणत्याहि भांडवलशाही देशांतील लोक-जीवनाच्या दर्जाहून उच्चतर लोक-जीवनाचा दर्जा साध्य करण्याचें कार्य पक्ष मांडीत आहे.

हें साध्य करण्यासाठी पुढील गोष्टी कराव्या लागतील :

( अ ) कामाच्या प्रमाणानुसार व दर्जानुसार कामगारांच्या पगारांत वाढ करणें; त्याचबरोबर मालाच्या किरकोळ किंमतींत कपात करणें आणि लोकांवरील कर रद्द करणें.

( ब ) समाजाच्या घटकांत वांटल्या जाणाऱ्या सार्वजनिक फंडांत वाढ करणें, त्यांत त्यांच्या कामाचें प्रमाण व दर्जा कांहींहि असो, त्यांना शिक्षण, वैद्यकीय सोयी, पेन्शन, बाल-संस्थांत बालकें ठेवण्याच्या सोयी, सार्वजनिक सुखसोयी, वगैरे मोफत मिळणें.

सोविएत युनियनचें राष्ट्रीय उत्पन्न येत्या १० वर्षांत सुमारें १५० टक्के वाढेल आणि २० वर्षांत सुमारें ४०० टक्के वाढेल. दरडोई वास्तविक उत्पन्न २० वर्षांत २५० टक्क्याहून वाढेल.

आगामी काळांत मालपुरवठ्याच्या कम्युनिस्ट तत्त्वाचा पुरेपूर अवलंब करतां येईल अशी भौतिक तरतूद दुसऱ्या दशकांत केली जाईल.

येत्या दहा वर्षांच्या काळांत देशांत ६ तासांचा कामाचा दिवस राहील, आठवड्यांत एक दिवस रजा राहील किंवा ३४-३६ तासांचा आठवडा व दोन दिवसांची रजा राहील, आणि भूगर्भांत काम करणाऱ्या व आरोग्याला हानिकारक असें काम करणाऱ्या लोकांना ५ तासांचा कामाचा दिवस राहील किंवा ३० तासांचा, पांच दिवसांचा आठवडा राहील. दुसऱ्या दशकांत कामाचा आठवडा याहूनहि अधिक कमी करण्याला सुरुवात केली जाईल.

अशा प्रकारें सोविएत युनियनमध्यें जगांतला सर्वांत कमी तासांचा कामाचा दिवस असेल आणि त्याच्याबरोबर तो सर्वांत अधिक उत्पादनशील व सर्वांत अधिक मोबदल्याचा कामाचा दिवस असेल.

कामाचा दिवस कमी करण्याबरोबरच कामकरी लोकांना वार्षिक भरपगारी रजा वाढत्या मुदतीची दिली जाईल.

२० वर्षांअखेरीस सार्वजनिक सुखसोईसाठी खर्च होणारी रक्कम ही जनतेच्या एकंदरीत वास्तविक उत्पन्नाच्या निम्म्यानें असेल. मसुद्यांत असें म्हटलें आहे कीं, यामुळें सार्वजनिक खर्चानें मुलांच्या संस्थांत व वसतिगृहांत ( पालकांची इच्छा असल्यास ) मुलांना मोफत ठेवतां येईल. अपंग व्यक्तींचा निर्वाह मोफत केला जाईल. सर्व शिक्षण-संस्थांत मोफत शिक्षण दिलें जाईल. सर्व नागरिकांसाठी औषधांसह मोफत वैद्यकीय व्यवस्था केली जाईल, आजाऱ्यांवर विश्रांतीस्थानांत उपचार केले जातील; भाडें द्यावें न लागतां राहण्यासाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाईल, आणि सार्वजनिक सुखसोई मोफत पुरविल्या जातील; सार्वजनिक वाहतूक मोफत होईल, रजा घालविण्यासाठी आरामगृहांची, भोजनगृहांची, व प्रवासी शिबिरांची व्यवस्था अंशतः मोफत केली जाईल व अशा आरामगृहांचा, भोजनगृहांचा व प्रवासी शिबिरांचा दर हळूहळू कमी कमी केला जाईल. लोकांना सतत वाढत्या प्रमाणावर सुखसोई, सवलती आणि शिष्यवृत्त्या (अविवाहित मातांना मदत) दिल्या जातील, कारखान्यांत व संस्थांत आणि सामुदायिक शेतांवर ( मधल्या वेळेचें ) जेवण मोफत देण्याची व्यवस्था हळूहळू जारी केली जाईल.

### सर्व वर्ग नाहींसे होणार

कार्यक्रमाच्या मसुद्यांत म्हटलें आहे, समाजसत्तावादाला म्हणजे कम्युनिझमच्या पहिल्या अवस्थेला संपूर्ण व अंतिम विजय मिळवून दिल्याकारणानें, कम्युनिझमच्या सर्वकष उभारणीसाठी समाजाचें

संक्रमण काळ्याकाळाने कामगारवर्गीय हुकूमशाहीने आपले ऐतिहासिक कार्य परिपूर्ण केले आहे, आणि आतां अंतर्गत विकासाच्या दृष्टीने पाहतां, सोविएत युनियनमध्ये कामगारवर्गीय हुकूमशाही अपरिहार्य राहिलेली नाही. कामगारवर्गीय हुकूमशाही शासनसंस्था म्हणून उद्भवलेली शासन-व्यवस्था आज समग्र जनतेची शासन-व्यवस्था बनून राहिली आहे. समग्र जनतेचे हितसंबंध आणि इच्छा-आकांक्षा व्यक्त करण्याचें एकमेव साधन बनली आहे.

कम्युनिझमचा संपूर्ण विजय होईपर्यंत समग्र लोकांना वेढणारी संघटना या नात्यानें शासनसंस्था अस्तित्वांत राहीलच. एकदा कम्युनिझमची उभारणी झाली कीं, समाजाचा पुढारी म्हणून कामगारवर्गाचें जीवितकार्य संपेल आणि सर्वच वर्ग नाहीसे होतील.

समाजसत्तावादी शासनसंस्था जसजशी विकसित होत जाईल, तसतशी क्रमशः सार्वजनिक अशा स्वयं-शासित कम्युनिस्ट सरकारांत परिणत होऊन सर्व सोविएतें, कामगार-संघटना, सहकारी संघटना आणि जनतेच्या इतर सर्व व्यापक संघटना तिच्या कक्षेंत येतील.

लोकांच्या प्रतिनिधित्वाचे प्रकार पूर्णत्वास नेणें व सोविएत निवडणूकव्यवस्थेतील लोकशाहीवादी तत्त्वांचा विकास करणें आवश्यक आहे, असें सोविएत कम्युनिस्ट पक्षाला वाटतें.


दि नांदेड डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक, लि.

मुख्य कचेरी :
स्टेशन रोड, नांदेड ( मराठवाडा )
चेअरमन : श्री. शामराव कदम, एम. एल. सी.

३०-८-१९६१ रोजींची आर्थिक परिस्थिति

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ५०.०० | लक्ष रु. |
| वसूल शेअर भांडवल | १५.२४ | ,, |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | २.२८ | ,, |
| ठेवी | ३३.६७ | ,, |
| कर्जें | ९८.२८ | ,, |
| खेळतें भांडवल | १२६.६५ | ,, |

शाखा : देगलूर, किनवट, उमरी, कंधार, हदगांव, बिलोली, मुखेड आणि लोहा.

ठेवींवर आकर्षक व्याजाचे दर

ह्या बँकेंत ठेवलेला पैसा शेतीच्या व औद्योगिक सहकारी उपक्रमांना उपयोगी पडतो.

एम. एस. कुलकर्णी
मॅनेजर

दि धुळें डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

टेलिफोन : ९७ ] धुळें [ तार : Westcobank

मुख्य कचेरी
गरुड बाग, धुळें

चेअरमन : श्री. ज. दौ. ऊर्फ दादासाहेब राऊळ, एलएल. बी.

ह्या बँकेंत ठेवलेला पैसा सबंध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना आणि सहकारी तत्त्वावर स्थापलेल्या लहान उद्योगधंद्यांना उपयोगी पडतो.

ऑडिट वर्ग – " अ "

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३६,२३,००० |
| ठेवी | रु. | १,४४,५४,३२१ |
| कर्जें | रु. | २,५८,०४,१०३ |
| खेळतें भांडवल | रु. | २,७०,२१,९६३ |

सबंध जिल्ह्यांत मिळून एकूण
२२ शाखा

जी. क्यु. शेख,
मॅनेजर.

नवीन माल : : : : : योग्य किंमत

☆ जरीचीं लुगडीं, साड्या, सुंदर बनारसी शालू ☆

व

—सर्व मिलचा माल—

याकरितां

शाहाडे आठवले प्रा. लि., दादर

मुंबई २८.

( टे. नं. ६०१९४ )

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांची पाहणी

## त्यांचा व्याप व कार्यक्षमता वाढविण्यासाठी कांहीं सूचना

१९५७ च्या ऑगस्ट महिन्यांत त्या वेळच्या मुंबई राज्यांतील कोऑपरेटिव्ह अर्बन बँकांची परिषद् भरविण्यांत आली होती. अर्बन कोऑपरेटिव्ह बँकांच्या कार्यासंबंधी पाहणी करण्यांत यावी अशी शिफारस परिषदेनें केली होती. त्याप्रमाणें १९५८–५९ सालीं ही पाहणी करण्यांत आली. रिझर्व्ह बँकेनें ह्या पाहणीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. छोट्या उद्योगधंद्यांना द्रव्यसाह्य देण्याच्या कामीं अर्बन कोऑपरेटिव्ह बँकांची संघटना, त्यांची कामाची पद्धत आणि कार्य ह्यांचा कितपत उपयोग होतो ह्याचा अभ्यास करण्यासाठी ही पाहणी करण्यांत आली होती. पाहणींत १० राज्यांतील ९३ अर्बन बँकांचा आणि मध्यवर्ती सरकारच्या शासनाखालीं असलेल्या एका बँकेचा समावेश करण्यांत आला होता. ह्या बँकेचे सभासद असलेल्या औद्योगिक व बिगर-औद्योगिक सभासदांची नमुना पाहणीहि त्याच वेळीं करण्यांत आली. पाहणींत असें दिसून आलें कीं, १९५५–५६ ते ५७–५८ ह्या तीन वर्षांच्या कालांत अर्बन बँकांच्या सभासदांची संख्या सरासरीनें २० टक्क्यांनीं वाढली. परंतु बँकांच्या कार्यक्षेत्रांतील लोकसंख्येच्या मानानें ही वाढ ५ ते १५ टक्के झाली असल्याचें दिसून आलें. बँकांच्या सभासदांची संख्या वाढविण्यास अजून पुष्कळ वाव असल्याचें ह्यावरून स्पष्ट होतें. बँकांच्या सभासदांपैकी ५७ टक्के सभासद व्यापार, व्यवसाय अगर नोकरी ह्यांत गुंतलेले होते. फक्त ८ टक्के सभासदच उद्योगधंद्यांत गुंतलेले होते.

### सरासरी खेळतें भांडवल

बँकांचें सरासरी खेळतें भांडवल ५·५५ लाख रु. पडलें. त्यांपैकी २२ टक्के भांडवल बँकेचें होतें, ७१ टक्के ठेवींच्या स्वरूपांत होतें, आणि कर्जाचे व्यवहार करणाऱ्या सहकारी व इतर संस्थांकडून घेतलेलें कर्ज भांडवल ७ टक्के होतें. मुंबई, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतील अर्बन बँकांतून सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवी मोठ्या प्रमाणावर आढळून आल्या. इतर राज्यांतून कायम ठेवींचें प्रमाण अधिक आढळून आलें. मद्रास आणि पश्चिम बंगाल राज्यांत चालू खात्यांतील ठेवींचें प्रमाण बरेंच आढळलें. सामान्यपणें, सभासद असलेल्या लोकांपेक्षा सभासद नसलेल्या लोकांनीं अधिक प्रमाणांत ठेवी ठेवल्याचें दिसून आलें. बहुतेक राज्यांतील व्यापारी बँका ठेवीवर ज्या दरानें व्याज देऊं करतात त्याच दरानें अर्बन बँकांनींहि व्याज देऊं केलेलें होतें. अर्बन बँकांनीं दिलेल्या आर्थिक मदतीचें स्वरूप मुख्यतः मुदतबंद कर्जाचें होतें. त्यांनीं दिलेल्या एकूण कर्जापैकी ७८ टक्के कर्जे अल्प मुदतीचीं होतीं. आसाम, मध्यप्रदेश आणि ओरिसा राज्यांतील बँकांनीं मध्यम मुदतीचीं कर्जे अधिक प्रमाणांत दिल्याचें आढळून आलें. कोणत्याहि बँकेनें दीर्घ मुदतीचीं कर्जे दिलेलीं नव्हतीं. एकूण कर्जापैकी ४८ टक्के कर्जे व्यक्तिशः तारणावर दिलेलीं होतीं. व्यापारी माल, सोनें–चांदी व स्थावर मालमत्ता ह्यांच्या तारणावर दिलेल्या कर्जाची टक्केवारी २० पेक्षा कमी होती. आसाम, मुंबई व म्हैसूर ह्या राज्यांत व्यक्तिशः तारणावर दिलेलीं कर्जे अधिक होतीं. आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा व पश्चिम बंगाल ह्या राज्यांतून स्थावर मालमत्तेच्या तारणावर अधिक कर्जे दिलेलीं होतीं. सोनें, चांदी व दागिने ह्यांच्या तारणावर दिलेल्या कर्जाचें प्रमाण केरळ व मद्रास राज्यांत अधिक दिसून आलें. व्यापारी मालाच्या तारणावर दिलेलीं कर्जे पंजाब व दिल्ली राज्यांतून अधिक प्रमाणांत दिसलीं. आंध्र प्रदेश, मद्रास, केरळ, ओरिसा, मध्यप्रदेश आणि आसाम ह्या राज्यांतून घरगुती अडचणींसाठी आणि पहिलें कर्ज फेडण्यासाठी देण्यांत आलेलीं कर्जे मोठ्या प्रमाणावर आढळलीं. व्यापारधंद्यांकरतां काढण्यांत आलेलीं कर्जे मुंबई, म्हैसूर, पंजाब व दिल्ली ह्या राज्यांतून मुख्यतः होतीं. पश्चिम बंगालमध्यें एकूण कर्जापैकी बराच मोठा हिस्सा औद्योगिक गरजेसाठी घेण्यांत आला होता.

### थकबाकीचें प्रमाण

आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा, मध्य प्रदेश, पंजाब आणि दिल्ली ह्या राज्यांतून थकबाकीचें प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक होतें. आंध्र प्रदेश, मद्रास, म्हैसूर आणि केरळ ह्या राज्यांतून हें प्रमाण १० ते ४० टक्केपर्यंत आढळून आलें. मुंबई राज्यांत हें प्रमाण सगळ्यांत कमी म्हणजे ९ टक्के होतें. आसाम व पश्चिम बंगाल सोडून इतर राज्यांत बऱ्याच येथें कर्जावरील व्याजाचे दर ७ ते ९ टक्क्यांपर्यंत होते. आसाम व पश्चिम बंगालमधील बऱ्याच येथें कर्जावरील व्याजाचे दर ९ ते १२ टक्केपर्यंत आढळले. आंध्र प्रदेश, मद्रास, आसाम व पश्चिम बंगाल ह्या राज्यांत कांहीं कर्जावरील व्याजाचे दर १२ टक्क्यांपेक्षा अधिक दिसून आले. बँकांनीं केलेल्या गुंतवणुकीपैकी ६१ टक्के गुंतवणूक सरकारी रोख्यांत होती; त्याच्या खालोखाल मुदतबंद ठेवींत केलेल्या गुंतवणुकीची टक्केवारी २० टक्के होती. १९५५–५६ मध्यें बँकांचें सरासरी उत्पन्न रु. २५,४०० होतें तें १९५७–५८ सालीं रु. ३२,००० झालें. टक्केवारीच्या भाषेंत ही वाढ २६ टक्के होते. मुंबई राज्यांत सरासरी उत्पन्न सगळ्यांत अधिक म्हणजे रु. ७९,६०० होतें. इतर राज्यांत सरासरी उत्पन्न रु. ३०,००० पेक्षा कमी होतें. सरासरी उत्पन्नाच्या वाढीबरोबरच बँकांच्या सरासरी खर्चातहि वाढ झाली. १९५७–५६ सालीं सरासरी खर्च रु. १९,६०० होता तो १९५७–५८ सालीं रु. २४,६०० पर्यंत वाढला. म्हणजे सरासरी खर्चात २५·५ टक्के वाढ झाली. तरी सुद्धां बँकांच्या सरासरी नफ्यांत वाढ झाली. १९५५–५६ सालीं सरासरी नफा रु. ५,९०० होता. तो १९५७–५८ सालीं रु. ७,४०० झाला. नफ्यांतील वाढ सुमारें २५ टक्के भरते. बहुतेक राज्यांतून बँकांचें ऑडिट करण्याची व्यवस्था पुरेशी आढळून आली. बँकांच्या कारभाराचें निरीक्षण करण्याची व्यवस्था मात्र पुरेशी नव्हती अगर एकसारखीहि नव्हती. बहुतेक अर्बन बँकांना स्वतःच्या मालकीच्या इमारती नव्हत्या. त्यामुळें रोख रक्कम सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनीं केलेल्या व्यवस्था फारशा समाधानकारक नव्हत्या.

### कर्जाऊ दिलेल्या रकमा

बँकांचे सभासद असलेल्या औद्योगिक सभासदांनीं जितकें कर्ज घेतलें होतें, त्यांपैकी ५२ टक्के कर्ज व बिगर–औद्योगिक सभासदांनीं घेतलेल्या एकूण कर्जापैकी ७० टक्के कर्ज अर्बन बँकांनीं दिलेलें आढळून आलें. औद्योगिक सभासदांनीं घेतलेलें बहुतेक कर्ज उद्योगधंद्यासाठी व व्यापारासाठी घेतलेलें होतें. बिगर-औद्योगिक सभासदांनीं घेतलेल्या कर्जापैकी ७० टक्क्याइतकें कर्ज व्यापार–व्यवसायासाठी घेतलें होतें. बाकीचें घरगुती व इतर कारणांसाठी घेतलेलें होतें. औद्योगिक सभासदांनीं घेतलेल्या

कर्जांपैकी ४८ टक्के कर्जे वैयक्तिक तारणावर, ३९ टक्के मालाच्या तारणावर आणि १५ टक्के स्थावर मिळकतीच्या तारणावर घेतलेलें होतें. बिगर–औद्योगिक सभासदांनी घेतलेल्या कर्जांची वर्गवारीप्रमाणें केलेली टक्केवारी ७०, ५ व १३ अशी होती. १९५७-५८ सालीं पुढील राज्यांतून अर्बन बँकांनीं छोट्या उद्योगधंद्यांना कर्जे दिल्याचें आढळून आलें. मुंबई, केरळ, मद्रास, म्हैसूर, पंजाब, दिल्ली आणि पश्चिम बंगाल. औद्योगिक सभासद उद्योगधंद्यांतील आपल्या कायम स्वरूपाच्या भांडवलासाठी बहुतेक स्वतःच्याच बळावर विसंबून असलेले दिसून आले. औद्योगिक सभासदांच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा आंध्र प्रदेश, मुंबई, केरळ, मध्यप्रदेश आणि मद्रास राज्यांतून व्यापारी बँकांनीं बऱ्याच प्रमाणांत भागविल्या. आसाम राज्यांतील औद्योगिक सभासदांच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा मुख्यत: सावकारांनीं व व्यापाऱ्यांनीं भागविल्या. पंजाब व दिल्ली राज्यांत सावकारांनीं व व्यापाऱ्यांनीं औद्योगिक सभासदांच्या खेळत्या भांडवलाच्या ८६ टक्के गरजा भागविल्या. छोट्या उद्योगधंद्यांना पैसे पुरविण्याच्या कामीं अर्बन बँका सध्यां फारशी महत्त्वाची कामगिरी करीत नाहींत. तथापि, शहरांतून निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे करणाऱ्या व्यक्तींच्या गरजा भागविण्याच्या कामीं त्या उपयुक्त ठरतात. १९५६ सालीं स्मॉल स्केल इंडस्ट्रीज बोर्डानें एक सबकमिटी नेमली होती. छोट्या उद्योगधंद्यांना अर्बन बँकांकडून द्रव्यसाह्य मिळण्यासाठी कमिटीनें तपशीलवार शिफारशी केलेल्या आहेत. तथापि त्यांची अंमलबजावणी अद्याप नीटशी झालेली नाहीं.

### को–ऑपरेटिव्ह अर्बन बँकिंगचें चित्र

एकंदरीनें असें दिसतें कीं, कोऑपरेटिव्ह अर्बन बँकांचें देशभर पसरलेलें जाळें वाढत आहे आणि तें आर्थिक दृष्ट्या मजबूत आहे. देशाच्या बऱ्याच मोठ्या भागांतील बँकिंगच्या व्यवसायांत ह्या बँकांना महत्त्वाचें स्थान आहे. तथापि, त्यांची वाढ व विकास सर्वच राज्यांत एकसारखी होतील असें नाहीं. कांहीं राज्यांत त्यांची फारशी प्रगति झालेली नाहीं. सध्यां देशाचा आर्थिक विकास व औद्योगीकरण ह्यांची गति खूप वाढत आहे. भविष्यकाळांत शहरांतून बँकिंगच्या सोयींची मागणी अधिकाधिक जोरानें करण्यांत येईल ह्यांत शंका नाहीं. ही मागणी जसजशी वाढेल तसतसें अर्बन बँकांना शहरांतील लोकांच्या द्रव्यविषयक गरजा भागविणें भाग पडूं लागेल. मजबूत आणि समाधानकारक कोऑपरेटिव्ह बँकिंगचा विकास घडवून आणण्याच्या कामीं शहरांतील सहकारी संघटना महत्त्वाची मदत करूं शकतील. म्हणून, अर्बन बँकांची स्थापना व वाढ होण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करणें अगत्याचें आहे. ह्या बाबतींत कांहीं सूचना करतां येण्यासारख्या आहेत.

### कांहीं सूचना

(१) नव्या नव्या ठिकाणीं अर्बन बँकांची स्थापना करण्यास कितपत वाव आहे तें अजमावण्यांत यावें.

(२) अर्बन बँकांच्या चालकांनीं सभासदांची संख्या वाढविण्याचे, त्यांच्या कामांत विविधता आणण्याचे आणि त्यांना अधिक सोयी–सवलती उपलब्ध करून देण्याचे खास प्रयत्न केले पाहिजेत.

(३) आपल्या निरनिराळ्या तऱ्हेच्या सभासदांना त्यांच्या गरजांप्रमाणें कर्जे देतां यावीं म्हणून अर्बन बँकांनीं कर्जे देण्याबाबतचें धोरण अधिक दूरगामी व विविधतापूर्ण ठेवलें पाहिजे.

(४) अर्बन बँकांची कार्यपद्धति कार्यक्षम आणि बळकट पायावर उभारण्यांत यावी. त्यासाठी व्यापावर फाजील भर देण्यांत येऊं नये, हिशेबांत काटेकोरपणा ठेवण्यांत यावा आणि थकबाकी टाळण्याकडे व कमी करण्याकडे लक्ष देण्यांत यावें.

(५) सभासदांनीं आपसांतील संबंध वाढविण्याचे प्रयत्न सतत करावे.

(६) लोकप्रियता वाढविण्यासाठी व लोकांचा विश्वास वाढविण्यासाठी बँकांना अधिक चांगल्या इमारती असाव्या.

(७) राज्य सरकारांनीं बँकांचें ऑडिट, इन्स्पेक्शन व सुपरव्हिजन ह्यांच्या बाबतींत पुरेशी व्यवस्था करावी. जरूर पडली तर त्यांना खास सवलती द्याव्या व मदत करावी.

ह्यासंबंधीं स्मॉलस्केल इंडस्ट्रीज बोर्डाच्या सबकमिटीनें व १९५९ मध्यें हैद्राबाद येथें भरलेल्या परिसंवादानें उपयुक्त शिफारसी केलेल्या आहेत. तथापि, अर्बन बँकांच्या विकासाचा सर्व भार राज्य सरकारांनीं स्वतःच्या अंगावर घेणें शक्य होणार नाहीं; खुद्द बँकांनीच प्रगतिशील वृत्ति स्वीकारली पाहिजे; आपल्यापुढील प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे; अनुभवांची देवाणघेवाण केली पाहिजे आणि अनेक रीतींनें परस्परांना मदत केली पाहिजे.

---

### युरोपच्या पार्लमेंटसाठीं जागा

युरोपच्या पार्लमेंटसाठी बेल्जमनें ७४० एकर जागा देऊ केली आहे. ह्या जागेवर युरोपच्या पहिल्या पार्लमेंटची इमारत बांधण्यांत येणार आहे. त्याशिवाय १०,००० मुलकी नोकरांना काम करतां येईल अशी एक भव्य कचेरीहि बांधण्यांत येणार आहे. युरोपियन सामायिक बाजारपेठेंत सध्या सामील असलेल्या सहा देशांचा व्यापारी कारभार सुसूत्र चालवितां यावा म्हणून ही तयारी करण्यांत येत आहे. ह्या योजनेला युरोपियन कारभार केंद्र असें नांव देण्यांत आलें असून पश्चिम युरोपच्या आर्थिक एकीकरणाची ही नांदी ठरण्याचा संभव आहे. सामायिक बाजारपेठेंत ब्रिटन सामील झाल्यास एकीकरणाला जोराची चालना मिळेल.


## धी कल्याण पीपल्स

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कल्याण

[ मुख्य ऑफिस :—कल्याण ]

शाखा :—डोंबिवली व अंबरनाथ.

( स्थापना : ४ जून, १९२३ )

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. ३,४५,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ३,५३,१०० |
| खेळतें भांडवल | रु. २४,६३,४०० |

★ सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

★ सरकारी कर्जरोखे, सोनें, चांदी, धान्य, कोळसा, घरें, यांच्या तारणावर सभासदांना कर्जे दिलीं जातात.

★ मुंबई को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन पुरस्कृत म्यूच्युअल ॲरेंजमेंट स्कीमची बँक सभासद आहे. त्यामुळें मुंबई राज्यांतील बहुतेक महत्त्वाच्या ठिकाणांवर ड्राफ्टस दिले जातात.

★ भारतांतल्या कोठल्याहि गांवावरील हुंड्या, चेक व बिलें वसुलीकरितां स्वीकारलीं जातात.

डॉ. भा. का. मोडक — मॅनेजिंग डायरेक्टर

ग. कृ. फडके — चेअरमन

गो. रा. करमाळकर — मॅनेजर

# सहकारी चळवळीचीं संपत्ति साधनें

## सोसायट्यांमध्यें अल्पबचत गुंतविली जाण्यांतील अडचणी

चालू शतकाच्या प्रारंभीं भारतांत सहकारी चळवळीला सुरवात करण्यांत आली. ह्या चळवळीचे हेतु मुख्यत दोन होते:—शेतकऱ्याला त्याच्यावर असलेल्या कर्जाच्या भारांतून मुक्त करणें आणि स्थानिक संघटनांकरवी त्याला पतीवर कर्जाचा पुरवठा करणें. हा पुरवठा करतांना काटकसर, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची इच्छा आणि परस्परांना मदत ह्या गुणांवर भर देण्यांत आला. त्यानंतरच्या काळांत भारतांत सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वरूपाचे अनेक बदल झालेले आहेत. आतां भारत नियोजित विकासाच्या तिसऱ्या अवस्थेंत आहे. १९२६-२८ सालीं भारतांत आलेल्या रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर ह्या मंडळाला सर हेरेस प्लंकेट ह्यांनीं शेतकींतील सहकारासंबंधीं कांहीं सूचना केल्या होत्या. त्या ह्या संबंधांत लक्षांत घेण्यासारख्या आहेत. पश्चिम युरोपांतील देशांतून शेतीमधील सहकाराचा पुरस्कार करणारांत ते अग्रगण्य होते. १९२६ सालीं बेंब्ले ह्या ठिकाणीं ब्रिटिश साम्राज्यांतील सहकारी शेतीविषयीं एक परिषद् भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेला सर होरेस प्लंकेट ह्यांनीं एक निवेदन सादर केलें होतें. ह्या निवेदनांत शेतीच्या भरभराटीस आवश्यक असणाऱ्या तीन गोष्टींचा त्यांनीं उल्लेख केलेला आहे. त्या अशा:—

### शेतीच्या उत्कर्षाला आवश्यक गोष्टी

(१) राजशासनाच्या नेतृत्वाखालीं शेतकीविषयक शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करण्यांत आला पाहिजे, (२) धंदा करण्याच्या दृष्टीनें शेतकऱ्यांची ऐच्छिक सहकारी संघटना उभारण्यांत आली पाहिजे, आणि (३) शहरें आणि खेडीं ह्यांच्यामधील आकर्षणांत सध्यां जी तफावत आहे ती नाहींशी करण्याच्या दृष्टीने ग्रामीण जीवनाची पुनर्घटना करण्यांत आली पाहिजे. सर होरेस प्लंकेट ह्यांनीं ज्या दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहिले त्या दृष्टीनें चालू शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत कोणीच त्याच्याकडे पाहिलेलें नव्हतें. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि राष्ट्रीय नियोजनाचें युग सुरू झाल्यानंतर ह्या प्रश्नाकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोण बदलला असें निःशंकपणें म्हणता येईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेसंबंधी जो अहवाल तयार करण्यांत आला त्यांत प्रथमच सहकाराला स्थान देण्यांत आलें. भारताला लोकशाहीच्या चौकटींत आर्थिक नियोजन करावयाचें असेल तर सहकाराला बगल देऊन चालणार नाहीं, हें मान्य करण्यांत आलें. नियोजित कार्यक्रमाचे हेतू आणि दिशा ह्यांना मदत करतांनाच विकेंद्रित स्थानिक प्रयत्नांचे आणि ऐच्छिक सहकार्याचे फायदे सहकारी शेतींत टिकविता येतील असें मानण्यांत येऊं लागलें. समाजवाद व लोकशाही ह्या मूल्यांवर आधारलेल्या नियुक्त अर्थव्यवस्थेंत सहकाराला अधिकाधिक मानाचें स्थान मिळूं लागणें अपरिहार्य आहे. आर्थिक जीवनाच्या विविध अंगांत सहकार हा एक प्रमुख आधार असल्याचे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्ड्यांत नमूद करण्यांत आलें आहे.

### दृष्टिकोणांतील फरक

गेल्या १० वर्षांत ह्या विषयांसंबंधीच्या दृष्टिकोणांत झालेला बदल अर्थपूर्ण आहे. हेतुपूर्वक नियोजन करण्यास उपयुक्त ठरणारें एक हत्यार म्हणूनच केवळ सहकाराकडे आतां पाहण्यांत येत नाहीं. भारताच्या घटनेंत राजशासनाच्या धोरणाचीं जीं तत्त्वें निर्दिष्ट करण्यांत आलीं आहेत, त्यांच्याशीं जुळता असणारा व सामाजिक बदल घडवून आणण्याचें प्रमुख साधन म्हणून सहकाराला आतां मान्यता मिळाली आहे. नियोजन समितीनें समाजवादी स्वरूपाच्या समाजरचनेचें वर्णन असें केलें आहे :—"शेती, उद्योगधंदे आणि सोयीसवलती ह्या आर्थिक विभागांत मोठ्या प्रमाणावर विकेंद्रित कार्यपद्धतीचा अवलंब म्हणजे समाजवाद." तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील सहकारी शेतीचें स्थान, ह्या विषयाचाच येथें प्रामुख्यानें विचार करण्यांत आला आहे. तथापि, अगदीं अल्प प्रमाणांत सुरवात झाल्यानंतर आज सहकाराची केवढी वाढ झाली आहे हें पाहणें उद्बोधक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. सामान्य माणसाच्या जीवनाला विविध अंगांनीं आपल्या कक्षेंत घेणारी एक राष्ट्रव्यापी संघटना म्हणून सध्यां सहकाराकडे पाहिलें जात आहे. सहकाराची प्रगति संथपणें कशी होत गेली हें दाखविणारें पुढील कोष्टक लक्षांत घेण्यासारखें आहे.

| • | १९०९-१० | १९२४-२५ | १९४४-४५ | १९५८-५९ |
|---|---|---|---|---|
| सहकारी संस्थांची संख्या | १,१९६ | ५७,७०७ | १,४९,८८८ | २,८३७९१ |
| प्राथमिक सहकारी सभासद (आंकडे हजारांचे) | १२६ | २,१५५ | ७,२१८ | १४,७६१ |
| खेळतें भांडवल (आंकडे कोटी रुपयांचे) | ६८ | ३६·३६ | १२४·३५ | ८७९·५८ |

गेल्या पंधरा वर्षांत सहकारी संस्थांची संख्या दुप्पट झाली आहे, सभासदांची संख्या तिप्पट झाली आहे आणि साधनसामग्रीची वाढ आठ पट झाली आहे. तथापि, सभासदांची संख्याच तेवढी वाढली आहे असें नाहीं. सहकारी संस्थांचा विस्तार अर्थव्यवस्थेच्या विविध भागांतहि झालेला दिसून येतो. १९१२ सालापासून सहकाराची व्याप्ती फक्त कर्ज पुरविणाऱ्या संस्थांपुरतीच मर्यादित राहिली नाहीं.

### पतीवर कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थाच अधिक

तथापि, दुर्गम ठिकाणांच्या व कांहीं विशिष्ट भागांतील सहकारी संस्था सोडल्या तर कर्ज पुरवणाऱ्या सहकारी संघटनाच प्रामुख्याने वाढल्या असें दिसून येतें. शहरांतील छोट्या धंदेवाइकांना व मुख्यतः ग्रामीण भागांतील लोकांना पतीवर कर्जाचा पुरवठा करणाऱ्या संस्था म्हणून अशा सहकारी संस्थांचें महत्त्व अजूनहि कमी झालेलें नाहीं. परंतु पहिल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमांच्या काळांत निराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वांत आल्या आहेत आणि त्यांनीं नवीनच क्षेत्रांत पदार्पण केलें आहे. देशाच्या बहुतेक सर्व भागांत असें झालेलें दिसून येत आहे. शेतीच्या आणि बिगर-शेतीच्या प्राथमिक सहकारी पतपेढ्या आणि त्यांना द्रव्यसाह्य देणाऱ्या सहकारी संघटना सोडल्या तर रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांप्रमाणें पुढील प्रकारच्या सहकारी संस्था आढळून येतात. मार्केटिंग करणाऱ्या, उसाचा पुरवठा करणाऱ्या, शेती करणाऱ्या, कापूस निवडणाऱ्या व गाठी

बांधणाऱ्या, साखर तयार करणाऱ्या, ग्राहकांच्या, घरबांधणीच्या, कामगारांच्या, सुताच्या गिरण्यांच्या, मच्छिमारांच्या, सर्वसाधारण विमा उतरणाऱ्या, जंगलमालाचें उत्पादन करणाऱ्या, इत्यादि. कांहीं विशेष प्रकारच्या सहकारी संघटनांनीं आपलें फेडरेशनहि स्थापन केलें आहे. त्याशिवाय स्थानिक निरीक्षक संघ आणि वर टोकाला राज्यांतील मध्यवर्ती फेडरेशन्स आहेतच. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकाराच्या विकासाच्या बहुतेक अंगांचा विचार करण्यांत आलेला आहे. कार्यक्रमांतील सहकाराविषयींचें प्रकरण सोडलें तरी इतर विभागांतून शेती, ग्रामोद्योग, मजूरविषयक प्रश्न, इत्यादि बाबींसंबंधी काय धोरण स्वीकारावें ह्याबद्दल पुष्कळ सूचना करण्यांत आलेल्या आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचें व शेतीच्या इतर मालाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठण्यासाठी पुढील पांच वर्षांत खेडेगांवातील सर्व्हिस सोसायट्यांच्या स्थापनेवर हेतुपूर्वक जोर देण्यांत आला पाहिजे. १९६५–६६ पर्यंत सभासदांची संख्या ३·७ कोटी पर्यंत वाढावी असा अंदाज आहे. तसें झाल्यास देशांतील ग्रामीण भागांतील ६० टक्के लोकसंख्या सहकाराच्या कक्षेत येईल. ह्याचे पांच वर्षांच्या काळांत अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जपुरवठ्याचा आकडा २०० कोटीवरून ५३० कोटीपर्यंत वाढेल. दीर्घ मुदतीच्या कर्जाचा आंकडा ३५ कोटी वरून १५० कोटी पर्यंत जाईल. कर्जपुरवठ्याचा हा संकल्पित विस्तार बराच मोठा वाटतो. शेतींत गुंतलेल्या समाजाच्या ज्या विभागांत आतापर्यंत सहकारी चळवळ पोचली नव्हती तेथपर्यंत ती आतां पोचणार आहे. पतीवर कर्जपुरवठा करणारी सुदृढ व्यवस्था अंमलांत आणणें यांत्रिक रीत्या शक्य होत नाहीं. ह्या व्यवस्थेंतील घटक जर संख्येनें पुष्कळ आणि देशभर पसरलेले असतील तर हें काम अधिकच बिकट होतें. कारण, ह्या व्यवस्थेला द्रव्य साह्याची उत्पादक प्रयत्नांशीं सांगड घालावी लागते.

### स्वतःच्या संपत्तिसाधनांची निर्मिति

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या खडर्यांत सहकारी चळवळीनें निरनिराळ्या पातळीवर स्वतःचीं संपत्तिसाधनें निर्माण करण्याचे प्रयत्न करावें असें म्हटलें आहे. हीं साधनें निर्माण करण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे सरकारची मदत सोडून भागभांडवलांत वाढ करणें. दुसरा मार्ग म्हणजे सभासदांकडून अगर बिगर-सभासदांकडून ठेवण्यांत येणाऱ्या ठेवींत वाढ करणें. पुढील पांच वर्षांच्या काळांत भाग-भांडवल आजच्या ७३ कोटी वरून १८० कोटीवर जाईल आणि ठेवी १६७ कोटीवरून ३९६ कोटीपर्यंत जातील अशी अपेक्षा आहे. सहकारी चळवळीची अंतर्गत साधनसंपत्ति ज्या मानानें वाढेल त्या मानाने रिझर्व्ह बँकेकडून तिला अधिक मदत मिळण्याची शक्यताहि वाढणार आहे. भाग भांडवलाची व ठेवींची वाढ होण्याच्या कामीं कांहीं गोष्टी महत्त्वाच्या ठरण्याचा संभव आहे. ग्रामीण विभागांत अल्प बचतीची योजना कितपत यशस्वी ठरेल ही एक गोष्ट. ग्रामीण भागांतील प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते आणि महसूल अधिकारी अल्प-बचत योजनेच्या द्वारां मोठी रक्कम जमविण्याची पराकाष्ठा करीत असतात. प्राथमिक सहकारी सोसायट्यांकडे नव्यानें येणाऱ्या भागभांडवलाच्या व ठेवींचा विचार करतां स्थानिक स्वरूपाची बचत त्यांच्याकडे आकृष्ट होण्याचा संभव आहे हें मान्य करावयास हवें. सहकारी संस्थेच्या लहानमोठेपणावर तिची जगण्याची पात्रता अवलंबून असते हें म्हणणें नियोजकांना फारसें पटलेलें नाहीं. पण, एखाद्या संस्थेची जगण्याची पात्रता जर स्पष्ट नसेल तर ज्यांच्या जवळ शिल्लक टाकण्यासारखा पैसा आहे ते लोक आपला पैसा पैशाचे व्यवहार करणाऱ्या इतर चांगल्या संस्थांच्या हवाली करण्याची शक्यता आहे. अल्प रकमेच्या ठेवी नियमितपणें गोळा करण्याची आणि ठरलेल्या अटीप्रमाणें त्या परत करण्याची सोय देशांत कोठेंहि करण्यांत आलेली नाहीं. ज्या लोकांच्या जवळ बेताचा पैसा आहे, त्यांना व्याजाच्या दरापेक्षां अशा प्रकारची व्यवस्था अधिक महत्त्वाची वाटणार हें उघडच आहे. अशी व्यवस्था असेल तरच त्यांच्याजवळील पैसा अल्पबचत योजनेच्या कक्षेंत येऊं शकेल. सहकारी संस्थांत व सहकारी बँकांत ठेवलेल्या छोट्या रकमांच्या ठेवींना ठेवींच्या विमायोजनेचा फायदा देण्यांत आलेला नाहीं. ह्याचा परिणाम आज नाहीं तरी भविष्यकाळा झाल्याशिवाय राहणार नाहीं. सामान्य लोकांना आपली बचत सहकारी संस्थांत ठेवण्यास जें आकर्षण आहे, तें कमी होत जाण्याचा संभव आहे.

—वैकुंठ ल. मेहता

### मलायांत साखरेची निर्यात

मलाया व त्याच्या आसपासच्या भूभागांत साखरेची निर्यात करण्यास भारतानें गेल्या वर्षीं सुरवात केली. ही निर्यात बरीच यशस्वी होत आहे. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत भारतानें फॉर्मोसालाहि निर्यातींत मागें टाकलें. आतांपर्यंत ह्या भागांत फॉर्मोसामधील साखर अधिक प्रमाणांत येत असे. मलाया व सिंगापूरला ह्या काळांत भारतानें १८,००० टन साखर पुरविली, व फॉर्मोसानें १२,००० टन साखर पुरविली. ह्या काळांतील एकूण निर्यात ६०,००० टनांची आहे. सिंगापूरला करण्यांत येणाऱ्या निर्यातींत वाढ झाल्यामुळें भारताच्या त्या देशाबरोबरच्या व्यापारांत अनुकूल तफावत दिसूं लागली आहे. मलायाला निर्यात केलेल्या साखरेमुळें उभयता देशांमधील व्यापाराची भारताची प्रतिकूल तफावत कमी झाली आहे.

ही दिवाळी बँकेचे भागीदारांना, ग्राहकांना, हितचिंतकांना सुखसमृद्धीची जावो !

# दि बँक ऑफ कराड लि.

हेड ऑफिसः—कराड

( शाखाः—सातारा, इस्लामपूर, तासगांव, विटें )

चेअरमनः—श्री. ना. बा. बुधकर, B. A., LL. B. वकील

व्हाईस चेअरमन :—श्री. महादेव रामचंद्र देशपांडे

१ ते ५ वर्षें मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचा दर

द. सा. द. शे. ४ ते ५ रु.

ग्राहकांना चीज-वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी कराड येथें बँकेच्या इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. इस्लामपूर व तासगांव शाखेंत लॉकर्सची सोय.

म. वि. खंडकर,
मॅनेजर.

# महाराष्ट्र राज्यांतील बँकांचें विलिनीकरण

बँकिंगचा व्यवसाय हा देशांतील अर्थव्यवस्थेचा कणा असून बँकिंग ही एक राष्ट्राची महान् सेवा आहे. या दृष्टीनें भारतांतील बँकिंग व्यवसाय व राष्ट्रांतील अर्थव्यवस्था कशी असावी याबाबत सरकारचें धोरण ब्रिटन सारखे ब्रँच बँकिंग पद्धतीचें असावें व हें राष्ट्रास पोषक होईल असें दिसूं लागलें आहे. युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका येथील युनिट बँकिंग पद्धती भारतासारख्या मोठ्या देशांत स्थानिक परिस्थितीजन्य उपयुक्ततेप्रमाणें मानवेल व तिचा परिपोष होणें आवश्यक असल्यानें सरकारनें सन १९४९ सालीं बँकिंग कायदा अमलांत आणून बकिंग व्यवसायाचें जें वर्गीकरण भांडवलाच्या किमान प्रमाणावर केलेलें आहे तें बँकिंग कंपनीज कायदा कलम ११ प्रमाणें पाहातां एक्स्चेंज बँका, शिड्यूल्ड बँका, नॉनशिड्यूल्ड बँका या तीन वर्गांत जी त्यांची विभागणी केलेली आहे त्यांत लहान बँकांनाहि स्थान निश्चितपणें ठेवलेलें होतें असें दिसून येतें. तथापि सन १९५९-१९६० मधील बँकिंग व्यवसायांतील सरकारी धोरणांत-कायदेकानूंत जे अत्यंत जलद् रीतीनें फरक झाले त्याचा साकल्यानें विचार करतां महाराष्ट्रांतील बँकिंग व्यवसायावर, व्यापार-उदीमावर तसेंच कारखानदारीवर इष्ट परिणाम झाला कीं अनिष्ट परिणाम झाला आहे, हें कालांतरानें सिद्ध होणार आहे.

लक्ष्मी बँक, अकोला व पलाई सेंट्रल बँक या बँकांच्या दुर्दैवी घटनानंतर लोकसभेंत सरकारी धोरणावर व रिझर्व्ह बँकेच्या शासनपद्धतीवर जी कडक टीका झाली, त्या सर्वांचा परिणाम बँकिंग व्यवसायाची सत्ता मध्यवर्ती सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे हातीं केंद्रित करण्याकडे झाला. ठेवीदारांचें संरक्षण हा त्यांतील प्रमुख हेतु जरी असला तरी तो हेतु साध्य करीत असतांना देशांतील कांहीं बँकांवरील जनतेचा विश्वास डळमळूं लागला व त्याचा परिणाम प्रथमतः लहान बँकांवर विशेष दिसून येणें साहजिकच होतें. ज्या ठिकाणीं पंजाब नॅशनल सारख्या पहिल्या पांच क्रमांकांतील बँकेवर अविश्वास निर्माण झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं त्यावेळीं खुद्द अर्थमंत्री श्री. मुरारजीभाई यांना या बँकेच्या भक्कमपणाबद्दल लोकसभेंत निवेदन करावें लागलें! अशा परिस्थितींत, महाराष्ट्रांतील ज्या लहान बँका आपले व्यवहार पद्धतशीर व आटोपशीरपणानें चालवीत होते त्यांनाहि याची झळ सोसावी लागली, ह्यांत नवल नाहीं.

देशांतील या अस्थिर परिस्थितीचा परिणाम म्हणूनच कीं काय, रिझर्व्ह बँकेनें आपले अधिकार वाढवून घेऊन बँका विलिनीकरणाची मोहीम सुरू केली; अशा या मोहिमेंत वाळल्याबरोबर ओलेंही जळतें या म्हणीप्रमाणें महाराष्ट्रांतील ज्या कांहीं बँका आपला व्यवहार सरकारी धोरण प्रतिकूल असून सुद्धां चांगल्या रीतीनें टिकवूं शकत होत्या त्यांनाहि याची झळ लागली व त्या बँकांना विलीनीकरण योजनेंत घालून त्या कायद्यानें बंद केल्या.

बँका विलिनीकरणाचे कायदा मंजुरीचे आधीं सन १९५९ चे रिझर्व्ह बँकेचे प्रसिद्ध झालेल्या तक्त्याप्रमाणें भारतांतील व्यवसाय पाहातां तो असा दिसून येतोः-विदेशी बँका १६, क्लास 'अ १' शेड्यूल्ड बँका ७९, क्लास 'अ २' नॉनशिड्यूल्ड ४१, क्लास 'ब' नॉनशिड्यूल्ड १५५, क्लास 'क' नॉनशिड्यूल्ड ७८, अशा ३५३ बँका अस्तित्वांत होत्या.

सन १९६० नंतरच्या विलिनीकरणाचे धोरणानुसार 'मोरेटोरियम' देऊन कायद्यानें ज्या बँकांचें विलिनीकरण रिझर्व्ह बँकेनें घडवून आणलें त्या बँकांची संख्या खालीलप्रमाणें दिसून येते. हें आंकडे अंदाजी आहेत.

शिड्यूल्ड बँका १३, क्लास 'अ २' नॉनशिड्यूल्ड बँका ३८, क्लास 'ब' व 'क' सुमारें ७८ अशा एकूण सुमारें १२९ बँका त्यांच्यापेक्षां मोठ्या बँकांत विलीन करण्यांत आल्या.

बँका विलिनीकरणाच्या योजना रिझर्व्ह बँक तयार करीत असून त्या योजनेस मध्यवर्ती सरकार मंजुरी देते व बँकांना 'मोरेटोरिअम' लावून बँकांचे व्यवहार स्थगित करण्यांत येतात; अशा पद्धतींत वर्ग होणारी बँक (ट्रॅन्स्फरर बँक) व वर्ग करून घेणारी बँक (ट्रॅन्सफरी बँक) यांचे दरम्यानच्या अटींचे मसुदे पाहिले तर या योजना एकतर्फी, ट्रॅन्सफरी बँकेच्या बाजूच्या केल्या गेलेल्या आहेत, असें म्हटलें असतां फारसें वावगें होणार नाहीं.

या विलिनीकरण योजनेंतील बँकांच्या जिंदगीचें मूल्यमापन हा महत्त्वाचा भाग व त्यासंबंधीची योजनेंतील कलमें सदोष इतकेंच नव्हे तर ट्रॅन्स्फरर बँकेला विघातक आहेत, याचा विचार कोणी करावयाचा? याबाबत रिझर्व्ह बँक ही अखेर निर्णय देणारी होय. तथापि, मूळ योजनेंत मूल्यमापनाची पद्धत दोषार्ह असल्यानें याबद्दल दाद कशी मिळावयाची? उदाहरणादाखल लिहावयाचें झाल्यास, सरकारी कर्जरोख्यांचें मूल्यमापनपद्धतीकडे जर आपण पाहिलें तर रिझर्व्ह बँक ट्रॅन्स्फरर बँक चालूं असतांना ज्या रोख्यांची बाजारभावाची किंमत व पुस्तकी पडलेली किंमत ह्यांतील फरक प्रत्यक्ष नुकसान म्हणून नफातोट्यास ताळेबंदाला धरीत नाहीं, त्या रोख्यांचे दर्शनी किंमतीशीं—ज्यांची किंमत सरकार त्या त्या वर्षी पूर्णपणें देण्यास बांधलें आहे—त्यांचा विचार करते. पण विलिनीकरण योजनेंत मात्र चालू बाजारभावाप्रमाणें त्या बँकांना त्याची किंमत धरण्यास लावून त्यांत नुकसान आल्यास ती रक्कम ट्रॅन्स्फरर बँकेच्या जिंदगींतून वजा करावयास लावते. सरकारी कर्जरोख्यासारखी आणखीहि जिंदगीमापनाचीं दोषस्थळें या योजनेंत आहेत. त्या दोषस्थळांचें परिमार्जन करून घेण्यास कायद्यानें सोय नसल्यानें रिझर्व्ह बँक देईल तो निर्णय मान्य करून ट्रॅन्सफरर बँकेला स्वस्थ बसण्याव्यतिरिक्त स्थान नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें!

विलिनीकरणाचे धोरणानुसार योजना अमलांत आणतांना ज्या बँकांमध्यें लहान बँकांचें विलिनीकरण व्हावयाचें त्या बँकांशीं व्यापारी पद्धतीची देवाण-घेवाण या पद्धतीनें व्यवहार सोडवून घेणें भाग पडतें. या बँकांचें धोरण "प्रगल्भ" नसल्यास बँकांच्या जिंदगीचें मूल्यमापन, कर्जखात्यांतील विभागणी, त्यांतील समजूत-गैरसमजूत, बँकांच्या नोकरवर्गाच्या रीतसर कायद्यानुसार नेमणुका, यांत सुद्धां समजूतदारपणाचा अभाव दिसून येतो असें अनुभवानें म्हणणें प्राप्त झालें आहे. रिझर्व्ह बँकेनें सुद्धां विलीन होणाऱ्या बँकेची जिंदगी व त्यांचा नोकरवर्ग ह्या योग्य तत्त्वानुसार विलीन करून घेणाऱ्या बँकेस झेंपल कीं नाहीं याकडे कटाक्षानें पाहून विलिनीकरण करून घेणाऱ्या बँकेची योग्यता तपासणें जरूर आहे. केवळ त्या भागांतील एखादी बँक विचारांत घेऊन तिला मोठी करण्याचा प्रयत्न करण्यांत 'घेणारे' आणि 'देणे भाग असलेले' अशा भूमिकेवरून व्यावहारिक धामाधूम होऊन त्यांत बिचारा ठेवीदार व भागीदार वर्ग निष्कारण भरडला जात आहे असें दिसून येतें.

ठेवीदारांनीं आपल्या ठेवी ठेवून, विलीन व्हावें लागलेल्या या लहान बँकांना खेळतें भांडवल पुरविलें ही गोष्ट जितकी सत्य, तितकीच त्या बँकांचे भाग भांडवल लोकांनीं घेऊन मूळ बँका-संस्थापनेस प्रोत्साहन देऊन आपल्या रकमा गुंतविल्या व संस्था उभ्या केल्या, त्या भागीदार बंधूंच्या बाबतींत रिझर्व्ह बँकेनें विलिनीकरण योजनेंत काय केलें आहे, हें पाहिलें असतां निराशाच पदरांत पडते ! ठेवीदारांचे हितासाठी रिझर्व्ह बँक व भागीदारांचे हितासाठी कंपन्यांचा कायदा, अशी ही विभागणी सोईस्कर रीतीनें करून ठेवीदारांचे बाबतींत बँकांवरील अनियंत्रित सत्ता मध्यवर्ती सरकारचे मंजुरीनें रिझर्व्ह बँकेनें घेऊन ठेविली असून या सत्तेचा वापर अधिकारीवर्गाच्या तारतम्यानें होत असल्यास नेहमींच निर्णय अचूक मिळतील अशी ग्वाही देणें अशक्य होय.

बँक विलीन झाल्यानंतर भागीदारांचें भवितव्य ट्रॅन्स्फरी बँकेकडे राहत असल्यानें ट्रॅन्सफरर बँकेच्या येणें वसुली, वगैरेंवर त्या भागीदारांची देखरेख अथवा निदान सल्लामसलतहि घेण्याची तरतूद योजनेंत नाहीं, हा एक फार मोठा दोष या विलिनीकरण कार्यांत राहिलेला आहे. याचाहि विचार होणें जरूर आहे.

महाराष्ट्रापुरतें लिहावयाचें झाल्यास महाराष्ट्रांत विलिनीकरणाची अंमलबजावणी होण्यापूर्वीची परिस्थिति व आतांची परिस्थिति लक्षांत घेतां १९५९ पूर्वी महाराष्ट्र राज्यांत शिड्यूल्ड बँका १०, नॉनशिड्यूल्ड बँका २३, अशा सुमारें ३३ बँकांपैकी बऱ्याच बँकांचें विलिनीकरण होऊन आतां त्यांची संख्या सुमारें १० वर आली आहे व थोड्याच अवधींत आणखी कांहीं बँकांना विलिनीकरणाचे योजनेंत बसावें लागेल.

मध्यवर्ती सरकारनें रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीनुरूप नुकतीच "डिपॉझिट इन्शुअरन्स स्कीम" मंजूर करून ती बँकांना लागू केली जाणार आहे. या योजनेंतील फायदा किंवा सुरक्षितता ज्या लहान बँकांतील ठेवीदारांना मिळावी अशी मूळ कल्पना घेऊन ही योजना तयार केली तो वर्ग हळूं हळूं नाहींसा होत जाऊन देशांतील सर्व बँकिंग व्यवसाय सुमारें ५०–५५ बँकांमध्यें म्हणजे फक्त लायसेन्स्ड् बँकांमध्यें केंद्रित होणार असल्यानें त्या बँकांच्या ठेवीदारांना रु. १,५००।२,००० पर्यंत सुरक्षितता देण्यांत येणार आहे. पण, ज्या लहान बँकांच्या ठेवीदारांचे सुरक्षिततेसाठीं ही डिपॉझिट इन्शुअरन्स योजना अंमलांत आणली तो वर्ग नाहींसा होत चालला आहे !

महाराष्ट्रांतील बँकांचे विलिनीकरणानें लहान लहान उद्योग-धंदे उभारणीस ज्या लहान बँकांची सेवा व श्रम कारणीभूत झाले त्या बँका नामशेष झाल्यानें लहान व्यापारी व कारखानदार यांची आस्थेनें जोपासना करणारा बँकिंगमधील एक वर्ग नाहींसा झाला आहे. महाराष्ट्र राज्यांत लहान उद्योगधंद्यास परिस्थितिजन्य भरपूर वाव आहे. पण, बँकिंग व्यवसायाचें धोरण जर त्याला पोषक नसेल तर या उद्योगधंद्यांची अगर कारखानदारांची वाढ अपेक्षेप्रमाणें होणें कठीण जाईल अशी साधार भीति वाटते. मोठ्या बँकांचे हातीं हा लहान लहान उद्योग-धंद्यांच्या भांडवलाचा प्रश्न राहिल्यास त्या बँकांच्या धोरणानुसार हा वर्ग उपेक्षिला जाऊन आपल्या महाराष्ट्र राज्यांतील औद्योगिक व व्यापारी उन्नतीला अडथळा येणार नाहीं, अशी सरकारी नियंत्रणा तरी सुलभ रीतीनें हे प्रश्न सोडविण्यास उद्युक्त झाली पाहिजे, असें आम्हांस वाटतें.

—नी. ना. क्षीरसागर

ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या ग्राहकांस सुखाची व भरभराटीची जावो.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ०९.०२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १०.७४ लाख |
| ठेवी | रु. | १६१.६६ लाख |
| खेळतें भांडवल | रु. | १९१.०० लाखांचें वर |

शाखा :-फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें आणि बेळगांव

महिला शाखा :—सारस्वत बँकगृह, मुंबई.



स्थापना १९१८

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

स्थापना १९१७ ] जिल्हा सातारा [ फो. नं. ७३

कराडांतील सर्वांत जुनी "अ" वर्गांतील बँक

नवीन वर्ष आमच्या सर्व सभासदांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना भरभराटीचे जावो.

अध्यक्षः—श्री. विश्वनाथ कृष्णराव तांबवेकर, बी. ए., एल्एल्. बी. वकील, कराड.

| | | |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | रु. | ५७,९३,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ४,८७,००० |
| ठेवी | रु. | ४९,५६,८०० |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार तत्परतेनें व माफक दरांत केले जातात. स्वल्पसंचय, सभासद प्रॉ. फंड, वगैरे योजना लोकादरास पात्र आहेत. अद्ययावत् तिजोरी घरांतील नवीन जादा लॉकर्स लवकरच बसविले जात आहेत. आकर्षक ठेवींचे दर व भक्कम स्थैर्य यामुळें ठेवीदारांच्या विश्वासाचें केंद्र अशी ही बँक आपल्या सेवेस सदैव तयार आहे. एक वेळ बँकेस भेट द्या.

कराड, १६–१०–६१

शं. पु. कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.

# पूरग्रस्त व्यापारी-कारखानदारांचें पुनर्वसन

## पुण्यांतील बँकांची बहुमोल कामगिरी

दि. १२ जुलै, १९६१ रोजीं पानशेत व खडकवासला धरणें फुटून पुणें शहरावर जी आपत्ति कोसळली, तिला तोंड देण्यासाठी सर्वांनीं पराकाष्ठा केली. आसरा आणि अन्नपाण्याची गरज सरकार, लष्कर, संस्था, संघ, संघटना, हितचिंतक, ह्यांच्या तातडीच्या मदतीनें सत्वर भागली. वृत्तपत्रांनीं फंड उभारून मदतीला मोलाचा हातभार लावला आणि पूरग्रस्त जनतेला दिलासा मिळाला.

तथापि, लोकांचे उद्योगधंदे बंद पडल्यामुळें त्यांची जी कुचंबणा झाली, इतर गरजा भागविण्यास साधन नसल्यामुळें जी अडचण निर्माण झाली, त्यावरहि अत्यंत जलदीनें उपाययोजना करण्यांत आली, ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. व्यापारी आणि औद्योगिक संघटनांनीं पैशानेंच नव्हे, तर कारागिरीचीं हत्यारें पुरवून आणि कामचलाऊ भांडवल देऊन कित्येकांचे धंदे पुनः उभे केले. व्यापारी आणि सहकारी बँकांनींहि आपली जबाबदारी ओळखली व त्या मदतीला धावून गेल्या. सरकारी यंत्रणेनेंहि, "बँकांनीं आपले कर्जविषयक 'सनातनी' नियम सैल करावे; सरकार तुमच्या मागें आहे" असें आश्वासन देऊन बँकांना सक्रिय प्रोत्साहन दिलें. त्यामुळें, कर्जाचा प्रश्न पुनर्वसनाच्या, सहानुभूतीच्या, व्यापक दृष्टिकोणांतून पाहणें बँकांना सुलभ झालें. सरकारनें मोठ्या प्रमाणांत जिम्मेदारी पत्करून स्वतःचें धोरण कृतींत उतरविलें. कर्ज देण्यावर सरकारची देखरेख नसतांहि त्याची जोखीम पत्करण्याचे कामीं सरकारनें घेतलेला पुढाकार सर्वांनाच आत्मविश्वास निर्माण करण्यांत यशस्वी झाला. त्यामुळें ठेवीदारांच्या विश्वासास तिळमात्रहि धक्का न लागतां हें सर्व होऊं शकलें.

मालाचें तारण वाहून गेल्यावर कर्जदाराजवळ आतां फक्त सचोटी आणि अनुभव ह्यांचेंच तारण उरलें होतें. ज्यांच्या-ज्यांच्यामध्यें ह्या गुणांचा मिलाफ आढळून आला किंवा असल्याचें माहितगार जबाबदार संस्थांनीं सांगितलें, त्यांच्या त्यांच्या अर्जांचा विचार बँकांनीं निष्ठापूर्वक केला; कर्जदारांच्या वैयक्तिक पतीवर भर देऊन व्यापारी कारखानदारांच्या पुनर्वसनास जोराची चालना दिली. कारखानदारांचा कच्चा माल वाहून गेलेला, इमारती निरुपयोगी बनलेल्या किंवा नादुरुस्त झालेल्या, यंत्रें गाळामुळें बंद पडलेलीं; अशा परिस्थितींत त्यांच्यावर कठिण प्रसंग तर आलाच; पण हजारों कामगारांचे प्रपंच चिखलाला मिळाल्याचा रंग दिसूं लागला. अशा वेळीं सामुदायिक संघटना पुढें आल्या नसत्या, तर काय झालें असतें, ह्याची कल्पनाहि करवत नाहीं. व्यापाऱ्याचें दुकान बुडालें, तर त्यामुळें त्याच्या कुटुंबावर आपत्ति येते; कारखाने बुडाले तर शेंकडों, हजारों कामगार कुटुंबांवर उपासमारीची पाळी येते. हा फरक बँकांनीं ओळखून आपलें सामाजिक कर्तव्य कसोशीनें पार पाडलें, ही अभिमानास्पद गोष्ट आहे.

बँकांनीं जुने ऋणानुबंध लक्षांत ठेवून खातेदारांच्या निकडीच्या गरजा भागवल्या, इतकेंच नव्हे तर पतीप्रमाणें जरूर तो भांडवल-पुरवठा नव्या लोकांनाहि सढळ हातानें केला. कोंहींना चिखल काढण्यासाठी, तर कांहींना कच्च्या मालासाठी पैसे हवे होते; शेडची व यंत्रांची दुरुस्तीहि जरूर होती. ह्या सर्व कामासाठी बँकांनीं त्वरा करून शक्य तेवढें साहाय्य केलें; कर्जदारांच्या स्वाभिमानास धक्का लागूं न देण्याची पराकाष्ठा केली. पुरामुळें तारण नाहींसें झालें, हा कर्जदारांचा दोष नव्हता. पूरग्रस्त व्यापारी आणि कारखानदार ह्यांना बँका किती मदत करूं शकतील, ह्याला कांहीं मर्यादा आहेत. उदाहरणार्थ, दीर्घ मुदतीच्या कर्जाचा प्रश्न अद्याप कारखानदारांपुढें उभा आहे. त्याची जबाबदारी सरकार अगर तत्सम यंत्रणांनींच उचलावी लागेल. त्या दिशेनेंहि प्रयत्न चालू आहेत.

कांहीं व्यापारी संघटना आणि कारखानदार संघटना ह्यांनीं पूरग्रस्त सभासदांच्यासाठी सहाय्यक फंड उभारून गरजू सभासदांना बँकांमार्फत त्यांतून कर्जे देवविण्याची योजना केली. ही योजना अशी, कीं सभासदाचा अर्ज योग्य ती छाननी करून बँकेकडे विचारार्थ पाठवावयाचा आणि बँकेनें त्या अर्जांची पुनः तपासणी करून कर्ज द्यावयाचें; हें सर्व तातडीनें करावयाचें. पुनर्वसनाच्या दृष्टिकोणांतून सर्वांनीं पाहावयाचें. बँकांना ह्या कर्जांच्या व्यवहारांत नुकसान आलें, तर त्याची जिम्मेदारी संबंधित व्यापारी-कारखानदार संघटनांनीं घ्यावी, अशी योजना आहे. ह्या योजनेमुळें त्यांच्या सभासदांना पद्धतशीरपणें पण सुलभतेनें कर्जे मिळूं शकलीं; बँकांनाहि नुकसानीची भीति राहिली नाहीं. सभासदांवर संघटनांचें नैतिक दडपण असल्यामुळें बूड येण्याचा धोका पुष्कळच कमी होणें स्वाभाविक आहे.

दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी सरकारचें औद्योगिक खातें, फायनॅन्स कॉर्पोरेशन, ह्यांनीं पुढाकार घेतला. स्टेट फायनॅन्स कॉर्पोरेशननें तर कांहीं दिवस आपली कचेरीच पुणें येथें ठेवून सर्व अर्जांची छाननी जागेवर जाऊन तातडीनें केली आणि भांडवली साहाय्य तावडतोब दिलें. कारखानदारांना आवश्यक ते परवाने देण्याचें काम वेगवेगळ्या सरकारी खात्यांनीं जलद पार पाडलें.

पुणें शहराप्रमाणें नदीकांठच्या खेड्यांवरहि पुराची आपत्ति कोसळली असल्यामुळें तेथील लोकांनाहि तातडीच्या मदतीची आवश्यकता होती. पुणें सेंट्रल को. बँकेनें ह्या बाबतींत उत्कृष्ट कामगिरी बजावली; नदीकिनाऱ्यावरील सोसायट्यांना जरूर तो कर्जपुरवठा तातडीनें केला. पुणें शहरांतील व्यापारी बँकांपैकी महाराष्ट्र बँक, आणि सहकारी अर्बन बँकांपैकी जनता, पूना पीपल्स, पूना मर्चंट्स आणि कॉसमॉस, ह्या बँकांचा मुद्दाम उल्लेख करणें आवश्यक आहे.

सरकारी आणि व्यापारी-कारखानदार संघटनांचा पैसा भरपूर प्रमाणांत सत्वर उपलब्ध झाला, म्हणून बँकांना पुनर्वसनाचे कामीं एवढी कामगिरी बजावता आली, हें उघड आहे. त्याचें श्रेय त्यांच्या संचालकांप्रमाणें नोकरवर्गासहि देणें आवश्यक आहे. कर्जाच्या अटी सोप्या, कर्जदाराला झेपतील अशा ठेवण्याची आणि हप्ते सुरू होण्याला थोडा अवधी राखण्याची दक्षता घेण्यांत आली आहे. नेहमीच्या कर्जांतील अटी एकतर्फी म्हणजे बँकेच्या बाजूच्याच सर्वस्वीं असतात, तसें ह्या कर्जांचे बाबतींत नाहीं. पूरग्रस्त कर्जदाराची आर्थिक व मानसिक स्थिति ह्यांचा पूर्णपणें विचार करण्यांत आला आहे. व्याजाचा दरहि अल्प ठेवलेला आहे.

प्रत्येकानेंच आपल्या ताकदीचा पराकाष्ठेचा सदुपयोग केला आहे. हीच परंपरा राष्ट्रीय उत्थापनाचे कामीं टिकून राहील तर आणि व्यापार-उद्योग करणारांचे उपक्रम यशस्वी होऊन देशाच्या समृद्धात भर पडो!

—द्वा. ना. भांडेकर

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४९ ] मुमबाद, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ४ ,, |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




"नूतन वर्ष भरभराटीचें जावो"

सेवा व सुरक्षितता यासाठी

# दी बेळगांव बँक लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव**

आजची बचत उद्यांच्या गरजांसाठी, बेळगांव बँकेकडे ज्यामध्यें बहुतेक लोक आपली बचत करतात—त्यामध्यें आपली बचत करा. बेळगांव बँकमध्यें आपणांस अधिकाधिक फायदे मिळतात. नजिकच्या शाखेला भेट द्या. बँकेच्या सत्तावीस शाखा जनतेची सेवा करीत आहेत.

## बीज ठेवीचें—फळ समृद्धीचें

आजच आपण ठेवीचें बीज पेरा व पुढील काळांत समृद्धीचें फळ मिळवा. आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात. मासिक हप्ते भरण्याची सोय असलेलें क्युम्यूलेटिव्ह डिपॉझिट खातें आजच सुरू करा व भविष्यकाळासाठीं तरतूद करा.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : : : | रुपये आठ लाख |
| गंगाजळी | : : : | रुपये चार लाख, नव्वद हजार |
| एकूण ठेवी | : : : | रुपये एक कोटी, ब्यांयशी लाखांचे वर |

ठेवीच्या दरासंबंधीं आजच चौकशी करा व योग्य तऱ्हेनें व सुरक्षितपणें बेळगांव बँकेंतच खातें उघडा.

अ. रा. नाईक,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून लोकांच्या अपेक्षा

## पैशाच्या घटलेल्या किंमतीमुळें विमेदारांचें नुकसान

दिल्ली इन्शुरन्स इन्स्टिट्यूट ह्या संस्थेच्या चौथ्या वर्षदिनानिमित्त बोलतांना सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं भारतामधील आयुर्विमा व्यवसायांत कांहीं बदल करण्यांत यावे असें सुचविलें आहे. त्यांनीं सुचविलेले सर्वच बदल सर्वानाच मान्य होण्यासारखे नसले तरी त्यांपैकी कांहींचा विचार करणें अगत्याचें आहे. डॉ. राव ह्यांनीं केलेल्या सूचनांपैकी कांहीं सूचना अशा आहेत:

(१) आयुर्विमा पॉलिसींसाठी घेण्यांत येणाऱ्या सध्यांच्या हप्त्याच्या दरांत कपात करण्यांत यावी.

(२) विमा-पॉलिसीची मुदत भरली म्हणजे जी रक्कम द्यावयाची तिची मुदत भरल्याच्या वेळीं पैशाचें जें मूल्य असेल त्याची सांगड घालण्यांत यावी.

(३) विमा पॉलिसीप्रमाणें द्यावयाचें देणें फक्त पैशाच्या रूपांतच देण्याची वहिवाट असण्याचें कारण नाहीं; एखाद्या भौतिक वस्तूच्या स्वरूपांतहि तें देतां यावें. उदा. घर.

(४) आयुर्विमा कॉर्पोरेशनची पैसे गुंतविण्याची सध्यांची जी पद्धत आहे तींत बदल करण्यांत येऊन हल्लीं करण्यांत येते त्यापेक्षा अधिक गुंतवणूक भागभांडवलांत करण्यास वाव ठेवण्यांत यावा.

### हप्त्याचे दर का कमी करावे ?

ह्यापैकी कांहीं सूचना नवीन असल्या तरी त्या अतर्क्य आहेत असें म्हणतां येणार नाहीं. अर्थात् व्यवहार्यतेचा प्रश्न शिल्लक राहतोच. तथापि, व्यवहार्यतेच्या दृष्टिकोणांतून त्यांचा विचार करण्यास हरकत असूं नये.

पहिली सूचना आयुर्विम्याच्या हप्त्याचे दर कमी करण्याची आहे. ह्या बाबतींत मतभेद होण्याचें कारणच नाहीं. आयुर्विम्याचे दर कमी करण्यास सर्वांचाच पाठिंबा मिळेल ह्यांत शंका नाहीं. आयुर्विम्याचा धंदा कॉर्पोरेशननें आपल्याकडे घेतल्यापासून विम्याच्या दरांत कपात करण्यांत आली आहे हें खरें; पण, ती जितकी करावयास पाहिजे होती तितकी केलेली नाहीं. संभाव्य विमेदार दर आणखी कमी करण्यांत यावेत अशी मागणी करीत आहेत. कारण आयुर्विमा कॉर्पोरेशननें १९६० सालीं अधिकांत अधिक धंदा केला आहे आणि भरपूर नफाहि मिळविला आहे. शिवाय भारत सरकारच्या अर्थखात्याचे प्रवक्ते, सरकार दर कमी करण्याचा विचार करीत आहे असें म्हणत आहेतच. आयुर्विमा कॉर्पोरेशन विम्यावरील बोनस वाढवील अशी लोकांची अपेक्षा होती, पण प्रत्यक्षांत कॉर्पोरेशननें बोनसचे दर जर कमी केले तर विम्याचे दर कमी करण्याच्या लोकांच्या मागणीला आणखीच पाठिंबा मिळेल. विम्याचे दर कमी करण्याच्या बाबतींत डॉ. राव ह्यांनीं आणखी एक मुद्दा मांडलेला आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील आरोग्यविषयक सोयींची वाढ झालेली आहे. त्यामुळें हिंदी नागरिकांच्या आयुर्मानाच्या अपेक्षेच्या सरासरींत वाढ झालेली आहे. ही वस्तुस्थिति सिद्ध करण्याची कांहीं गरज नाहीं. गेल्या शिरगणतीच्या अहवालावर नजर टाकल्यास असें आढळून येईल कीं, मृत्यूंचें प्रमाण कमी झालेलें आहे. त्यामुळें आर्थिक नियोजनाच्या पुरस्कर्त्यांपुढें लोकसंख्येच्या दरसाल वाढणाऱ्या प्रमाणाचा बिकट प्रश्न उत्पन्न झालेला आहे. म्हणून आयुर्विम्याचा धंदा करणाऱ्यांनीं जनगणनेसंबंधीचे आंकडे लक्षांत घेऊन विम्याच्या योजना व विम्याचे दर ह्यांची फेरजुळणी करणें इष्ट होईल.

### पन्नास वर्षांवरील लोकांच्या गरजा

ह्या बाबीसंबंधीं बोलतांना आयुर्विमाव्यवसायांतील एका विशिष्ट प्रथेकडे लक्ष वेधलें पाहिजे. विमेदाराचें वय ५५ झालें म्हणजे विम्याच्या पॉलिसीचा नेहमींचा काल व नेहमींचे दर लागू पडत नाहींत असें मानण्यांत येतें. पण सध्यांच्या परिस्थितींत ही प्रथा किती विसंगत आहे तें उघड आहे. ज्या लोकांच्या वयाला ५५ वर्षे होऊन गेलीं आहेत असे कितीतरी लोक सरकारी नोकरी, धंदा अगर राजकारण ह्यांमधून उत्साहानें भाग घेतांना आज दिसून येतात. पूर्वीपेक्षा अशा लोकांची संख्या अलीकडे अलीकडे अधिक असल्याचें आढळतें. हें असें का ? ह्याचें उत्तर देशांतील सुशिक्षित बेकारांच्या वाढत जाणाऱ्या संख्येंत सांपडतें. अभ्यासक्रम संपविलेल्या मुलांना जर नोकऱ्या मिळाल्या नाहींत तर कुटुंबासाठी पैसे मिळविण्याचें कष्ट मुलांच्या आईबापांना सेवानिवृत्त होण्याचें वय झालेलें असलें तरी नाइलाजानें करावें लागतात. आतां हे कष्ट करण्याची पात्रता जर असेल तर एखाद्या सेवानिवृत्तीचें वय झालेल्या माणसाला विम्यास अयोग्य समजणें बरोबर होईल काय ? पण, समजा वादाकरतां असें धरलें कीं, आयुर्विम्याकरता 'योग्य' व 'अयोग्य' अशी विमेदारांची वर्गवारी करणें बरोबर आहे; तरीसुद्धां आपल्या बेकार मुलांच्या आयुष्याचे विमे उतरण्यास सेवानिवृत्तांना उत्तेजन देण्यास हरकत नसावी. विमेदारांना प्राप्तीवरील कर भरण्याबाबत विम्याच्या हप्त्यांबद्दल सध्यां जी सूट देण्यांत येते तशीच सूट मुलांच्या पॉलिसीबाबतहि देण्यांत यावी. केवळ विमेदार स्वतः हप्ते भरत नाहीं म्हणून ती नाकारण्यांत येऊं नये.

### पॉलिसीच्या रकमेची महागाईच्या इंडेक्स नंबरशीं सांगड

मुदत भरलेल्या विम्याच्या पॉलिसीच्या रकमेची पैशाच्या किंमतीशीं सांगड घालण्यांत यावी अशी जी सूचना डॉ. राव ह्यांनीं केली आहे, ती कांहीं नवी आहे असें नाहीं. अशी अगर अशा प्रकारची प्रथा कॅनडासारख्या कांहीं देशांत आजहि चालू आहे असें म्हणतात. कांहीं वर्षांपूर्वी एका कॅनेडिअन आयुर्विमा कंपनीनें भारतामधील एका विमेदाराला "गोल्ड क्लॉज" ची अट असलेली पॉलिसीची मुदत भरल्यावर तिच्या आधारावर कंपनीकडे पॉलिसीच्या रकमेचा क्लेम पाठविण्यांत आला. पण कंपनीनें पैसे देण्याचें नाकारलें. पॉलिसीसाठी जो छापील फॉर्म वापरण्यांत आला होता तो फक्त कॅनडामध्येंच वापरण्यासाठी होता असें उत्तर कंपनीतर्फे देण्यांत आलें. हें "गोल्ड क्लॉज" काय होतें ? हा क्लॉज असलेल्या पॉलिसीप्रमाणें, विमा उतरणाऱ्या कंपनीनें पॉलिसीची मुदत भरल्यावर पॉलिसीची रक्कम त्या वेळच्या सोन्याच्या जागतिक भावाप्रमाणें देण्याची जबाबदारी स्वीकारलेली होती. डॉ. राव ह्यांनीं आपल्या सूचनेंत वरील अटीचाच एक पर्याय सुचविलेला आहे. विमेदाराच्या हक्काची पूर्ती सोन्याच्या भावाप्रमाणें करण्याऐवजीं पैशाच्या किंमतीप्रमाणें करावी अशी

त्यांची सूचना आहे. दुसऱ्या शब्दांत, मुदत भरलेल्या पॉलिसीची किंमत त्यावेळच्या राहणीच्या निर्देशांकाशीं त्यांनीं जोडून दिली आहे. आयुर्विमा अधिक लोकप्रिय करण्यासाठीं पैशाच्या किंमतींत होणाऱ्या घटीची तरतूद केली पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. ह्याहिपुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, विमेदारानें आयुष्यभर हप्त्याच्या रूपानें केलेल्या बचतीची किंमत कमी न होण्यासाठी अशा तरतुदीची फार आवश्यकता आहे. अशी तरतूद केली नाहीं तर विमेदाराची फसवणूक केल्यासारखेंच होईल. समजा, विमेदारानें विमा उतरणाऱ्या कंपनीला रुपयाची किंमत १०० नये पैसे झाल्यावर १,००० रुपये हप्त्याच्या रूपानें दिले आहेत. ह्या विमेदाराला पॉलिसीची मुदत भरल्यावर, रुपयाची किंमत २० नये पैसे झाल्यावर जर कंपनीनें १,००० रुपये दिले तर ती त्याची फसवणूकच नाहीं काय? आज जे विमेदार मध्यमवयीन आहेत, त्यांच्या बाबतींत नेमकें असेंच होत आहे. पैशाच्या खरेदीच्या शक्तीच्या दृष्टीनें विचार केला तर त्यांनीं पॉलिसी घेतली त्या वेळेपेक्षा त्यांना आज मोबदला कमी मिळतो. पण ह्यांत त्यांचा कांहींच दोष नाहीं. शिवाय आज त्यांची पैशाची गरजहि वाढलेली आहे.

डॉ. राव ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें पैशाची खरेदीची शक्ति कमी होण्याची ही प्रवृत्ति भारताच्या विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळें अशीच चालू राहणार आहे. म्हणूनच विमेदारांच्या नुकसान-भरपाईची व्यवस्था झालीच पाहिजे. ती न केली तर भाग-भांडवलांत अगर स्थावर मालमत्तेंत पैसे गुंतविण्याची प्रवृत्ति निर्माण होऊं लागेल. ह्या संबंधांत सोन्याचें उदाहरण घेण्यासारखें आहे. सरकारी नोकरी करीत असलेले दोन अर्थशास्त्रज्ञ आपल्या पैसे- गुंतवणुकीविषयीं बोलत होते. दोघांनींहि जराशा मोठ्या रकमेच्या विमापॉलिसी घेतलेल्या होत्या आणि त्यांच्या मुदती भरलेल्या होत्या. बोलण्याच्या ओघांत पैशाची किंमत कमी झाल्यामुळें झालेल्या नफानुकसानीचाहि त्यांनीं विचार केला. त्यांना असें आढळून आलें कीं, त्यांनीं विमापॉलिसींत हप्त्याच्या रूपानें जी रक्कम गुंतविली होती तिची किंमत पैशाच्या खरेदीच्या शक्तीच्या दृष्टीनें कमी झालेली होती. अर्थात्, ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. मग त्या अर्थशास्त्रज्ञांना असा प्रश्न पडला कीं, पैसे गुंतविण्याच्या कामांत ते शहाणे ठरले, कीं सोन्यांत पैसे गुंतविणारा खेडूत शहाणा ठरला? शतकानुशतकें सोन्यांत पैसे गुंतविणारा खेडूतच शहाणा ठरला हें उघड आहे. भारतामधील लोक आतां जागृत झालेले आहेत. आयुर्विमा उतरतांना जो पैसा हप्त्यासाठीं द्यावा लागतो त्यापासून अधिकाधिक फायदा होण्याची त्यांची अपेक्षा वाढतच जाणार आहे. आयुष्याची जोखीम लक्षांत घेऊनच फक्त विमा उतरण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. जनतेच्या ह्या अपेक्षांना तोंड देण्याची तयारी आयुर्विमा कॉर्पोरेशननें करणें जरूर आहे.

### क्लेमची पूर्तता वस्तूंच्या स्वरूपांत?

डॉ. राव ह्यांनीं केलेल्या तिसऱ्या सूचनेबद्दल बरेच वादंग माजले आहे. विमापॉलिसीचें देणें फक्त पैशाच्या रूपांतच न देतां वस्तूंच्या रूपांतहि द्यावें अशी ही सूचना आहे. उदा. घर. ही सूचना तात्त्विकदृष्ट्या चूक आणि उघड उघड अव्यवहार्य आहे अशी टीका करण्यांत आली आहे. सूचना घराच्या बाबतींत अमलांत आणावयाची तर बरेच गुंतागुंतीचे प्रश्नहि निर्माण होतात. घराच्या जागेबद्दल व त्याच्या नमुन्याबद्दल विमेदाराची पसंति लक्षांत घ्यावयाची कीं नाहीं? ही पसंति अगर नापसंति केव्हां निश्चित करावयाची? पॉलिसी घेतांना कां तिची मुदत भरल्यावर? पुन्हा ही पसंति—नापसंति कोणी व्यक्त करावयाची? पॉलिसीची मुदत भरण्यापूर्वी एखादा विमेदार मृत्यु पावला तर पसंति-नापसंति कोणी सांगावयाची? पॉलिसीचा नॉमिनी नमूद केलेला नसेल तर, अगर एकापेक्षा अधिक नॉमिनी असल्यासहि हा प्रश्न उपस्थित होतो. विमा उतरतांना घराची जी किंमत ठरविण्यांत आलेली असेल ती आणि घर प्रत्यक्ष बांधावयास काढल्यावर जी किंमत पडेल ती, ह्यांच्यांत पैशाची किंमत कमी झाल्यामुळें जी तफावत पडेल ती कोणीं भरून काढावयाची, हाहि एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. तथापि विमेदाराला विम्याची रक्कम पैशाऐवजीं वस्तूंच्या रूपांत देण्याच्या प्रश्नाचा विचारच करूं नये असा अर्थ घेण्याचें कारण नाहीं. पण, सध्यांच्या घर-टंचाईच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या कामीं वरील सूचनेचा कितपत उपयोग होईल असा विचार केला तर आशेला फारशी जागा दिसत नाहीं. कारण, आयुर्विमा कॉर्पोरेशनला ह्या बाबतींत खास असा अनुभव नाहीं. तथापि, आयुर्विमा कॉर्पोरेशनला एका दिशेनें उपयुक्त काम करतां येण्यासारखें आहे. विमापॉलिसीच्या तारणावर घरें बांधण्यासाठी जीं कर्जे देण्यांत येतात, त्यांच्याबद्दलच्या अटी अधिक सैल करतां आल्या तर बरें होईल. किंवा तसें करतां न आलें, तर आयुर्विमा कॉर्पोरेशननें आपल्या गुंतवणुकींपैकी अधिक गुंतवणूक स्टेट को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनॅन्स सोसायट्या अगर तत्सम संस्था ह्यांच्यांत कर्जाऊ गुंतवावी. घराकरतां कर्जे देणाऱ्या संस्थांनीं विमेदारांना कर्जे दिलीं तर कर्जावरील व्याजांत थोडी सूट देण्यांत यावी अशी अट वाटल्यास कॉर्पोरेशननें घालावी. म्हणजे कॉर्पोरेशन विमेदारांना उपयोगी पडल्यासारखें होईल.

### गुंतवणुकीचें धोरण

आयुर्विमा कॉर्पोरेशननें आपल्या पैशाची सर्व गुंतवणूक सरकारी रोख्यांतच करावी काय, असा प्रश्न डॉ. राव ह्यांनीं उपस्थित केला आहे. सरकारी कर्जरोख्यांच्या बाजाराला अशा गुंतवणुकीनें भरपूर आधार मिळतो हें खरें. पण ही बाब सोडून दिली तरी एक आक्षेप शिल्लक राहतो. सर्व गुंतवणूक सरकारी रोख्यांत केल्यामुळें कॉर्पोरेशनच्या उत्पन्नावर वाईट परिणाम होतो. कॉर्पोरेशननें थोडें अधिक धाडस दाखविलें तर सरकारी रोख्यांपेक्षा अधिक चांगली गुंतवणूक करतां येण्यासारखी आहे असें म्हणतां येईल. पण गुंतवणुकीच्या सध्यांच्या धोरणांत फार मोठा बदल होईल अशी अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं. विमेदारांच्या दृष्टीनें ही परिस्थिति निराशाजनक आहे. कॉर्पोरेशनच्या गुंतवणुकीच्या सध्यांच्या धोरणामुळें विमेदारांना अधिक बोनस मिळण्याचा संभवच राहात नाहीं. बोनसचे आहेत ते दर टिकले तरी मिळविलीं असा बहुतेक विमेदारांचा ग्रह झालेला आहे. विम्याच्या धंद्यांतील कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, सर्व विमापॉलिसी एकाच प्रकारच्या म्हणजे नफ्याविरहित असाव्या. जास्त हप्ते देऊनसुद्धां जर भरपूर बोनस मिळत नसेल, तर नफ्यासह पॉलिसी पाहिजेतच कशाला? कमी हप्त्याच्या दराच्या नफ्याविरहित पॉलिसी कां घेऊं नयेत, असा प्रश्न ते विचारतात. त्यांच्या ह्या प्रश्नाला अधिकाधिक पाठिंबा मिळण्याचा संभव वाढत आहे.

---

**ब्रिटिश कंपनीला काम**—कैरो शहराला वीज व गॅस पुरविणाऱ्या कंपनीचा विस्तार करण्याचें काम इंग्लिश इलेक्ट्रिक ह्या कंपनीला मिळत आहे. कंपनीच्या विस्ताराच्या योजनेला ६० लाख पौंड भांडवल लागणार आहे. हें काम मिळविण्यासाठी इतर अनेक देशांमधील कंपन्यांनीं खटपट चालविली होती. पण अखेर तें ब्रिटिश कंपनीलाच मिळालें.


# ब्रिटनमध्यें स्थायिक होणारे हिंदी नागरिक

## बेकायदा गेलेल्या अशिक्षित लोकांचें जीवन

ब्रिटनमधील बहुतेक मोठ्या शहरांतून हिंदमधील नागरिक स्थायिक होत असलेले आढळून येतात. तेथील पुष्कळ शहरांतून हिंदी व पाकिस्तानी नागरिकांच्या वसाहतीहि आहेत. देश सोडून परक्या देशांत गेल्यावर त्यांना अर्थातच नवनव्या अडचणींना तोंड द्यावें लागतें. परंतु तरीसुद्धां ते तेथें हळूहळू आपला जम बसवीत आहेत. लंडनमध्यें साऊथॉल भागांत सर्वांत अधिक भारतीय नागरिक स्थायिक झालेले आहेत. लंडनच्या उपनगरांत राहणारा हा समाज आपल्या पोषाखानें चटकन् ओळखूं येतो. हिंदी स्त्रियांच्या साड्या व सलवार आणि पुरुषांचीं शिरोभूषणें ह्या उपनगरांत अधिक दिसून येतात. ब्रिटनमध्यें भारतीय नागरिकांची एकूण संख्या किती आहे हें नक्की सांगतां येणार नाहीं. इंडिया हौसमध्यें मिळणाऱ्या माहितीप्रमाणें ब्रिटनमध्यें ८०,००० हिंदी लोक असावेत. ह्या संख्येंत मुख्यत: विद्यार्थी, व्यावसायिक, धंदेवाले आणि हिंद सरकारच्या नोकरींतील लोक ह्यांचा समावेश होतो. ब्रिटनमध्यें आलेले बहुतेक हिंदी नागरिक बेकायदा आलेले असल्यामुळें इंडिया हौसशीं त्यांचा संबंध आलेला नसतो. त्यामुळें अर्थातच हिंदी लोकांची नक्की संख्या अजमावणें कठीण होतें. हिंदी नागरिकांपैकीं ८० टक्के लोक पंजाबमधून आलेले आहेत. त्यांतहि शिखांचा भरणा अधिक आहे. पंजाबची फाळणी झाल्यामुळें ब्रिटनमध्यें येणाऱ्या लोकांच्या संख्येंत एकदम वाढ झाली. हें कारण सोडलें तरी पंजाबी लोकांत साहसी आणि कष्टाळू वृत्ति असल्यामुळें कित्येक पंजाबी आपलें नशीब काढण्याच्या हेतूनेंहि आलेले आहेत. हिंदी नागरिक व पाकिस्तानी नागरिक ह्यांचे संबंध मायदेशीं असतांना कितीहि तेढीचे असले तरी ब्रिटनमध्यें आल्यावर ही तेढ राहत नाहीं. ब्रिटनमध्यें आलेले हिंदी व पाकिस्तानी नागरिक अनेक ठिकाणीं गुण्यागोविंदानें राहात आहेत.

साउथॉल ह्या उपनगरांत १० वर्षांपूर्वी कांहीं हिंदी नागरिक आले. तेथील एका रबराच्या कारखान्याच्या व्यवस्थापकाकडे एके दिवशीं एक शीख आला. व्यवस्थापकानें शिखाला ओळखलें. गेल्या महायुद्धांत ग्रीसमध्यें ते दोघे लष्करी कामगिरीवर होते. ह्या शिखाला कारखान्यांत नोकरी मिळाल्यावर त्यानें आपले आणखी मित्रहि कारखान्यांत लावून घेतले. लवकरच तेथील हिंदी लोकांची संख्या वाढूं लागली. आतां ह्याच कारखान्यांत हिंदी व व पाकिस्तानी मिळून २०० लोक काम करीत आहेत. त्याशिवाय इतर कांहीं कारखान्यांतहि हिंदी नागरिक काम करीत आहेत. आतां साउथॉल ह्या ठिकाणीं हिंदी लोकांच्या मालकीचीं दोनशें घरें आहेत. हें उपनगर शांत असून तेथील वस्तीहि बऱ्यापैकी लोकांची आहे उडाणटप्पू लोकांचा धिंगाणा तेथें क्वचितच दृष्टीस पडतो. जीवन संथपणें चाललेलें असतें. एकंदरीनें तेथील ब्रिटिश नागरिकांत फारसें कुतूहल उत्पन्न न करतां नव्यानें आलेले हिंदी व पाकिस्तानी आपला जम बसवीत आहेत. तथापि, सार्वजनिक आरोग्य खात्याकडे थोड्याफार तक्रारी मात्र येत असतात, त्यांत नवल नाहीं. कारण असें की, भारतामधून आलेलीं नवीन कुटुंबें प्रथम आपल्या नातेवाइकांकडेच उतरतात; नंतर हळूहळू पैशाची बचत करून स्वत:चें बिऱ्हाड घेतात. दरम्यानच्या काळांत थोड्या जागेंत गरजेपेक्षा अधिक माणसें राहिल्यामुळें अस्वच्छतेचा प्रादुर्भाव साहजिकच होतो. रात्रीच्या कामाला अधिक वेतन मिळत असल्यामुळें बरेचसे नवोगत रात्रींचें काम पसंत करतात. ह्याचा फायदा घेऊन कांहीं हिंदी घरमालकांनीं आपल्या घरांतील त्याच खोल्या दिवसाच्या व रात्रीच्या पाळ्यांच्या कामगारांना पृथकपणें भाड्यानें दिलेल्या आहेत! त्यामुळें आरोग्यविषयक सोयींवर ताण पडतो. फारच थोड्या हिंदी नागरिकांची ब्रिटिश कुटुंबांत राहण्याची सोय होऊं शकेल.

अजूनहि हिंदी नागरिक ब्रिटिश समाजाशीं एकरूप झालेले नाहींत. हिंदी लोकांचे सामाजिक समारंभ स्वतंत्रपणें होतात. हिंदी लोकांना भाषेची अडचण फार भासते. बहुतेक हिंदी लोकांना त्यांच्या स्वत:च्या भाषेचेंसुद्धां ती लिहिण्याइतकें ज्ञान नसतें, मग इंग्रजीची गोष्टच नको. ह्या लोकांच्या मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नाहींत. ह्या बाबतींत हिंदी विद्यार्थी कांहीं मदत करीत नाहींत म्हणून त्यांच्यावर टीका करण्यांत येत असते. परंतु हिंदी विद्यार्थ्यांना त्यांचा वेळ स्वत:च्या अभ्यासासाठी लागतो. म्हणून त्यांचा नाइलाज होतो. हिंदी कुटुंबांना इंग्रजी शिकविण्यासाठी आतां एक संस्था काढण्यांत आली आहे. हिंदी मुलांना व त्यांच्या शिक्षकांनाहि भाषेची अडचण अतिशय नडते. साउथॉलमधील एका माध्यमिक शाळेंत ८० हिंदी मुलें आहेत. त्यांपैकी ५२ मुलांना इंग्रजीचें थोडेंसुद्धां ज्ञान नाहीं. अशा मुलांकरतां आतां वेगळाच वर्ग काढण्यांत येणार आहे. कवायत आणि खेळ ह्या दोन प्रसंगांपुरतींच हीं मुलें इतर मुलांत मिसळूं शकतील. पण त्याला इलाज नाहीं. ह्या मुलांच्या घरचीं माणसें सुद्धां इंग्लिश कुटुंबांतून क्वचितच जात असतात. पण हळूहळू ही परिस्थिति सुधारत आहे. हिंदी स्त्रिया अधिक प्रमाणांत नोकऱ्या करूं लागल्या आहेत. त्यामुळें त्यांचे सामाजिक संबंध वाढत आहेत. तरीसुद्धां खाण्यापिण्याच्या व इतर संवयी भिन्न असतात; आणि भाषेची अडचण तर असतेच असते. त्यामुळें हिंदी व इंग्लिश नागरिकांची वृत्ति आपण आपल्या ठिकाणीं बरे, अशीच आढळून येते. ही वृत्ति नाहींशी करण्यासाठी दोन्ही बाजूंकडून प्रयत्न व्हावयास पाहिजेत.



### १०१ व्या वाढदिवशीं विम्याची रक्कम दिली

अमरावती येथील सुप्रसिद्ध नागरिक सर मोरोपंत जोशी ह्यांचा १०१ वा वाढदिवस नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं आयुर्विमा कॉर्पोरेशननें त्यांनीं उतरलेल्या तिन्ही विमापॉलिसींच्या रकमा त्यांना दिल्या. ह्या सर्व पॉलिसीज हयातीनंतरच्या होत्या, व मूळ पॉलिसींच्या रकमेंत बोनसमध्येंहि भर पडलेली होती. दोन पॉलिसी सर मोरोपंत ह्यांनीं १८९० सालीं घेतलेल्या होत्या आणि तिसरी १९१० मध्यें घेतलेली होती. सर्व विमापॉलिसींची मिळून दर्शनी किंमत रु. ३०,००० होती. सामान्यपणें माणसाच्या आयुर्मर्यादेसंबंधीं ज्या अपेक्षा आहेत त्याच्यापेक्षा खूपच जास्त आयुष्य त्यांना लाभलें म्हणून आयुर्विमा कॉर्पोरेशनतर्फे आनंद प्रदर्शित करण्यांत आला. सर मोरोपंत जोशी ह्यांचा जन्म दसऱ्याचा आहे. त्याच दसऱ्याच्या दिवशीं त्यांना विम्याची रक्कम चेकनें देण्यांत आली. भारतरत्न श्री. धों. के. कर्वे ह्यांनाहि १०१व्या वाढदिवशीं असाच चेक देण्यांत आला होता.

### पश्चिम युरोपांत तेजीची अपेक्षा

ब्रिटन व पश्चिम युरोपांतील इतर देश ह्यांनीं युरोपियन समाईक बाजारपेठेंत सामील होण्याचें ठरविल्यामुळें पश्चिम युरोपांत मोठ्या प्रमाणावर तेजी उत्पन्न होईल असा अंदाज अर्थशास्त्रज्ञांनीं केला आहे. पश्चिम जर्मनीच्या उत्पादनांत १० ते १२ टक्के वाढ अपेक्षित आहे. जकातीच्या भिंती आणि आयातनिर्यातीवरील कोट्यांचे निर्बंध नाहींसे झाल्यामुळें लोखंड, पोलाद, रासायनिके धंदे, कापड व कातडी, ह्या धंद्यांना विशेष फायदा होणार आहे. २५ कोटी ग्राहकांनीं गजबजलेली बाजारपेठ एकसंध झाल्यामुळें युरोपियन समाईक बाजारपेठेंतील सर्वच देशांच्या उत्पादनांत वाढ होण्यास उत्तम संधि मिळणार आहे.

### अणुशक्ति चलित बोट वैद्यकीय दृष्ट्या धोकारहित

रशियानें उत्तरध्रुव प्रदेशांत बर्फ फोडून प्रवास करणारी अणुशक्तीवर चालणारी बोट तयार केली होती. ह्या बोटीनें आपली पहिली सफर पूर्ण केली आहे. ह्या बोटीचें नांव 'लेनिन' असें आहे. बोट प्रवास संपवून आल्यावर ती चालविणाऱ्या खलाश्यांची कसून वैद्यकीय तपासणी करण्यांत आली. वैद्यकीय तपासणीच्या कामीं बऱ्याच वैद्यकीय शास्त्रज्ञांची मदत घेण्यांत आली होती. शास्त्रज्ञांनीं खलाश्यांना कराव्या लागणाऱ्या कामाचा व कामाच्या परिस्थितीचा काळजीपूर्वक अभ्यास केला आणि अणुशक्तीवर चालणाऱ्या बोटींत प्रवास करणाऱ्यांना कोठलाहि धोका पोचणार नाहीं अशी व्यवस्था करण्यांत यश मिळालें आहे असें मत व्यक्त केलें. बोटीनें ज्या मार्गावर प्रवास केला त्या मार्गाचीहि किरणोत्सर्जाच्या दृष्टीनें पाहणी करण्यांत आली.

### न्यूझीलंडमधील रेडिओ व टेलिव्हिजन

न्यूझीलंड ह्या देशांतील रेडिओ व टेलिव्हिजनची व्यवस्था आतांपर्यंत सरकारी नियंत्रणाखालीं होती. परंतु आतां ही व्यवस्था पाहण्याचें काम एका कॉर्पोरेशनकडे सोपविण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनचा कारभार तीन सभासदांच्या कमिशनमार्फत चालविण्याचा सरकारचा विचार आहे. व्यवस्था बदलण्यासाठी करावा लागणारा कायदा लवकरच न्यूझीलंडच्या पार्लमेंट सभेंत मांडण्यांत येईल. खाजगी रेडिओ व टेलिव्हिजन केंद्रांना परवाने देण्याचा अधिकारहि कॉर्पोरेशनला देण्यांत येणार आहे. संकल्पित कॉर्पोरेशन आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होईल असा अंदाज आहे. परवाना फी व जाहिराती ह्यांच्यापासून कॉर्पोरेशनला पुरेसें उत्पन्न मिळेल.


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४३ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,०८,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,०१,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. दयं. शिगरे — अध्यक्ष

न. भू. ना. पां. थोपटे — उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी

श्री. बा. ग. धंदुके



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७ बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

३१ डिसेंबर, १९६०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०१,००० |
| ठेवी | रु. | २,२५००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५६,००,००० |

ठेवींवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक २-५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-००

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षें ३-२५

३ वर्षें ३-७५ ५ वर्षें ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

# निर्यातीची मोहीम यशस्वी कशी होईल ?

## सक्ती नको; सहकार्य द्या

सध्यां भारतापुढें जे प्रमुख प्रश्न आहेत त्यांत परदेशीय चलनाच्या सांठ्यांत सुधारणा कशी करावी हा एक आहे. ही सुधारणा करण्यासाठी दोन उपाय तातडतोब अमलांत आणतां येण्यासारखे आहेत:—( १ ) निर्यातींत वाढ करणें आणि ( २ ) कांहीं महत्त्वाचे उद्योगधंदे असे आहेत की त्यांची देशाच्या अर्थ-व्यवस्थेला तातडीची गरज आहे; हे उद्योगधंदे देशांतच चालू करून त्यांच्या पायीं खर्च होणाऱ्या परदेशीय चलनाची बचत करणें. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सुस्थितीसाठी निर्यातीचें किती महत्त्व आहे ह्याची जाणीव अलीकडे सरकारला व जनतेला होऊं लागली आहे ह्यांत शंका नाहीं. देशाच्या निर्यात व्यापारांत वाढ व्हावी म्हणून सरकारनें कांहीं उपायहि योजले आहेत. परंतु अपेक्षित फळ पदरांत पडण्यास आणखी प्रयत्नांची आवश्यकता आहे. भारताच्या योजना-मंत्र्यांनीं ह्यासंबंधीं नुकतीच एक घोषणा केली आहे. तीवरून असें दिसतें कीं, ह्या बाबतींत एक कायदा करून, देशांत तयार होणाऱ्या पक्क्या मालाची विक्री मर्यादित करण्याचे आणि कांहीं पक्का माल निर्यातीसाठी राखून ठेवण्याचे अधिकार स्वत:कडे घेण्याचा सरकारचा विचार आहे.

असा कांहीं विचार चालू असेल तर तो कांहींसा योग्य नाहीं. निर्यातीच्या प्रश्नाकडे एखाद्या विशिष्ट तात्त्विक भूमिकेवरून पाहून तो सोडविण्याचा हा प्रयत्न आहे. निर्यातीला उठाव मिळावयाचा असेल तर उपाययोजना अधिक वास्तववादी आणि व्यवहार्य असली पाहिजे. निर्यातीची सक्ति करून निर्यात वाढणार नाहीं. हा प्रश्न देशाच्या अर्थव्यवस्थेला मूलभूत असा असल्यानें तो सोडविण्यासाठी सरकार, कारखानदार आणि लोक ह्यांचें सहकार्य व्हावयास पाहिजे. केवळ निर्बंधात्मक कायदे करून तो सुटणार नाहीं. निर्यात वाढविण्यास उत्तेजन म्हणून सरकारनें कांहीं इतर उपाय योजण्याचें ठरविलें आहे. त्यांचा उपयोग होईलच. त्यापैकीं कांहीं असे आहेत. करांत कांहीं प्रमाणांत सूट, निर्यातीच्या मालावरील अबकारी करांत सवलती, रिफंडच्या पद्धतीचा विस्तार, रेल्वेवाहतुकीचे सवलतीचे दर, कच्च्या मालाच्या किंमतींत कपात आणि निर्यात मालाचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांना परदेशीय चलनाची मंजुरी. सरकारकडून निर्यात व्यापारासाठी आज कांहीं सवलती व सोयी मिळत आहेत. त्यांत वर दिलेल्या उपायांची भर पडली तर निर्यात-व्यापार अधिक फोफावण्यास आणखी मदत होईल ह्यांत शंका नाहीं.

पण, निर्यातीच्या यशासाठी कांहीं आवश्यक गोष्टींची दखल घेणें आवश्यक आहे. निर्यातीचा माल दर्जेदार असला पाहिजे आणि त्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर झालें पाहिजे. त्याचप्रमाणें उत्पादित मालाच्या किंमती स्पर्धेत टिकण्यासारख्या असल्या पाहिजेत. हें साधण्यासाठी योग्य तें वातावरण निर्माण करण्याचें काम सरकारचें आहे. सुसूत्र उत्पादन होण्याच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी असतील त्यांचें निराकरण करण्यांत आलें पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १९६६ सालीं ८०० कोटी रुपयांच्या निर्यातीचें उद्दिष्ट नमूद करण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गाठावयाचें असेल तर सरकार, कारखानदार आणि निर्यात व्यापारी ह्यांनीं एकदिलानें प्रयत्न करावयास पाहिजेत. सरकारनें दिलेल्या सवलतींचा व सोयींचा फायदा घेऊन कारखानदार आपल्या उत्पादनापैकीं कांहीं हिस्सा माल निर्यात करण्यास फारतर उत्तेजित होतील. पण तेवढ्यानें प्रश्न सुटणार नाहीं.

परदेशांच्या बाजारपेठेंत विक्रीसाठी पाठविला जाणारा भारताचा माल किंमतीच्या व गुणाच्या बाबतींत स्पर्धा करणारा असला पाहिजे. फक्त कारखानदारांनाच आपलें उत्पादन वाढवून आणि त्याची गुणवत्ता वाढवून हा प्रश्न सोडविता येण्यासारखा आहे. कारण मालाचा दर्जा व किंमत ह्यावर तेच नजर ठेवूं शकतात. कितीहि कायदे केले तरी कारखानदारांचें मनापासून सहकार्य नसेल तर त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं. दर्जेदार माल भरपूर प्रमाणांत आणि अल्प खर्चांत निर्माण करून उद्योगधंद्यांनीं सहकार्य केलें तरच अखेर शेवटीं निर्यातीच्या मोहिमेंत थोडेंफार यश येणार आहे. म्हणून सरकारनें कारखानदारांना विश्वासांत घेऊन त्यांचें सहकार्य मिळवावें. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील निर्यातीचें उद्दिष्ट गांठण्या-साठी त्यांच्या खऱ्याखुऱ्या सहकार्याची अतिशय आवश्यकता आहे. निर्यात वाढविण्याची आणि परदेशीय चलनाबाबतची परिस्थिति सुधारण्याचा एवढाच एक मार्ग आहे. निर्यात वाढविण्यासाठी पुष्कळ कार्य करण्यांत आलें आहे; आणि तरी सुद्धां अजून पुष्कळच करतां येण्यासारखें आहे.

—शंतनुराव किर्लोस्कर

टेलिफोन ७४९१. टेलिफोन—"कार्योद्यान"

आमच्या ग्राहक–हितचिंतकांस नव-दीपावली सुखसमृद्धि देवो !

नव्या वर्षी नवी बातमी —

आपल्या मध्यवर्ती व भव्य इमारत बांधणीस

उद्यान कार्यालय

लवकरच सुरुवात करणार !

गेल्या महाप्रलयांत हजारों रुपयांचें नुकसान झालें असलें तरी तें दुःख विसरून व्रतबंध-विवाहादि कार्यें यथासांग पूर्ण करण्यास, नव-उत्साहानें व नव-साहित्यानें उद्यान कार्यालय कटिबद्ध आहे. ३६ पानी समग्र माहिती-पत्रक मागवा.

—कार्य ठरतांच उद्यान कार्यालयांत प्रथम चौकशी करा—

उद्यान कार्यालय, ११९ शनिवार पेठ, पुणे २.

जय सहकार

(स्थापना ता. १३-१०-१९३९)

रजि. नं. १९३५५

## शेतकरी सहकारी संघ लि.

## कोल्हापूर

प्रमुख कचेरी :—जुना राजवाडा, कोल्हापूर

तार :—शेतकरी ] फोन नं. १२५ [सभासद १२,३३९

★ विभाग – ११ ★ शाखा, दुकानें – ४३

★ विक्री, केंद्रें – ३६

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | २,८८,४५० |
| रिझर्व्ह फंडस् | रु. | १७,२५,८७१ |
| खेळतें भांडवल | रु. | ९३,२८,००० |

सन १९६०–६१ चा व्यवहार रुपये १८,००,००,०००

आंतरराष्ट्रीय सहकारदिनाचे सप्ताहास येणारी ही दीपावली अखिल मानवांचे अंतःकरणांत सहकाराचे मंगलदीप प्रज्वलित करो आणि जगतांत शांतता आणि समृद्धीचा वर्षाव करो.

ना. गो. सरदेसाई, कार्यकारी-संचालक.

दा. गो. माने, अध्यक्ष.



ही दीपावली व नूतन वर्ष आमच्या बँकेच्या सर्व भागीदारांस, ठेवीदारांस व आश्रयदात्यांस सुखाची व समृद्धीची जावो.

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना इ. स. १९४१] तालुका- बेळगांव [फोन नं. ५३५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | १,५०,०००– ० |
| वसूल शेअर भांडवल | रु. | १,१२, ००–० चेव |
| रिझर्व्ह फंडस् | रु. | १,४६, ००–०० चेव |
| एकूण ठेवी | रु. | १५,०० ०००–०० चेव |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. | ५,४२,३००–०० चेव |
| एकूण खेळतें भांडवल | रु | १८,००,००० चेव |

★ ठेवीवरील व्याज :—शे. १ टक्का ते ४½ टक्क्यांपर्यंत.

★ या बँकेतून भारतांतील सर्व प्रमुख शहरीं चेक्स, बिलें, हुंड्या, रेल्वे रसिदी, इत्यादींची माफक कमिशनवर वसुलीची कामें त्वरित केलीं जातात.

★ या बँकेत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ ही बँक आरंभापासून "अ" वर्गांत आहे.

तरी सर्वांनीं अवश्य फायदा घ्यावा.

व्ही. एन. मिसाळ, B. A., LL. B., चेअरमन.



## दि कोल्हापूर मराठा

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

स्थापना : १९३३



| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ३,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें | | |
| शेअर भांडवल | रु. | १,२२,५५५ |
| रिझर्व्ह फंड | रु. | ७२,९६८ |
| इतर फंडस् | रु. | ४५,१६० |
| खेळतें भांडवल | रु. | ६,७७,२३५ |
| सभासद संख्या | | २,८७४ |
| चालू सालचा निव्वळ नफा | रु. | १९,१६८ |
| जाहीर केलेलें डिव्हिडंड | रु. | ६·२५% |

डी. के. पाटील, मॅनेजर.

आनंदराव बाबाजी गौड, प्रेसिडेंट.



महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रांतील

५० वर्षांची संस्मरणीय कारकीर्द !

## दि महाराष्ट्र स्टेट

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, मुंबई

१९११–१९६१

९, बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

टेलिफोन : २५५४७४–७५ ★ ग्रॅम : फार्मरबँक

सहकारी क्षेत्रांत आमच्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची आमची उमेद आम्ही या मंगल प्रसंगीं व्यक्त करतों.

चिं. द्. दाते, मॅनेजिंग डायरेक्टर

ध. रा. गाडगीळ, चेअरमन.

# सहकारी चळवळीचें वाढतें परावलंबित्व

## रक्तपुरवठा शरीरांतच उत्पन्न व्हायला हवा !

चालू सहकारी अर्थव्यवस्थेंत राज्य सहकारी बँकांची संख्या २२ आहे. प्रत्येक राज्यांत व केंद्रशासित प्रदेशांत एकेक बँक आहे. या बँकांतून वैयक्तिक सभासदांची संख्या कमी होत आहे व त्यांचें सभासदत्व फक्त जिल्हा मध्यवर्ती बँकांपुरतें मर्यादित होत आहे. या राज्य सहकारी बँकांचें १९५९-६० या सालांत वसूल भांडवल व निधि मिळून स्वतःचे भांडवल १६·१७ कोटि रुपयांचें होतें व खेळतें भांडवल १७५ कोटींचें होतें. देशांत जिल्हा मध्यवर्ती बँका ४०० असून त्यांनीं १९७ कोटि रुपयांचें कर्ज दिलें आहे. पण पश्चिम बंगाल, बिहार व आसाम या राज्यांत ४० टक्के थकबाकी आहे. एकूण थकबाकी २४ कोटींची आहे.

शेती पतपेढ्यांचें खेळतें भांडवल सुमारे २२४ कोटि होतें व त्यांनीं जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्यसरकारें यांच्याकडून घेतलेलें कर्ज सुमारें १४२ कोटि होतें. या मंडळींनी सभासदांस सुमारें १७० कोटींचें कर्ज दिलें होतें. पैकीं अल्प मुदतीचें कर्ज १५५ कोटि रुपयांचें आहे. थकबाकीचें सर्वसामान्य प्रमाण २१ टक्के आहे.

वरील आंकडेवारीवरून असें दिसून येईल कीं, सहकारी चळवळीची गंगोत्री रिझर्व बँक असून तिच्याकडून कर्जरूपानें मिळणारें गंगोदक राज्य सहकारी बँकांच्या गोमुखांतून प्राप्त होतें. कारण रिझर्व बँकेला प्रत्यक्ष शेतकऱ्यांशीं कायद्यानें व्यवहार करतां येत नसल्यामुळें या मध्यस्थ बँकांमार्फतच सहकारी चळवळींशीं संबंध ठेवतां येतो. याप्रमाणें राज्य सहकारी बँका या दोहोंमधील अनन्यसाधारण दुवा बनलेल्या आहेत. या दुव्याच्या बळकटीवरच सहकारी चळवळीची कमान पेलत राहिली आहे व जोंपर्यंत हा सांधा बळकट असेल तोंपर्यंतच ही कमान शाबूत राहील.

### रिझर्व्ह बँकेवर अधिक जबाबदारी

पूर्वी रिझर्व बँकेचें शेती कर्ज-पुरवठा खातें फक्त सल्लामसलत देत असे व सहकारी चळवळीला लागणारा पैसा प्रांतांतील सहकारी संस्थांच्या शिखरवर्ती असणाऱ्या प्रांतिक सहकारी बँकेकडून होत असे. ग्रामीण पतपेढ्यांची पाहाणी करणाऱ्या समितीच्या सूचनेवरून सरकारनें सहकारी चळवळींत भागीदारी पत्करण्याचें ठरविल्यानंतर प्रांतिक सहकारी बँकांची घटना एकावयवी राहिली नाहीं. तिला साहजिकच जिल्हा मध्यवर्ती बँकांचें संयुक्त समितीचें स्वरूप प्राप्त झालें. जेथें मध्यवर्ती बँका स्थापन झालेल्या नव्हत्या तेथें प्रांतिक बँक आपल्या शाखांमार्फत कर्जपुरवठा करीत असे व मध्यवर्ती बँक स्थापन झाली व तिनें त्या त्या प्रदेशांतील पुरवठ्याचें कार्य आपल्या हातीं घेतलें कीं प्रांतिक बँक तेथून आपला पाय काढून घेत असे. कर्ज-पुरवठ्याकरतां लागणारा पैका ती राजधानींतील सभासद व बिगर-सभासद यांच्याकडून ठेवी घेऊन उभा करीत असे. १९४७-४८ सालांत सहकारी संस्थांनीं शेती उत्पादन कर्ज १८॥ कोटींचें दिलें होतें. पण त्यांतील रिझर्व बँकेचा वांटा फक्त १७ लाख रुपयांचा होता. आतां ही कर्ज-पुरवठ्याची जबाबदारी रिझर्व्ह बँक व स्टेट बँक यांच्यावर टाकण्यांत आली आहे. शेती-उत्पादनास दिलेल्या एकूण १६० कोटी कर्जापैकी रिझर्व्ह बँकेचा वांटा १०० कोटि किंवा त्याहून थोडा जास्तच आहे. तिच्या पंचवार्षिक योजनेंत हा कर्जांत ५००।६०० कोटींपर्यंत वाढ व्हावी अशी मागणी आहे व त्या प्रमाणांत रिझर्व्ह बँकेवरील कर्जपुरवठ्याची जबाबदारी वाढणार आहे. रिझर्व्ह बँकेला हा व्यवहार राज्य सहकारी बँकांमार्फत करावा लागतो. सबब हा बोजा पेलण्याची ताकद त्या बँकांत असली पाहिजे. राज्य सहकारी बँकांतील पहिल्या क्रमांकाच्या बँकेचा म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा जर विचार केला तर तिचें वसूल झालेलें भांडवल सुमारें ३। कोटींचें आहे व निधि वगैरे जवळजवळ १ कोटींचे आहेत. यांच्या एकवट बेरजेच्या वीसपट म्हणजे सुमारें ८० कोटींचें कर्ज तिला उभारतां येईल. पैकीं सुमारें वीस कोटींच्या तिच्या ठेवी आहेत. त्या वजा जातां सुमारें ६० कोटि रुपये तिला रिझर्व्ह बँकेकडून अगर अन्य ठिकाणांहून कर्जाऊ आणतां येतील. या पैकीं जून १९६१ अखेर तिला २२ कोटि, ७० लक्ष इतकें कर्ज मिळालेलें होतें. अजून सुमारें ४० कोटि रुपयांपर्यंत कर्ज विद्यमान भागभांडवल व निधि यांच्या जोरावर ती उभे करूं शकेल. जर अखिल हिंदुस्थानांत, या बँकेच्या दर्जाच्या इतर राज्य सहकारी बँका असत्या तर तिसऱ्या योजनेंतील संकल्पित अल्प व मध्यम मुदतींचें कर्ज शेतीस देण्याचें उद्दिष्ट साध्य होऊं शकलें असतें. पण सन १९५७-५८ सालांत सर्व राज्य सहकारी बँकांनीं या प्रकारचें जें कर्ज दिलें त्यांतील सुमारें निम्म्याहून ज्यास्त एवढें कर्ज याच एकट्या बँकेनें दिलें होतें. यावरून या बँकेच्या तुलनेनें त्या इतर बँका किती कमकुवत आहेत तें दिसून येतें व त्यांना ही नवीन जबाबदारी कितपत पेलेल याची रास्त शंका निर्माण होते.

राज्य सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेचें कर्ज मिळण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेजवळ, त्यांच्या अल्प मुदतीच्या ठेवींच्या २ टक्के व दीर्घ मुदतीच्या ठेवींच्या १ टक्का इतकी रकम ठेवावी लागते. रिझर्व्ह बँक जेव्हां राज्य सहकारी बँकांना कर्ज देते तेव्हां त्यांचें स्वतःचें मालकीचें भांडवल किती आहे व त्यांचेकडे ठेवींच्या रूपानें जमलेलें भांडवल किती आहे, यावरून ती त्यांची पत किती आहे तें ओळखते. अलीकडे सरकार भांडवल पुरवील या गैरसमजावर, खाजगी ठेवीदारांविषयी व वैयक्तिक भागीदारांविषयी सहकारी चळवळींत तुच्छतापूर्वक उद्गार काढले जातात, ते अंतीं त्या चळवळीस बाधक झाल्याशिवाय राहणार नाहींत.

### जिल्हा मध्यवर्ती बँक

कर्जे मिळण्यास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना राज्य सहकारी बँक व रजिस्ट्रार यांच्यामार्फत नवीन वर्ष सुरू होण्याच्या अगोदर १ महिना अर्ज करावे लागतात. रिझर्व्ह बँक कर्जमर्यादा मंजूर करते. ही मर्यादा "अ" वर्गातील बँकांच्याबाबत त्यांच्या मालकीच्या भांडवलाच्या तिप्पट व 'ब' वर्गातील बँकांचेबाबत दुप्पट असते. या मर्यादेच्या आंत काढलेलीं कर्जे त्यांच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या आंत परत केलीं पाहिजेत व त्यांचा वापर शेतीचें उत्पादन व मालाचा उठाव यांकडे केला पाहिजे यावर भर दिलेला असतो. मध्यम मुदतीचीं कर्जे देतां यावीं म्हणून रिझर्व्ह बँकेचा कायदा दुरुस्त झाला व १५ महिने ते पांच वर्षे मुदतीची कलम १७ (४) (अ) प्रमाणें कर्जे देतां येऊं लागलीं. तीं सरकारची जामिनकी व सोसायट्या व जि. म. बँका यांच्या वचनचिठ्ठ्यांवर देण्यांत येतात. त्यांचा उपयोग

जमीनसुधारणा, बांधबंदिस्ती, बैलखरेदी, शेतीचीं अवजारें व यंत्रें, वगैरेकरिता करतां येतो. यासाठीं राज्य सहकारी बँकेकडून मार्च १९५८ अखेर सुमारें ३॥ कोटि रुपये येणें होतें. जून १९५९ अखेर रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीय कृषिनिधींतून जवळजवळ ६ कोटि रुपये ११ राज्य-सहकारी बँकांचे भाग विकत घेण्याकरिता मंजूर झाले. शेतीच्या हंगामांत तिनें १६ राज्य-सहकारी बँकांस ६५ कोटि, ४३ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. ६ साखर-कारखान्यांत भाग विकत घेण्याकरितां मुंबई-राज्य सहकारी बँकेस २ कोटि रुपये कर्ज दिलें. नऊ राज्य-सहकारी बँकांस मध्यम मुदतीचीं कर्जे देण्याकरतां ४॥ कोटींचीं कर्जे दिलीं.

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचें मत

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. अय्यंगार यांनीं एका भाषणांत असा इशारा दिला आहे कीं, सुरुवातीस रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जावर सहकारी संस्थांनीं आपल्या संसाराची उभारणी करण्यास हरकत नाहीं. पण हें परावलंबित्व नित्याचें होऊं नये. रि. बँकेकडून घेतलेल्या कर्जाची इष्टानिष्टता त्या कर्जाचा उपयोग उत्पादनाकडे किती सचोटीनें, काटेकोरपणानें व किफायतशीरपणें केला जातो यावर अवलंबून आहे. जर त्यामुळें सहकारी संस्थांस बळकटी प्राप्त होत असेल, तर त्याचा खरा उपयोग.

या दृष्टीनें सहकारी संस्थांची पाहणी करतां निराशाच पदरीं येते. १९५७-५८ सालांत ज्या पतपेढ्यांचें ऑडिट झालें त्यांपैकीं फक्त १४·७ टक्के मंडळ्या "अ" वर्गांत किंवा "ब" वर्गांत होत्या. बाकीच्या ६४·९ टक्के मंडळ्या "क" किंवा "ड" वर्गांत होत्या ! सन १९५८-५९ सालीं सर्वसामान्य थकबाकीचें प्रमाण जरी येणें कर्जाच्या २० टक्के होतें तरी एका राज्यांतलें ५० ते ६० टक्के इतकें होतें ! याप्रमाणें सहकारी चळवळ खालावण्याला त्यांच्या मतानें नेतृत्वाचा दर्जा खालावला आहे हें होय. ती चळवळ राजकीय पक्षाच्या हातीं जाणें हेंहि घातक आहे. त्या चळवळींत घालावयाला भांडवलाहि बँकेच्या गंगाजळींत भरपूर आहे. पण तें खेचून घेण्याकरितां महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेप्रमाणें सामर्थ्यवान् पंच कोठें आहेत ? तसे पंच असतील तर, सहकारी शेतीचा मळा पिकण्यास भांडवलाची अडचण पडणार नाहीं. खरी उणीव भांडवलाचा परिणामकारक उपयोग करणाऱ्या संस्थांची आहे.

### पंतप्रधान नेहरूंचें आवाहन

नोव्हेंबर १९६१ मध्यें दिल्ली येथें आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या बैठकीचें उद्घाटन करतांना पंडित नेहरू म्हणाले कीं, सहकारी चळवळीच्या विविधिने होणाऱ्या प्रगतीपेक्षां अखिल भारतास सहकारी चळवळीनें गदगदा हालवून सोडणें इष्ट आहे. २५-३० वर्षांपूर्वी राष्ट्रीय सभेनें संघराज्याचें ध्येय म्हणून अंगीकारलेला सहकार ही एक जीवननिष्ठा आहे व ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास समर्थ आहे. पंतप्रधानांची आपल्या स्वभावधर्माप्रमाणें सहकारी चळवळीचा फैलाव होण्याकरिता उतावीळी दर्शविली असली तरी प्रत्यक्ष संस्था चालवितांना शेतीची वाढ व सहकारी यंत्रणेची कार्यक्षमता यांजकडे दुर्लक्ष करता येणार नाहीं.

कर्जरूपानें मदत देतांना, रिझर्व्ह बँक, (१) सहकारी संस्थांचें स्वतःचें भांडवल वर्धिष्णु आहे कीं नाहीं. (२) यंत्रणा कार्यक्षम आहे काय ? (३) त्या ठेवींचें भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत कीं नाहीं ? (४) शेतीकर्जे विस्तृत क्षेत्रांत विखुरलें जात आहे कीं नाहीं ? ह्या गोष्टी पाहील. श्री. वैकुंठभाई मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं सहकारी संस्थांना कर्जाऊ रकमा मिळण्याची योजना कार्यवाहींत आणण्याकरिता एक समिति नेमली होती. तिनेंहि रिझर्व्ह बँकेनें कर्जपुरवठा करतांना कोणते निकष वापरावे त्याबाबत तपशीलवार सूचना केल्या आहेत.

### सुयोग्य यंत्रणा हवी

भारतांतील सहकारी चळवळीचा जो आढावा रिझर्व्ह बँकनें प्रसिद्ध केला आहे त्यावरून असें दिसतें कीं, एकूण १६९ कोटींचें कर्ज शेती-उत्पादनाकरिता दिलें गेलें आहे. त्याची परतफेड उत्पादित मालाच्या विक्रींतून व्हावयाची, तर त्या मालाची विक्री करणाऱ्या सहकारी मंडळ्यांची संख्या जरूरीच्या मानानें अत्यंत कमी आहे, म्हणजे त्या २५०९ आहेत. रिझर्व्ह बँकेनें सहकारी चळवळीस पैकारूपी रक्ताचा कितीहि पुरवठा करण्याचें मनांत आणलें तरी त्या रक्ताचें अभिसरण होण्याकरिता पतपेढ्या व विक्री मंडळ यांचें जाळें सहकाररूपी पुरुषाच्या शरीरांत उत्पन्न व्हावयास हवें. म्हणजे पतपेढ्यांतून शुद्धरक्तरूपी पैका शेतीकरिता पुरवून व त्याच्या उपयोगाने उत्पन्न झालेल्या मालाची विक्री विक्रीमंडळांमार्फत करून तो पैका पुन्हा परत उगमस्थानाकडे आला पाहिजे. पण त्यासाठी योग्य ती यंत्रणा न उभारतां केवळ पैका गुंतविण्यांत आला तर सहकारी संस्थांचें धरण फुटून त्यांतील पैशाचा पूर मात्र फुकट वाहून जाईल व देशांतील शेती व शेतकरी मात्र निराधार व कोरडाच राहील ! —म. धों. विद्वांस

विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरेंटी' मुळें,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेलें पुण्यांतील अग्रेसर कापडदुकान
ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स
'होम ऑफ क्वालिटी अ‍ॅण्ड व्हरायटी'
पेरूगेट रोड, पुणें २.
फोन नं. ७३१८

# इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन

## अठरा उद्योगधंद्यांना २१ कोटी रुपयांचें कर्ज

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें १९६०–६१ मध्यें एकूण २१·२१ कोटी रुपये कर्जाच्या अर्जास मान्यता दिली. या कॉर्पोरेशननें आतांपर्यंत केव्हांहि मंजूर केलेल्या कर्जाच्या रकमेपेक्षा ही रक्कम सर्वांत अधिक आहे. या पूर्वीच्या वर्षीं या कॉर्पोरेशननें १७·९१ कोटी रुपयांच्या कर्जास मान्यता दिली होती. ३० जून, १९६१ रोजीं संपलेल्या वर्षाच्या वार्षिक अहवालांत ही माहिती देण्यांत आली आहे. अठरा उद्योगधंद्यांनीं केलेल्या ५७ अर्जासाठी ही रक्कम मंजूर करण्यांत आली.

हें कॉर्पोरेशन स्थापन झाल्यापासूनच्या तेरा वर्षांच्या काळांत त्यानें २३९ कारखान्यांना एकूण १०५·८२ कोटी रुपये मंजूर केले. सन १९६०–६१ मध्यें नव्या कारखान्यांकडून ४७ व जुन्या कारखान्यांकडून १० अर्ज कर्जासाठी आले होते व त्यांना अनुक्रमें १६·९५ कोटी रुपये व ४·२६ कोटी रुपये मंजूर करण्यांत आले.

या वर्षीं एकूण ३६·८५ कोटी रु. कर्जासाठी ७६ अर्ज आले होते. त्यांपैकी २ अर्ज फेटाळण्यांत आले, १४ अर्ज रद्द झाले किंवा मागें घेण्यांत आले व २८ अर्ज वर्षअखेरीस निकालांत निघावयाचे होते.

अमेरिकेच्या विकास कर्जनिधींतून मिळालेल्या १ कोटी डॉलर कर्जांतून १४ उद्योगधंद्यांना एकूण ४·२९ कोटी रुपयांचें कर्ज देण्यांत आलें.

राज्यनिहाय कर्जवांटणीचा विचार करतां प. बंगालमधील सर्वांत अधिक म्हणजे १३ कारखान्यांना व त्याखालोखाल महाराष्ट्रांतील १२ कारखान्यांना कर्ज मंजूर करण्यांत आलें.

उद्योगधंदेनिहाय मिळालेल्या कर्जाचा विचार करतां साखर धंद्याला सर्वांत अधिक म्हणजे ४·८० कोटी रुपये, त्याखालोखाल कागद ३·५० कोटी रुपये व कापडधंदा २·१६ कोटी रुपये, असा क्रम लागतो.




### सहकारी संस्थांना वरचा क्रम

या कॉर्पोरेशननें मंजूर केलेल्या कर्जांपैकी २२·४ टक्के कर्जे सहकारी संस्थांना देण्यांत आलें. यावरून सहकारी क्षेत्राला कॉर्पोरेशननें किती वरचा क्रम दिला आहे तें दिसून येतें. एकूण ४·४५ कोटी रुपये कर्जांच्या आठ अर्जांना मान्यता देण्यांत आली. यांपैकी ७ सहकारी साखर संस्था असून एक सहकारी कापड धंदा संस्था आहे. हें कर्ज जमेस धरतां सहकारी संस्थांसाठी या कॉर्पोरेशननें दिलेल्या कर्जांची एकूण रक्कम २३·६९ कोटी रुपयांवर गेली आहे. यांपैकी २३·१९ कोटी रुपये निरनिराळ्या राज्यांतील ३७ सहकारी साखर संस्थांसाठी देण्यांत आले आहेत.

### अंडररायटिंगविषयक सोयी-सवलती

अंडररायटिंगसाठी कॉर्पोरेशनकडे सदर वर्षी आलेल्या २८ प्रकरणांपैकी ८ प्रकरणीं व गतवर्षांपैकी बाकी राहिलेल्या ४ प्रकरणीं कॉर्पोरेशननें मान्यता दिल्यामुळें एकूण ४·१९ कोटी रुपये किंमतीच्या अंडररायटिंगना मान्यता दिल्यासारखें झालें आहे. अंडररायटिंगसाठी आलेल्या अर्जांपैकी मान्यता मिळालेल्या ४ अर्जांच्या बाबतींत अंडररायटिंगविषयक एकूण १·६० कोटी रु. चे करार करण्यांत आले.

दीर्घ मुदतीच्या कर्जफेडीबाबतच्या हमीसाठी करण्यांत येणाऱ्या अर्जांचा विचार करतां या वर्षी त्यांच्या संख्येंत बरीच वाढ झाली. गेल्या वर्षी ५, तर या वर्षी १४ अर्ज आले. यांपैकी १३·२८ कोटी रुपये किंमतीच्या एकूण ९ अर्जांस कॉर्पोरेशननें मान्यता दिली. ही हमी जमेस धरून १९५७ पासून कॉर्पोरेशननें मान्य केलेल्या अशा अर्जांची संख्या २० वर व एकूण रक्कम २५·४६ कोटी रुपयांवर गेली आहे.

### कर्जांचें वांटप

या वर्षी कॉर्पोरेशननें एकूण ६·६२ कोटी रुपये कर्ज दिलें. गेल्या वर्षी दिलेल्या ८·४१ कोटी रुपये कर्जांचा विचार करतां ही रक्कम त्याहून कमी दिसत असली तरी १९५० ते १९६० या १० वर्षांच्या ४·४९ कोटी रुपये वार्षिक सरासरीपेक्षा ती अधिक असल्याचें दिसून येईल.

### कर्जांची परतफेड व व्याज

अहवालाच्या या वर्षांत कॉर्पोरेशनला व्याजापोटीं २·५६ कोटी रु. व परतफेड म्हणून ३·७१ कोटी रुपयांचे हप्ते मिळाले.

हें कॉर्पोरेशन स्थापन झाल्यापासून दिल्या गेलेल्या संपूर्ण कर्जावर एकूण ११·७० कोटी रुपये व्याज झालें व त्यांपैकी प्रत्यक्षांत ११·६७ कोटी रुपये मिळाले. बुडीत रक्कम एकूण येणें असलेल्या रकमेच्या ०·२५ टक्के आहे. गेल्या वर्षीचें हेंच प्रमाण १·२ टक्के होतें. हें कॉर्पोरेशन स्थापन झाल्यापासून येणें असलेलें मूलधन एकूण ९·६६ कोटी रु. होतें त्यांपैकी ९·२० कोटी रुपये आले. मुदत वाढवून दिलेले २३·३० लक्ष रुपये वगळतां बुडीत रक्कम २२·६५ लक्ष रुपयांवर म्हणजे येणें असलेल्या रकमेचा २·३४ टक्क्यांवर गेली. गेल्या वर्षीचें हेंच प्रमाण ४·३ टक्के होतें.

### ताळेबंद

अहवालाच्या या वर्षांत कॉर्पोरेशनला एकूण २·९८ कोटी रुपये उत्पन्न मिळालें. गेल्या वर्षीचा हाच आंकडा २·५० कोटी रु. होता. गेल्या वर्षी कॉर्पोरेशनला ५९·५१ लक्ष रुपयांचा, तर या वर्षी ८४·७५ लक्ष रुपयांचा फायदा झाला. कॉर्पोरेशनच्या सर्वसाधारण राखीव निधींत या वर्षी ६३·५० लक्ष रु. ची भर पडल्यानें तो १·३२ कोटी रुपयांवर गेला आहे. खास राखीव निधींतील शिल्लक जमेस धरतां हा निधि १·६९ कोटी रुपये आहे.


ही दिवाळी बँकेच्या सभासद-हितचिंतकांना सुखाची जावो !

**दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी**

चें बाविसाव्या वर्षांत यशस्वी पदार्पण !

दीड लाखावर रक्कम, डिव्हिडंडदाखल आजवर वांटली गेली। भाग भांडवल व राखीव निधींचा आंकडा पांच लाखांवर गेला !!

खेळतें भांडवल : रु. २९,४०,०००

—: अध्यक्ष व संचालक मंडळ :—

(१) श्री व्यं. श्री. फडके B. SC. LL. B. (अध्यक्ष)
(२) श्री. एस्. एम्. अथणी (चेअरमन)
(३) श्री एम्. ए. शहा (व्हाइस चेअरमन)
(४) श्री. जी. के. गाडगीळ B. A., LL. B. (डायरेक्टर)
(५) श्री. टी. के. लाहोटी ,,
(६) श्री. आर. एन्. पडसाली ,,
(७) श्री. जे. व्ही. आर्नाखिंडी ,,
(८) श्री. एन्. एम्. जोगीमरडी ,,
(९) श्री. आर. बी. आंचली ,,
(१०) श्री. बी. जी. कटगी ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एस्. के. जंबगी, अकौंटंट. म. द. खाडिलकर, मॅनेजर.

**दि मिरज स्टेट बँक, लि.**

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर


१ वर्ष ३½% ३ वर्षे ४½%
२ वर्षे ४% ४ वर्षे ४¾%
५ वर्षे ५%

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# "गोगटे माइन्स" चें पुढें पाऊल



'गोगटे माइन्स' च्या मालवाहू बोटींना मुख्य मंत्री श्री. चव्हाण 'शुभास्ते पंथान:' हा आशीर्वाद देत आहेत. व्यासपीठावर डावीकडून उजवीकडे सौ. उषाताई गोगटे, श्री. बा. म. गोगटे, सौ. वेणुताई चव्हाण व श्री. मारोतराव कन्नमवार बसलेले दिसत आहेत.

श्रीयुत बा. म. ऊर्फ मधुकर गोगटे ह्यांच्या "गोगटे माइन्स" च्या मालकीच्या 'कृष्णा' आणि 'कोयना' ह्या यंत्रचलित छोट्या मालवाहू बोटींचा जलवितरण समारंभ दि. २२ ऑक्टोबर १९६१ रोजीं सौ. वेणुताई चव्हाण आणि सौ. उषाताई गोगटे ह्यांच्या हस्तें झाला. ह्या बोटी बांधून तयार करणाऱ्या ॲलकॉक ॲशडाउन आणि कं. लि. च्या माझगांव (मुंबई) येथील डॉकसमध्यें झालेल्या ह्या समारंभाचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हे होते. वडिलांचा व्यवसाय डॉक्टरीचा, स्वत: वकील झालेल्या पण उद्योगधंद्यांत पुढें येण्याची ईर्ष्या असणाऱ्या श्री. गोगटे ह्यांच्या आयुष्यांतील हा महत्त्वाचा प्रसंग होता, आणि त्यांचें कौतुकपूर्वक शुभचिंतन करण्यासाठी त्यांचे हजारो वैयक्तिक आणि व्यावसायिक मित्र त्या वेळीं उपस्थित होते. श्री. गोगटे ह्यांनीं अल्पावधींत केलेल्या प्रगतीकडे सर्वांचें लक्ष जाणें स्वाभाविकच होतें.

हायकोर्ट प्लीडरची परीक्षा पास झाल्यानंतर लवकरच कर्नाटक ॲडव्होकेट क्लास ते चालवूं लागले, बेळगांव जिल्हा मोटार युनियनचे सेक्रेटरी म्हणून काम पाहूं लागले, मोटर-ओनर्स इन्शुअरन्स कंपनीच्या स्थापनेंत पुढाकार घेतला, मोटारीबाबत कायदे-कानूंचे तज्ज्ञ म्हणून त्या व्यवसायांत पुढें आले, बस आणि मालवहातुकीच्या धंद्यास प्रारंभ केला, बेळगांव सिटी बस सर्व्हिस सुरू केली, आइस फॅक्टरी स्थापन केली, मासे गोठवून ते मोसमाबाहेर विकण्याचा धंदा करण्यास प्रेरित झाले, त्या धंद्याच्या अभ्यासासाठी विलायतला गेले, आणि येतांना वाटेंत जर्मनीमधील प्रचंड कारखाने पाहून, लोखंड आणि मँगेनीज भारतामधून पुरविण्याचा धंदा करण्याचें त्यांनीं मनांत घेतलें; आतां श्री. गोगटे हे खाणींच्या व्यवसायांत अग्रस्थानीं आहेत, हें सुप्रसिद्धच आहे.

कॅसलरॉकपासून दक्षिणेकडे १० मैलांवर घनदाट अरण्यांत कुवेशी येथें १ जानेवारी, १९५५ रोजीं श्री. गोगटे ह्यांनीं मँगेनीजसाठी पहिली कुदळ हाणली; त्यापूर्वी त्यांना ह्या खाणींच्या जागेची निवड करण्यासाठी जंगलांतून कितीतरी भ्रमण करावें लागलें होतें. हिंस्र श्वापदें, साप, जळवा, काटेकुटे, यांतून त्यांनीं मार्ग काढून आणि जंगलांतच कंदिलाच्या सोबतीनें रात्रीं विचारमग्न अवस्थेंत जागरणें करून आपल्या औद्योगिक आयुष्यक्रमाचा पाया तयार केला. रेडी येथील लोखंडाच्या खाणी हा त्यांच्या प्रगतीचा पुढचा टप्पा होय. किनाऱ्यावरून दूर समुद्रांत उभ्या असलेल्या आगबोटींत कच्चें लोखंड नेण्यासाठी कंत्राटानें कामें घेणाऱ्या कंपन्या असतात; पण ही कामगिरी स्वत:च करून स्वयंपूर्ण होण्यासाठी त्यांनीं आतां दोन मालवाहू बोटी बांधून घेतल्या आहेत, त्यांची किंमत सुमारें ८ लक्ष रुपये आहे !

रेडी येथें असणाऱ्या कच्च्या लोखंडाच्या सर्व खाणींत मिळून सुमारें ५,००० मजूर काम करतात; त्यापैकी १,५०० ते २,००० मजूर "गोगटे माइन्स"मध्यें नोकरीला आहेत. १९५८ मध्यें कामाला सुरुवात झाली, त्या वेळीं बाहेरचे मजूर व स्थानिक मजूर यांचें प्रमाण ७५ : २५ असें होतें. पण रत्नागिरींतील कामगारांच्या नवीन कामें शिकण्याच्या ईर्षेमुळें तेंच प्रमाण सध्यां २५ : ७५ असें आहे. खाणींतून कच्चें लोखंड काढणें, त्याची प्रतवारी लावणें, इत्यादि सर्वच कामें खाणमालकांच्या देखरेखीखाली व त्यांच्याच संपूर्ण सूचनेसार केलीं जातात. या सर्वच कार्यांचें यांत्रिकीकरण अद्यापि झालेलें नाहीं. कारण तितक्या प्रगत अवस्थेप्रत आजहि हा उद्योग पोहोंचलेला नाहीं हें एक व हा उद्योग खाजगी मालकीचाच राहील याविषयीं शाश्वति नाहीं हें दुसरें.

खाणीच्या कामाचा म्हणजेच निर्यातीचा हंगाम साधारणपणें ऑक्टोबर ते एप्रिलपर्यंत असतो; पावसाळ्यांत सहाजिकच पावसामुळें काम मंदावतें. त्या दरम्यानसुद्धां २५ टक्के कामगार कामावर असतात. खाणींत सांपडलेल्या लोखंडाची प्रतवारी करण्याचे कामीं स्त्री-कामगारांच्या कौशल्याचा प्रामुख्यानें उपयोग होतो. उपरिनिर्दिष्ट कारखान्यांत सुमारें ४५० महिला हें काम करतात. उत्खननाबाबतचें कोणतेंहि काम त्यांना देण्यांत येत नाहीं. यंदाचे वर्षी (१९६१-६२) १,५०,००० टन कच्चें लोखंड निर्यात करण्याचा निर्धार गोगटे माइन्सनीं केला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील एका उपेक्षित भागाचा कायापालट करून श्री. गोगटे ह्यांनीं विदेशी चलन भारताला मिळवून देण्याचेंहि महत्त्वाचें कार्य चालविलें आहे. त्यांची महत्त्वाकांक्षा त्यांना येथें विसावूं देणारच नाहीं; आपल्या मालाचें संस्करण आपण स्वत:च करावें; निर्यात होणारा माल स्वत:च्या आगबोटींतून पोचवावा, परदेशी मालवाहतुकींत आपण भाग घेऊन आपल्या व्यवसायाचें क्षेत्र वाढवावें, अशी त्यांची कल्पना आहे. श्री. गोगटे ह्यांनीं जी गोष्ट करून दाखविली आहे, तीवरून त्यांना हें मुळींच अशक्य नाहीं अशी खात्री वाटते. सततोद्योग आणि मनुष्यसंग्रह, हें त्यांच्या यशाचें गमक सांगतां येईल; 'मधुकर' हें आपलें नांव त्यांनीं सार्थ करून दाखविलें आहे.

सौ. उषाताई आपल्या पतीला देत असलेली साथहि असाधारण आहे. श्री. गोगटे ह्यांना वरचेवर, दीर्घ काळ, बाहेर जावें लागतें, त्यावेळीं सौ. उषाताईंचेकडेच सर्व आर्थिक सूत्रें असतात. नुकत्याच त्या जपानचा प्रवास करून परत आल्या. महाराष्ट्रीय तरुणांत श्री. मधुकर गोगटे हे अद्वितीय ठरतील, त्याला सौ. उषाताईहि साजेशा असून पतीच्या आर्थिक व औद्योगिक संसाराची गृहिणी म्हणूनहि त्यांचें कर्तृत्व उल्लेखनीय आहे.

★ शेतकऱ्यांनो !
★ तुमच्यासाठीं—
★ तुमच्या कुटुंबासाठीं—
★ तुमच्या देशासाठीं—
— आणि —

त्याचबरोबर तुमची शेती सुधारण्यासाठीं व शेती मालाचें उत्पादन वाढविण्यासाठीं—
आपल्याजवळील रोख पैसा,

# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

मध्येंच ठेवा आणि निश्चित रहा !

आपल्या २६ शाखांच्या प्रपंचानें जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केंद्रस्थान बनलेली आणे लोकादरास व विश्वासास पात्र ठरलेली.

तारीख ३०-६-१९६१ आकडे लाखोंचे

| | | |
|---|---|---|
| ★ भाग भांडवल | रु. | ७० |
| ★ रिझर्व्ह फंड व इतर निधि | रु. | ३ |
| ★ ठेवी | रु. | २,९८ |
| ★ दिलेलीं कर्जें | रु. | ६,९२ |
| ★ खेळतें भांडवल | रु. | ८,५० |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. — चौकशी करा !

या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या उपयोगासाठीं दिला जातो.

वृ. अ. घारप, बी. कॉम. मॅनेजर. मा. कुं. फिरोदिया, बी. ए., चेअरमन.

४८ वर्षांवर चालत आलेली कोल्हापुरांतील पहिली आद्य सहकारी संस्था

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

[ स्थापना १९१३ इ. ]

र. नं. १८,३२२. फोन नं ५०२

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १,१७,१४४ |
| इतर फंडस् | रु. | ६१,६२८ |

सभासद संख्या ४,१७८

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्विकारल्या जातात. रिकरिंग डिपॉझिट खातें व दैनिक भिशीचे व्यवहार सुरू आहेत. सोनें-चांदीचे जिनसांचे, व्यापारी मालाचे व मुदत बंद ठेवींचे तारणावर 'ब' वर्ग सभासदांनाहि कर्जें देण्याची सोय केली आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ए. ए. बोगार, मॅनेजर. | बाबुराव गोविंदराव राऊत, प्रेसिडेंट.

दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

महाराष्ट्र राज्यांत अग्रेसर असलेली नागरी बँक

# नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

अहमदनगर

मुख्य कार्यालयः—अहमदनगर.

— शाखा —

संगमनेर श्रीरामपूर
वांबोरी श्रीगोंदा
शेवगांव

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,४३,६४० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३,६७,३९५ |
| इतर फंड | रु. | ३,३६,८५९ |
| ठेवी | रु. | ७६,३०,३१६ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,०१,१३३ |

मुख्य कार्यालयांत व श्रीरामपूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. नित्योपयोगी वस्तु खरेदी करणेसाठीं कर्जे देणेची योजना. बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

स्पेशल सेव्हिंग्ज व सुवर्ण महोत्सव ठेव रोख्यांत बचतीची आकर्षक योजना.

पां. का. मुळे, मॅनेजर. त्र्यं. वि. निसळ, जनरल मॅनेजर. श्री. वि. निसळ, चेअरमन.

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर.

★ ३१ वर्षांपासून चालत आलेली सोलापुरांतील ★ एकमेव नागरी सहकारी बँक

# दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

स्थापना : ६-६-१९११

फोन नंबर ३१७] [रजि. नं. ६४६४

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ६१,३८० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. | ४४,६१६ |
| ठेवी | रु. | ३,११,१५९ |
| खेळतें भांडवल | रु. | ४,६६,६५८ |

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात, सोने चांदीचे जिनसांचे, व्यापारी मालाचे व मुदत ठेव व गव्हर्मेंट सिक्युरिटीजचे तारणावर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

(१) श्री. ग. रा खडकीकर, प्रेसिडेंट. (२) श्री. मा. ह. कोंतम, ऑ. मॅ. डायरेक्टर. (३) श्री. वा. गु. बागेवाडीकर, (४) श्री. कृ. गो. जानकर, (५) श्री. ना. वि. दुदगीकर, (६) श्री. म. मा. मालकीकर, (७) श्री. म. रा. वाळी, (८) श्री. डॉ. सं. मु. कल्याणी. (९) श्री. ति. वा. मोटा.

के. एल. सिद्धम
मॅनेजर

# सहकारी संस्थांच्या नोकरांची समस्या

## · निर्भीडपणाला संरक्षण हवें !

"रामशास्त्री प्रभुणे" फार क्वचित् आढळून येतात व म्हणून त्यांचेबद्दल समाजांत विशेष आदर असतो हें उघड आहे. असे निस्पृह लोक ज्या समाजांत अधिक प्रमाणांत आढळून येतात तो समाज नैतिक दृष्टीनें उच्च पातळीवरील आहे हें कोणीहि मान्य करील. आपल्या समाजांत निस्पृह लोक कमी आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि अंगीं असलेला निस्पृहपणा दैनंदिन व्यवहारांत प्रत्यक्ष अमलांत आणणाऱ्या व्यक्ति मात्र अपवादात्मक दिसून येतात, हें खरें आहे. आपला समाज नैतिक दृष्टीनें उच्च पातळीवर जावा, यासाठीं हा निस्पृहपणा सर्वसामान्यपणें अमलांत कां येऊं शकत नाहीं, याचा विचार करण्याची आतां वेळ आली आहे असें आम्हांस वाटतें.

पंजाबमधील एका ग्रामपंचायतीच्या स्त्री सरपंचानें न्याय देतांना विशेष मनोधैर्य दाखविलें व त्यासाठीं तिचा गौरव करण्यांत आला, असें नुकतेंच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आलें होतें, हें वाचकांना माहीत असेलच. त्या स्त्री सरपंचापुढें गुन्हेगार म्हणून दाखल करण्यांत आलेला इसम हा तिचा सासराच होता. त्यानें आपल्या सुनेवर स्वतः व आपल्या मुलामार्फत वजन आणण्याचा खूप प्रयत्न केला, तरी देखील त्या महिलेनें आपलें मन विचलित होऊं दिलें नाहीं व तिच्यापुढें दाखल झालेल्या पुराव्यावरून तिनें आपला सासरा गुन्हेगार आहे असें जाहीर करून त्यास योग्य तें शासन दिलें. हें उदाहरण इतर सरपंचांनीं अमलांत आणल्यास ग्रामपंचायतीबद्दलचा आदर आपल्या समाजांत अधिक प्रमाणांत वाढेल यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांतील विशेषतः ग्रामीण भागांत ग्रामपंचायती व सहकारी संस्था स्थापन करून त्यांचेकरवी सामाजिक व आर्थिक विकास करण्याचें आपण आतां ठरविलें आहे. सबब या दोन्ही संस्था ज्या प्रमाणांत कार्यक्षम ठरतील त्या प्रमाणांत आपला विकास होत राहील हें उघड आहे. प्रस्तुत लेखकाचा संबंध सहकारी संस्थांशीं गेलीं तीस—चाळीस वर्षें आलेला असल्यानें त्यानें तूर्त सहकारी संस्थांसंबंधींच या लेखांत आपले विचार मांडण्याचें ठरविलें आहे.

हिंदुस्थानांत सहकारी चळवळ सुरू होऊन सुमारें साठ वर्षे होत आलीं आहेत. आरंभींच्या काळांत आपला देश परकीयांच्या ताब्यांत असल्यानें या चळवळीचा उपयोग त्या वेळेचें सरकार आपली जबाबदारी कमी व्हावी एवढ्याच हेतूनें मर्यादित स्वरूपांत करून घेत असे असें दिसतें. परंतु या चळवळीनें एकदा मूळ धरल्यानंतर तिचा विस्तार समाजाच्या स्वावलंबामुळें हळूहळू होत राहिला. आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर मात्र या चळवळीकडे पाहण्याचा आपल्या सरकारचा दृष्टिकोण फारच बदलला. नागरी व ग्रामीण जनतेचे अधिकाधिक व्यवहार सहकारी पद्धतीनें होत राहावेत म्हणून या चळवळीस सरकारची हरएक प्रकारें वाढत्या प्रमाणांत मदत मिळूं लागली व वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनीं या चळवळीस सक्रिय पाठिंबा दिला व ते स्वतःहि या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेऊं लागले. यामुळें या चळवळीची फार मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. शेतकऱ्यांना अल्प प्रमाणांत भांडवलाचा पुरवठा करणें एवढेंच मर्यादित कार्यक्षेत्र या चळवळीचें पूर्वीप्रमाणें राहिलें नसून वेगवेगळ्या क्षेत्रांत तिनें आतां पदार्पण केलें आहे. शेतीमालाचें उत्पादन वाढविणें व त्या मालाची विक्री उत्पादकास फायदेशीर होईल या दृष्टीनें करणें, शेतीसाठीं लागणारीं साधनें शेतकऱ्यास शक्य तितक्या कमी खर्चांत मिळवून देणें, हीं कामें करणाऱ्या वेगवेगळ्या सहकारी संस्था वेगवेगळ्या ठिकाणीं स्थापन झालेल्या आहेत व त्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत स्थापन होत आहेत असें दिसून येत आहे. एवढेंच नव्हे, तर औद्योगिक क्षेत्रांतहि सहकारानें आतां प्रवेश केला असून लहान-मोठे कारखाने सहकारी संस्था हळूहळू चालवूं लागल्या आहेत हेंहि दिसून येतें. महाराष्ट्रांतील सहकारी कारखाने आणि सहकारी सूत व कापड गिरण्या आपली कामगिरी योग्य प्रकारें पार पाडीत आहेत. यावरून सहकारी चळवळ औद्योगिक क्षेत्रांतहि आपला प्रभाव पाडूं शकेल अशी सबळ आशा निर्माण झाली आहे.

सहकारी संस्था या लोकशाही पद्धतीनें चालणाऱ्या स्वयंशासित संस्था असल्यामुळें त्यांच्या दैनंदिन कारभारांत सरकारचा अगर कोणाचाहि हस्तक्षेप होता कामा नये अशी सार्वत्रिक अपेक्षा असते व ती बरोबरहि आहे. तथापि ज्याअर्थी या संस्थांचा कारभार समाजाच्या आर्थिक जीवनाशीं निगडित झालेला असतो त्याअर्थी तो सचोटीनें, निःस्वार्थपणें, निर्भीडपणें व निःस्पृहपणें चालला नाहीं अगर चालविला गेला नाहीं तर या संस्था समाजास उपकारक न ठरतां त्या अपायकारकच ठरतील अशी भीति वाटते.

सहकारी संस्थांच्या कारभाराचा गाडा दोन चाकांवर चालतो असे दिसतें. त्यापैकी एक म्हणजे तिचें संचालक मंडळ व दुसरें म्हणजे तिचा नोकरवर्ग. संचालक मंडळ सभासदांनीं निवडलेलें असतें व ही निवडणूक दरसाल अगर कांहीं कालखंडानें होत असते. जरी संचालक मंडळाच्या कारभारावर टीका करण्याचा अगर मत प्रदर्शित करण्याचा अधिकार सभासदांना असतो तरी हा अधिकार फारसा प्रभावी ठरूं शकत नाहीं असाच नेहमीचा अनुभव आहे. संचालक मंडळाकडून कारभार चालवितांना कांहीं चुका झाल्या अगर त्या मंडळानें किंवा त्या मंडळांतील कांहीं घटकांनीं चुका केल्या व त्या कांहीं सभासदांच्या नजरेस आल्या तरीहि त्याबद्दल त्या मंडळाला अगर त्या घटकाला शासन मिळाल्याचीं उदाहरणें शोधूनच काढावीं लागतील, इतकीं तीं अल्प आहेत. शासन न मिळणें हाच सर्वसामान्य नियम आहे असें म्हणणें भाग आहे. आपल्या राज्यांतील कांहीं संस्थांचा कारभार भोंगळपणें बरेच दिवस चालत आलेला आहे असें त्या संस्थांसंबंधीं उघडपणें वर्तमानपत्रांतुन वेळोवेळीं येणाऱ्या टीकेवरून कबूल करणें भाग आहे. अशा भोंगळ संस्थांची संख्या विशेष नसली तरी त्यांच्या गैरकारभाराचें विष अन्यत्र पसरण्याचा अधिक संभव असतो. संस्थांचा कारभार चालवितांना आपला स्वार्थ साधून घ्यावा अशी दुर्बुद्धि निर्माण होणें हें हल्लींच्या मानवस्वभावास धरूनच होईल. असा गैरकारभार केला तरीहि त्याबद्दल तात्कालिक कांहींहि शासन होत नाहीं हें समाजांतील स्वार्थी लोकांना एकदा दिसून आलें म्हणजे ते लोक युक्तायुक्त मार्गाचा अवलंब करून वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांत प्रवेश करून घेण्याचा फार मोठा संभव असतो. सबब, सहकारी संस्था या लोकशाही पद्धतीनें चालणाऱ्या स्वयंशासित संस्था असल्या तरी त्यांच्या कारभारांत

शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्रराय यांनी सर्टिफिकेट दिलेलें
## रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीचें
# चमन

## चिमूटभर तोंडांत टाकतांच मुख सुगंधमय होतें.

बाटली किंमत १ रुपया
(टपाल-खर्च वेगळा)

—: स्टॉकिस्टस् :—

(१) जयंत आणि कंपनी, लक्ष्मी रोड, पूना.
( ) विठ्ठलदास करसनदास, ५७७ काळबादेवी रोड, मुंबई २
(३) विठ्ठलदास डाह्याभाई, बेगमहंमद बिल्डींग, काळबादेवी रोड, मुंबई २.
(४) सुलेमान हाजी हाशम सुपारीवाला, १९० अस्कीन रोड, मुंबई २.

## स्टार कंपनी, बेळगांव

# श्री पंचगंगा
## सहकारी कारखाना लि.,
गंगानगर—इचलकरंजी.

फोन नं.५] जिल्हा कोल्हापूर. [तारेचा पत्ता-गंगासाकर

पंचगंगेच्या खोऱ्यांतील हजारो शेतकऱ्यांच्या मनीषा पुरी करणाऱ्या या कारखान्यानें १९६०-६१ च्या हंगामांत दीड लाख टन ऊंस गाळून शुभ्र व दाणेदार अशी १,८४,००० पोतीं साखर तयार केली आहे.

चालू वर्षी सभासदांना ६ टक्के डिव्हिडंड दिला असून अपेक्षेप्रमाणें साखरेचें जादा उत्पादन होऊन नियमाप्रमाणें सुमारें दहा लाख रुपये एक्साइज रिबेट मिळालें आहे.

सहकारी क्षेत्रांत एक नवीन प्रयत्न करण्याच्या उद्देशानें सहकारी तत्त्वावर एक अल्कोहोल प्लँट व सुपरफॉस्फेट कारखाना काढण्याचे कामीं या कारखान्यानें पुढाकार घेतला आहे.

**आमच्या सर्व शेतकरी सभासदांना व सहकारी कार्यकर्त्यांना यंदाची दिवाळी सुखाची, समृद्धीची व भरभराटीची जावो.**

मु. वि. सुलतानपुरे — व्हाइस चेअरमन.
रत्नापा कुंभार — चेअरमन.

# वार्शी सेंट्रल अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी
[स्थापना १९०६]

| हेडऑफिस | शाखा |
|---|---|
| बार्शी | वैराग, ता. बार्शी |

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. १,२९,०९० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १,८९,२२० |
| ठेवी | रु. २०,४१,५८३ |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. ४,७५,९४३ |
| खेळतें भांडवल | रु. २४,७४,९०० |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात

ही दीपावलि बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो.

व. ह. उटगीकर — मॅनेजर
रा. गो. टिळक, अॅडव्होकेट — चेअरमन

# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

स्थापना :— ३०-३-१९४९ [फोन नं. ६०२
मुख्य कचेरी :— ५२, साखरपेठ, सोलापूर.
शाखा :— पंढरपूर.
चेअरमन :— श्री. आर. व्ही. वेत, बी. ए., एलएल्. बी.

**या बँकेत गुंतविलेला पैसा जिल्ह्यांतील सर्व औद्योगिक सहकारी सोसायट्यांना व उद्योगधंदे करणाऱ्यांना दिला जातो.**

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ४,५९,२५० |
| राखीव व इतर निधि | रु. १,७३,०४३ |
| ठेवी | रु. १०,८७,००० |
| खेळतें भांडवल | रु. २९,०४,५२७ |

**महाराष्ट्र राज्यांतील एकमेव औद्योगिक सहकारी मध्यवर्ती बँक**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.

सभासदांना हातमागाच्या तयार मालावर कर्जे दिलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

आर. के. एम्. देसाई, G. D. C. & A.
मॅनेजर.

हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारास असला पाहिजे, असेंच आमचें मत आहे, एवढेंच नव्हे तर एखाद्या संचालक मंडळांतील एक वा अनेक घटक अयोग्य प्रकारें काम करीत आहेत असें दिसून येतांच त्यांना योग्य तें शासन सरकारनें निष्ठुरपणें तात्काळ केलें पाहिजे असेंहि आमचें मत आहे. असें झालें तरच या चळवळीचा बोज समाजांत राहील.

सहकारी संस्थांचा कारभार चालविणाऱ्या गाड्याचें दुसरें चाक म्हणजे तिचा नोकरवर्ग. हा नोकरवर्गच संस्थेचा दैनंदिन कारभार चालवीत असल्यानें या नोकरांच्या कार्यक्षमतेवर संस्थेची कार्यक्षमता बहुतांशीं अवलंबून असते. संचालकाप्रमाणेंच सर्व नोकराहि सचोटीनें व निःस्वार्थपणें काम करणारे असले पाहिजेत. या नोकरांपैकीं वरिष्ठ नोकरांवर संस्थेच्या कारभाराबाबतची अधिक जबाबदारी असते. या वरिष्ठ नोकरांना आपलें काम संचालक मंडळाच्या हुकुमानुसार करावें लागतें; आणि हे हुकूम संचालक मंडळ आपल्या समजदारीप्रमाणें, परंतु आपणांस असलेल्या अधिकाराच्या मर्यादेंत राहून, देत असते. मात्र वेगवेगळ्या विषयासंबंधीं वरिष्ठ नोकरांनी दिलेले अभिप्राय लक्षांत घेऊनच मंडळ आपले हुकूम देत असतें. नोकरांनीं दिलेले अभिप्राय मंडळावर बंधनकारक नसले तरीदेखील त्यांचा योग्य तो विचार मंडळानें केला पाहिजे अशी अपेक्षा असते. सबब वरिष्ठ नोकरवर्ग हा संचालक मंडळाचा मार्गदर्शक होय असें म्हटल्यास तें वस्तुस्थितीस सोडून होईल असें आम्हांस वाटत नाहीं. वरिष्ठ नोकरावर असलेली ही जबाबदारी त्यास योग्य प्रकारें पार पाडावयाची असेल तर त्याला आपला अभिप्राय नमूद करतांना पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे; व त्यानें आपला अभिप्राय देतांना तो आपल्या सदसद्विवेकबुद्धीस स्मरून, निर्भीडपणें व निःस्पृहपणें दिला पाहिजे; तरच त्याचेकडून संचालक मंडळाचें मार्गदर्शन योग्य प्रकारें होऊं शकेल.

सहकारी संस्था ह्या स्वयंशासित संस्था असल्यानें हल्लीं बहुतेक सर्व संस्थांना आपला वरिष्ठ व इतर नोकरवर्ग आपल्या मर्जीप्रमाणें नेमण्याचा व त्यास योग्य वाटेल तें वेतन देण्याचा पूर्ण अधिकार आहे. तसेंच नोकरांना नोकरींतून कमी करण्याचाहि अधिकार आहे. त्यामुळें नोकरांना संचालक मंडळांतील बहुसंख्य घटकांची मर्जी संभाळूनच आपलें काम करावें लागतें. या नोकरांना व विशेषतः वरिष्ठ नोकरांना आपलें काम करीत असतांना तारेवरची कसरतच नेहमी करावी लागते. नोकर नोकरीवर राहणें अगर न राहणें हें केवळ संचालक मंडळाच्या मर्जीवर अगर लहरीवर अवलंबून असल्यानें या नोकरांना आपल्या नोकरीबद्दल शाश्वतता फार कमी वाटते. विशेषतः ज्या नोकरांचा प्रत्यक्ष संबंध संचालक मंडळाशीं वरचेवर येतो अशा वरिष्ठ नोकरांना तर ही भीति जास्त वाटते. कारण, आपले अभिप्राय संचालकांपैकीं कांहींना रुचले नाहींत तर ते केव्हां नाराज होतील याचा नेम नाहीं अशी टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर नेहमी लोंबत असते; व म्हणून तो आपले अभिप्राय संचालकांना रुचतील असेच नेहमी देत असतो. ते अभिप्राय त्याच्या सदसद्विवेकबुद्धीस पटले नाहींत तरीहि भिडेखातर व आपली नोकरी जाऊं नये म्हणून त्याला ते नमूद करणें भाग पडतें. अशी आजची वस्तुस्थिति आहे. कांहीं संचालकांना आमचे हे विचार मानवणार नसले तरीहि ते या समयीं निर्भीडपणें वाचकांपुढें मांडणें हें आमचें कर्तव्य आहे असें आम्ही समजतों. सांप्रतचा लेखक हा अनेक सहकारी संस्थांचा संचालक होता व आहेहि आणि तो एका सहकारी संस्थेचा अनेक वर्षें वरिष्ठ नोकराहि होता व म्हणून त्यानें वर वर्णन केलेली परिस्थिति ही त्याच्या स्वानुभवाची आहे.

सहकारी संस्थांच्या नोकरांना, विशेषतः नागरी सहकारी संस्था व मध्यवर्ती सहकारी संस्था यांच्या नोकरांना, आपल्या नोकरीबद्दलची शाश्वतता वाटण्यासाठी व त्यांना आपले अभिप्राय निर्भीडपणें व निःस्पृहपणें मांडतां यावेत यासाठी काय तजवीज करावी याची पुष्कळच चर्चा सुमारें दोन वर्षांमागें अहमदाबाद येथें भरलेल्या एका परिषदेंत झाली होती. ही चर्चा ज्या समितींत झाली तिचे अध्यक्ष श्री. वैकुंठभाई मेहता हे असल्यानें त्या समितीनें केलेल्या शिफारशी मूलग्राही अशा होत्या. परंतु त्या अद्याप अमलांत आल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. त्या अनेक शिफारशींपैकी एक शिफारस मध्यवर्ती सहकारी बँका व इतर मध्यवर्ती सहकारी संस्था यांच्या वरिष्ठ नोकरांसंबंधीं होती. तेवढी शिफारस जरी आपल्या राज्यांत ताबडतोब अमलांत आणली गेली तरी तिचा उपयोग पुष्कळच होण्यासारखा आहे. आमच्या आठवणीप्रमाणें ती शिफारस अशी होती कीं जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व जिल्हा खरेदी विक्री संघ यांच्या वरिष्ठ नोकरांची महाराष्ट्र राज्यासाठी एक यादी ( 'केडर' ) तयार केली जावी व त्या यादीमधूनच हे नोकर नेमले जावेत; त्यांच्या वेळोवेळीं बदल्या केल्या जाव्यात. अशा रीतीनें नेमल्या जाणाऱ्या नोकरांचा पगार ज्या त्या संस्थेनें योग्य प्रकारें वेळचेवेळीं दिला पाहिजे असें त्या संस्थेवर कायदेशीर बंधन निर्माण केलें जावें. या यादींत नवीन इसमांची जरूरीप्रमाणें नांवें दाखल करणें व नालायक इसमाचें नांव यादींतून काढून टाकणें, नोकरांच्या वेळोवेळीं बदल्या करणें, वगैरे बाबतचे अधिकार एखाद्या समितीकडे कायदेशीर रीतीनें सोपविले जावेत. म्हणजे मग ही योजना कार्यवाहींत आणणें सोयीचें होईल. ही शिफारस अंमलांत आणली गेल्यास या वरिष्ठ नोकरांना आपलें काम निर्भीडपणें पार पाडतां येईल व त्यामुळें या मध्यवर्ती संस्थांचा कारभार अधिक कार्यक्षम होऊं शकेल असें आम्हांस वाटतें. आम्हीं केलेली ही सूचना लोकशाही तत्त्वाविरुद्ध आहे असा आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे. तथापि महापालिकांचे वरिष्ठ नोकर, सहकारी साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक, ग्रामपंचायतीचे चिटणीस, वगैरेंची नेमणूक कशी होते तें पाहिलें म्हणजे आमची सूचना विचारांत न घेण्यासारखी आहे असें आम्हांस तरी वाटत नाहीं. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे हल्लीचे कार्यकारी संचालक हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कायमचे नोकर आहेत, हें वाचकांना माहीत असेलच.

—"दत्तशर्मा"

सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

हीरकोत्सवानिमित्त अद्यावत् पद्धतीचें
भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी
सोईस्कर ठिकाण.




टेलिफोन नं. ३१८

"कल्याण" स्प्रे पंप्स्

व

डिझेल इंजिनचे स्पेअर पार्टस्

यांसाठी भेटा अगर लिहा.

उत्पादक :— मे. गद्रे बंधू,

पो. माधवनगर, जि. सांगली.

( महाराष्ट्र राज्य )

कुटुंबाचें आरोग्य व सुखशांतीकरितां

' नैसर्गिक ' जीवनसत्त्वें असलेलें

**शुद्ध व साजूक तूप**

अवश्य वापरा.

म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.

( फोन नं. ६४३० )

**रेखा फर्निशर्स**

३२४, सदाशिव, पुणें.

( टेलिफोन नं ६५१३ )

उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध;
घरांची व दुकानांची शोभा वाढविणें
हें आमचें वैशिष्ट्य आहे.

**जनता सहकारी बँक लिमिटेड**

[ हेड ऑफिस – पुणें शहर ]

शाखा :—भवानी पेठ व शिवाजीनगर, पुणें.

: संचालक मंडळ :

श्री. म. रा. मिठापेली अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. गो. प्र. भागवत ( चेअरमन ) | श्री. बा. गो. ठकार ( व्हा. चेअरमन ) |
| श्री. ना. र. ओक | डॉ. वा. ग. परांजपे |
| श्री. मु. रा. किराड | श्री. दि. य. पाटणकर |
| श्री. पं. ग. बनवारी | श्री. स. ज. राऊत |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

द. शं. जमदग्नि
मॅनेजिंग डायरेक्टर

दीपावली व नूतन वर्ष बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचें जावो.

दूरध्वनि क्रमांक—१०३ तार—छत्रपति, राहुरी

श्रीरामपूर

**दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.**

श्रीशिवाजीनगर.

स्थापना – १९५४ ] [ सभासद संख्या – १५२३

समाजवादी सहकारी भारताच्या उन्नतीसाठी अविरत श्रम करणाऱ्या सर्व नेत्यांना व श्रमजीवी जनतेस आमचे प्रणाम.

कारखान्याचा चतुर्थ ऊंस गळीत हंगाम यशस्वी रीतीनें पार पडला असून पांचवा गळीत हंगाम दि. ४-१०-१९६१ रोजीं सुरू झालेला आहे.

राहुरी सहकारी साखर कारखान्यानें साखर-उत्पादनांत केलेली प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| हंगाम | एकूण गळीत टन | एकूण साखर पोतीं | |
|---|---|---|---|
| १९५७–५८ | १,२५,५९४ | १,६७,०४९ | |
| १९५८–५९ | १,२३,१५८ | १,४६,३५४ | |
| १९५९–६० | १,५६,१७१ | १,८६,५६४ | |
| १९६०–६१ | १,९७,०५७ | २,२६,२९५ | पावणेतीन मण भरतीची |
| १९६१–६२ | १८,९८६ | १८,१९० | |

दि. २९–१०–६१ पर्यंत

राहुरीच्या शुभ्र व दाणेदार साखरेस सर्वत्र चांगली मागणी आहे. आपण आपली मागणी केव्हांहि नोंदूं शकता.

पां. वा. पवार
मॅनेजिंग डायरेक्टरकरितां.

बी. बा. तनपुरे
चेअरमन.

# नफ्याची कमाई, हाच उद्योगधंद्यांचा पाया

श्रीमान् शेठ लालचंद यांनी दिनांक १-१०-१९६१ रोजीं सातारा-रोड येथें युनायटेड वेस्टर्न बँकेच्या २२ व्या शाखेचें उद्घाटन केलें. त्या वेळीं नफ्याच्या आवश्यकतेचें महत्त्व वर्णन करतांना ते म्हणाले, कीं अल्पशा भांडवलावर सुरुवात करून आज आपण ह्या बँकेमध्यें जवळजवळ तीन कोटी रुपयांचें अथवा त्यापेक्षा थोडेंसें अधिकच खेळतें भांडवल जमा केलेलें आहे, ही अत्यंत भूषणावह गोष्ट आहे. सातान्यासारख्या शहरांत एवढें मोठें भांडवल जमा करणें ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. कारण भांडवल जमण्यासाठी जी कांहीं परिस्थिति असावयास पाहिजे अशा तऱ्हेची परिस्थिति सातान्यामध्यें नाहीं. तथापि, आपण संपादन केलेला विश्वास हाच या बँकेच्या आतांपर्यंतच्या उत्कर्षाचें कारण आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

आपल्या देशाच्या आजच्या परिस्थितींत औद्योगीकरणाची अत्यंत मोठी जरूरी आहे हें मी सांगावयाला पाहिजे असें नाहीं. कोणत्याहि राष्ट्राची भरभराट होणें इष्ट असेल तर त्याच्या पाठीमागें त्या देशामध्यें आर्थिक विकास किती झालेला आहे याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे आणि हा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी देशामध्यें व्यापार आणि उद्योगधंदा यांची वृद्धि होणें हें अत्यंत महत्त्वाचें असतें. या दृष्टीनें आपल्या देशामध्यें अत्यंत अल्प कार्य होऊन राहिलेलें आहे. सरकारला सुद्धां याची जाणीव असल्यामुळें औद्योगिक क्षेत्रांत जे लोक पाऊल टाकावयाला इच्छितात त्यांना मदत देण्यासाठी म्हणून सरकारची तयारी आहे. आणि त्याच दृष्टीनें आर्थिक क्षेत्रामध्यें प्रामुख्यानें काम करणाऱ्या छोट्याशा बँकांचें का होईना पण सहकार्य जर औद्योगिक क्षेत्रामध्यें मिळालें तर देशाचा आर्थिक विकास वाढावयाला पुष्कळ मदत झाल्याखेरीज राहणार नाहीं. या कार्यामध्यें कोणी खाजगी रीतीनें प्रगति घडवून आणील, को-ऑपरेटिव्ह मार्गानें प्रगति घडवून आणील; हे निरनिराळे मार्ग आहेत. हेतु शेवटीं एकच कीं, आपला विकास आणि आपल्या विकासाबरोबर आपल्या समाजाचा आणि देशाचा विकास घडून आणायचा. अशा तऱ्हेचा विकास घडवून आणण्यांत भरपूर नफा हें महत्त्वाचें अंग असतें.

आपल्या बँकेच्या प्रगतीचा इतिहास सांगतांना आपण सांगितलेंत कीं या २५ वर्षांच्या अवधीमध्यें बँकेनें प्रगति करीत असतांना चांगल्या तऱ्हेचा नफा मिळविला. नफा कमविण्याची संचालक मंडळानें दृष्टि ठेविली हें अत्यंत उत्कृष्ट झालें. कारण कोणताहि उद्योगधंदा, त्यांत जर नफा आपण कमविला नाहीं तर तो कांहीं फार काळ टिकूं शकणार नाहीं. मग ती बँक असो किंवा तो कारखाना असो किंवा सरकारनें चालविलेला कोणताहि उद्योगधंदा असो, त्या ठिकाणीं नफा कीं ज्याचा अर्थ त्या उद्योगधंद्यामध्यें कांहीं भांडवल गुंतलेलें आहे. त्या भांडवलावर किंवा त्या उद्योगधंद्यामध्यें जी कार्यकर्ती मंडळी आहेत त्यांच्या कार्याचा हा मोबदला आहे.

एक काळ असा होता कीं, उद्योगधंद्यामध्यें नफा कमविणें हें गैर समजलें जात असे. पण जसजशी जबाबदारीची जाणीव व्हावयाला लागली तेव्हां दिसून आलें कीं उद्योगधंद्यामधून नफा करणें हें गर्ह्य तर नाहींच पण ही सामाजिक उत्कर्षाची बाब आहे. या दृष्टीनें आतां ज्या पब्लिक सेक्टरमध्यें नफा करणें गर्ह्य समजलें जात होतें, त्या पब्लिक सेक्टरमध्यें म्हणजे सरकारी कारखान्यामध्यें अतिशय मोठ्या प्रमाणांत नफा करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली आहे.

कालच अशा तऱ्हेचा सरकारनें चालविलेला एक कारखाना पाहण्याचा योग मला मिळाला. पेनिसिलीनचा कारखाना, पुण्याजवळ ५-६ मैलांवर हा कारखाना सरकारनें चालू केलेला आहे. आपण जाणता आहांत कीं पेनिसिलीन म्हणजे किती, केव्हां केव्हां आयुष्यांत महत्त्वाची गोष्ट समजली जाते. हें औषध आजारी माणसाला जर दिलें तर त्याला संजीवनी दिल्यासारखें समजलें जातें. हें औषध करण्यासाठी जवळजवळ १५-२० वर्षांपूर्वी मी एक स्कीम आणली होती. आणि त्या वेळेला नुकतेंच राष्ट्रीय सरकार ( काँग्रेस सरकार ) मुंबईमध्यें निर्माण झालेलें होतें. आणि त्या वेळेला मी मुख्य प्रधानांना सांगितलें कीं, अशा तऱ्हेची मी स्कीम आणलेली आहे. त्या वेळीं त्यांनीं सांगितलें "लालचंद, औषधें तयार करणें हें खाजगी उद्योगधंद्यांना देणें आम्हीं कांहीं योग्य समजत नाहीं. कारण त्यांची वृत्ति हीं नफा कमविण्याकडे असते." म्हटलें, "ठीक आहे, मर्जी तुमची."

त्यानंतर कांहीं वर्षांनीं सरकारनें हा कारखाना निर्माण केला आणि आज कारखान्याचें उत्पादन अशा रीतीनें चाललेलें आहे, कीं जर एक रुपयाचें औषध केलें तर त्यापाठीमागें एक रुपया नफा कमविण्याची त्यांची तयारी आहे. म्हणजे उद्योगधंदा जो निर्माण करावयाचा त्या उद्योगधंद्यामधून जें लागतें त्या भांडवलाची निर्मिति स्वतःच पुन्हां त्याच्यांतून तयार करावयाची ही त्याच्या-पाठीमागें नफा कमाविण्याची मुख्य भूमिका आहे. आपण आतांच सांगितलें कीं आपण भांडवलदारांना नऊ टक्के नफा दिल्यानंतर, जी कांहीं नफ्याची रक्कम राहते आहे ती पुन्हा आपण रिझर्व्ह किंवा अन्य मार्गांनें बँकेमध्यें ठेवतां आणि अशा तऱ्हेने ती ठेवलेली रक्कम पुन्हा बँकेला भांडवल म्हणून उपयोगी होते आणि तिचें कार्य करणें त्याला साहाय्यक होतें, आणि म्हणून अशा तऱ्हेनें केलेला हा नफा हा आपल्या बँकेला आणि उद्योगधंद्यांना अत्यंत पूरक आणि उपयोगी असा होतो ही अत्यंत महत्त्वाची ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. रुपयाला रुपया कमविणें हें कदाचित् तितकें योग्य किंवा समाजाला इष्ट असें धोरण असेल किंवा नसेल. पण वाजवी नफा कमविणें हें मात्र उद्योगधंद्यांना अत्यंत महत्त्वाच्या दृष्टीने सहकार्य म्हणून समजलें पाहिजे. आणि त्या दृष्टीनें प्रयत्न केले पाहिजेत. नाहींतर आम्हांला कांहीं नफा करायचा नाहीं या दृष्टीनें आपण जर कार्य करायला लागलों तर तो उद्योगधंदा योग्य त्या तऱ्हेनें वाढणार नाहीं आणि त्या संचालक मंडळींची वाजवीपेक्षा फाजील खर्च करण्याकडे प्रवृत्ति होईल आणि त्यांचा त्या दृष्टीनें तो धंदा योग्य रीतीनें चालला असें कोणीहि म्हणणार नाहीं.

मीं आपल्याला जें उदाहरण दिलें त्याचा हेतु एवढाच कीं, ही जी एक कांहीं काळ भावना निर्माण करण्याचा प्रयत्न कांहीं मंडळींनीं केलेला होता तो चुकीचा होता. व्यापार किंवा उद्योग अथवा अन्य व्यवसाय यांमधून आपण जें कार्य करीत आहोंत त्या कार्याचा योग्य तो मोबदला मिळून त्यांतून कांहींतरी आपण बाजूला ठेवणें हें आपलें कार्य आहे. आणि हें बाजूला ठेवलेलें जें कांहीं आहे तो आपला नफा आहे म्हणा, अथवा आपण सांठविलेलें संचित द्रव्य आहे; हें अत्यंत आवश्यक आहे, आणि या दृष्टीनें आपली बँक स्वतः उद्योगधंद्यांना साहाय्यक बनते आहे असें नव्हे तर त्यांना अशा तऱ्हेचें औद्योगिक कार्य, व्यापारविषयक कार्य करण्याला मदत करते आहे. —लालचंद हिराचंद

# चलनाच्या किंमतीची घसरगुंडी

वेगवेगळ्या देशांतील चलनाची किंमत १९५०–६० ह्या कालखंडांत कशी घसरली, ह्याचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे. वाढत्या महागाईचा निदर्शक इंडेक्स नंबर उलटा केला म्हणजे चलनाच्या किंमतीमधील घसरगुंडीचें प्रमाण मिळतें. त्याप्रमाणें ६१ देशांचा तक्ता येथें असें दर्शवितो, कीं भारताच्या रुपयाची किंमत १९५० च्या मानानें १९५५ मध्यें १०० ची १०६ झाली; म्हणजे ती न घसरतां सुधारली; पण १९६० मध्यें ती ८१ वर घसरली. म्हणजे, १९५०–५५ मध्यें दरसाल सरासरीनें १.१% किंमत वाढत गेली आणि १९५६–६० मध्यें दरसाल सरासरीनें ती ५.१% घसरत गेली. १० वर्षांच्या कालखंडांतील दरसालचा सरासरी घसारा २.१% पडला. अमेरिकन डॉलर दरसाल सरासरीनें २.१% नें घसरत आहे; बेल्जम, जर्मनी आणि कॅनडा ह्या औद्योगिक राष्ट्रांचें चलन सुमारें त्याच गतीनें घसरत आहे. ३३ वर्षांत चलनाची किंमत निम्मीच उरेल, असा त्या गतीचा वेग आहे. दहा देशांचे बाबतींत ह्या दुरवस्थेची वार्षिक सरासरी गति १०% पेक्षा अधिक आहे. पाकिस्तानाच्या रुपयाची किंमत दहा वर्षांत १०० च्या मानानें ७५ वर आली. ह्या तक्त्यावरून, आपल्या रुपयानें आपली मजबुती इतर देशांच्या चलनांच्या मानानें किती राखली आहे, हें दिसून येतें. पण, घसरगुंडीचा वेग वाढत चालला आहे, हें मात्र खरें.

चलनाची किंमत ज्या मानानें घसरते, त्या मानानें लोकांची प्राप्ती वाढली तर महागाई जाणवणार नाहीं. अविकसित, कनिष्ठ राहणीच्या देशांत मुख्य खर्च अन्नावरच होतो, तेथें महागाईचा तडाखा फारच जबर वाटतो. उत्पादनवाढ ही राहणीचें मान वाढवीत नेण्याला कितपत समर्थ आहे, हा खरा प्रश्न आहे.

| | चलनाच्या किंमतीचा इंडेक्स नंबर | | | घसाऱ्याची वार्षिक गति % | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५५ | १९६० | १९५०-५५ | १९५५-६० | १९५०-६० |
| फिलिपाइन्स | १०० | १०४ | ९४ | —०.८ | २.१ | ० ७ |
| सिलोन | १०० | ९६ | ९३ | ०.८ | ०.६ | ०.७ |
| पोर्तुगाल | १०० | १०१ | ९२ | —०.२ | १.९ | ०.९ |
| ग्वाटेमाला | १०० | ९१ | ९१ | १.८ | ०.० | ०.९ |
| स्वित्सरलंड | १०० | ९२ | ८७ | १.६ | १.१ | १.४ |
| इक्वेडॉर | १०० | ८३ | ८४ | ३ ७ | —०.२ | १.८ |
| बेल्जम | १०० | ९० | ८३ | २.१ | १.७ | १.९ |
| जर्मनी | १०० | ९१ | ८२ | १.८ | २.२ | २.१ |
| भारत | १०० | १०६ | ८१ | —१.१ | ५.१ | २.१ |
| लेबेनॉन | १०० | १०३ | ८१ | —० ६ | ४.७ | २.१ |
| अमेरिका | १०० | ९० | ८१ | २.१ | २.१ | २.१ |
| कॅनडा | १०० | ८८ | ८० | २.५ | १.९ | २.२ |
| एल साल्वेडॉर | १०० | ७८ | ७७ | ४.८ | ०.२ | २.५ |
| पाकिस्तान | १०० | ९० | ७५ | २.० | ३.६ | २.८ |
| इटली | १०० | ८२ | ७५ | ३.९ | १.८ | २.९ |
| नेदरलंडस | १०० | ८५ | ७४ | ३.२ | २.६ | २.९ |
| डेन्मार्क | १०० | ८३ | ७१ | ३.७ | ३.० | ३ ३ |
| द. आफ्रिका | १०० | ७९ | ७१ | ४.६ | २.१ | ३.४ |
| आयर्लंड | १०० | ७९ | ६९ | ४.७ | २.५ | ३.६ |
| जपान | १०० | ७४ | ६७ | ५.८ | २.० | ३.९ |
| ग्रेट ब्रिटन | १०० | ७६ | ६७ | ५.२ | २.६ | ३.९ |
| न्यूझीलंड | १०० | ७५ | ६५ | ५.६ | २.७ | ४.२ |
| नॉर्वे | १०० | ७४ | ६४ | ५.८ | २.८ | ४.३ |
| स्वीडन | १०० | ७६ | ६४ | ५.३ | ३.५ | ४ ४ |
| स्पेन | १०० | ८८ | ६१ | २.६ | ७.१ | ४.९ |
| ऑस्ट्रिया | १०० | ६७ | ६० | ७.८ | २.१ | ५.० |
| फिनलंड | १०० | ८० | ५८ | ४ ३ | ६.३ | ५.३ |
| फ्रान्स | १०० | ७६ | ५७ | ५.३ | ५.५ | ५.४ |
| ग्रीस | १०० | ६४ | ५७ | ८ ६ | २.२ | ५.४ |
| ऑस्ट्रेलिया | ०० | ६६ | ५७ | ८.० | ३.० | ५.५ |
| कोलंबिया | १०० | ८१ | ५२ | ४.० | ८.६ | ६.३ |
| इराण | १०० | ६८ | ५१ | ७.४ | ५.७ | ६.६ |
| मेक्सिको | १०० | ६५ | ४९ | ८.३ | ५ २ | ६.८ |
| पेरू | १०० | ७१ | ४७ | ६.६ | ७.८ | ७.२ |
| टर्की | १०० | ७८ | ४१ | ४.८ | १२.२ | ८.६ |
| इस्त्राएल | १०० | ३९ | ३२ | १३.७ | ३.९ | १०.८ |
| चीन (तैवान) | १०० | ४५ | २८ | १४.९ | ८.८ | ११.९ |
| युराग्वे | १०० | ५९ | २१ | १०.० | १८.४ | १४.३ |
| ब्राझील | १०० | ४५ | १५ | १४.६ | २०.३ | १७.५ |
| अर्जेंटिना | १०० | ४४ | ९ | १५.३ | २७.६ | २१.७ |
| पॅरग्वे | १०० | १४ | ८ | ३३.० | ११.१ | २२.८ |
| चिली | १०० | १८ | ५ | २९.१ | २३.६ | २६.४ |
| बोलिव्हिया | १०० | ७ | १ | ४०.५ | ३४.६ | ३७.६ |

रुचकर जेवणाकरितां प्रसिद्ध
जनसेवा भोजनालय
लॉजिंग–बोर्डिंग
डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ पुणें ४.
(फोन नं. ७१२६)
प्रोप्रा. डी. जी. गोरे

बावची पूर्वभाग विविध कार्यकारी
सहकारी को. क्रेडिट सोसायटी लि.
[स्थापना : १९१५]
वर्ग अ
ही दिपवाळी व नवीन वर्ष, आमचे सभासद व शेतकरी बंधूंना भरभराटीचें जावो.
म. ग. तळप, सेक्रेटरी.
ज्ञा. सं. लाटणे, चेअरमन.

# साखरेच्या उत्पादनावर नियंत्रण

## कोणत्या कारखान्यांना सवलती ?

साखरेच्या उत्पादनांत वाढ झाल्यानें अलिकडील काळांत साखरेच्या शिल्लकी सांठ्यांत जी भर पडत आहे तिचा विचार करून साखरेच्या उत्पादनावर नियमन व नियंत्रण ठेवण्याबाबत भारत सरकारनें अलिकडेच काढलेल्या वटहुकुमानुसार केलेले नियम १ नोव्हेंबर, १९६१ पासून अंमलांत आले आहेत. साखर कारखान्यांनीं १९६०–६१ मध्यें तयार केलेल्या साखरेच्या ९० टक्के इतक्या प्रमाणांत साखर तयार करावी म्हणून साखरेच्या उत्पादनावर नियंत्रण घालण्याच्या उद्देशानें सामान्यत: हे नियम तयार करण्यांत आले असले तरी कांहीं खास प्रकारच्या कारखान्यांना संरक्षण मिळण्याचीहि तरतूद करण्यांत आलेली आहे. नवीन कारखाने, कांहींशी कमी उत्पादनशक्ति असलेले कारखाने, तसेंच उत्पादनांत वाढ करण्यासाठी परवाने दिलेले कारखाने, यांचा या खास कारखान्यांत अंतर्भाव होतो.

जे कारखाने यापूर्वीच स्थापन झालेले आहेत परंतु ज्यांनीं १९६१–६२ मध्यें उत्पादनांत वाढ करण्यासाठी कार्यक्रम आंखलेले नाहींत, अशा कारखान्यांना त्यांचें १९५९–६० किंवा १९६०–६१ या वर्षांपैकीं जें अधिक उत्पादन असेल त्याच्या ९० टक्के उत्पादन करतां येईल. तथापि या दोन्हीहि वर्षांत ज्या कारखान्यांचें उत्पादन ११,००० मेट्रिक टनांहून कमी असेल त्यांच्या बाबतींत, ह्या दोन वर्षांपैकीं ज्या वर्षांत जास्त उत्पादन झालें असेल तेवढें त्या कारखान्याला उत्पादन करतां येईल. १९५९–६० किंवा १९६०–६१ मध्यें ११,००० मेट्रिक टनांच्या २/३ पेक्षां कमी उत्पादन केलेल्या कारखान्यांच्या बाबतींत कोटा ठरवून दिला जाणार नाहीं. तसेंच या दोन वर्षांपैकीं कोणत्याहि वर्षांत ११,००० मेट्रिक टनांहून अधिक उत्पादन केलेल्या कारखान्यांचा कोटा त्यापेक्षां कमी असणार नाहीं.

नवीन ऊंस वर्षांत एखाद्या कारखान्यानें आपला विस्तार घडवून आणल्यास त्याच्या बाबतींत, लक्ष्य नियमांत दिलेल्या पद्धतीप्रमाणें व कोष्टकाप्रमाणें ठरविण्यांत येईल. ह्या पद्धतीप्रमाणें १९५९–६० किंवा १९६०–६१या वर्षांपैकीं ज्या वर्षांत अधिक उत्पादन झालें असेल त्याच्या ९० टक्के व शिवाय ऊंस गाळण्यासाठीं १९६१–६२ मध्यें करण्यांत आलेल्या व्यवस्थेनुसार जेवढें जादा उत्पादन होणार असेल त्याच्या ९० टक्के इतकें उत्पादन करतां येईल.

नवीन म्हणजे १९५८–५९ मध्यें किंवा त्यानंतर उत्पादनास प्रारंभ झालेल्या व सर्वसाधारण नेहमींच्या उत्पादनासाठीं लागणारा ऊंस गाळण्याची शक्ति नसलेल्या कारखान्यांच्या बाबतींत एक दुसरी पद्धति ठरविण्यांत आली आहे. ह्या पद्धतीनें उत्पादन लक्ष्य ठरवितांना, ह्या नव्या कारखान्याची परवानित उत्पादनशक्ति, ज्या राज्यांत हा कारखाना असेल त्या राज्यांतील १९६०–६१ मधील ऊंस गाळणीचा हंगाम व त्या कारखान्यांत १९६०–६१ मध्यें झालेलें उत्पादन या गोष्टी विचारांत घेण्यांत येतील.

उत्पादनास १९६१–६२ मध्यें प्रारंभ केलेल्या किंवा त्यापूर्वी चांचणीसाठी उत्पादन केलेल्या कारखान्यांच्या बाबतींत उत्पादन लक्ष्य ठरविण्यांत येणार नाहीं. कांहीं कारणास्तव १९६०–६१ मध्यें उत्पादन करणें शक्य न झालेल्या कारखान्यांच्या बाबतींतहि हाच नियम लागू राहील.

११


श्रीरघुनाथसमर्थ

दीपावलीच्या या मंगलदिनीं

आम्ही सदिच्छा, सद्भावनेच्या अमोल संपत्तीनें आपलें सहर्ष स्वागत करतों.

आपल्याला

ही दीपावली व नूतन वर्षकाल

आरोग्य, सुख, समृद्धीचें जावो

अशी शुभेच्छा व्यक्त करतों.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स

चेंबूर प्रायव्हेट लि.

चेंबूर–मुंबई ७१.



॥ वन्दे मातरम् ॥

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन

सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

स्थापना १९१४] ७३, बुधवार पेठ, पुणें शहर [फोन नं. ७१५६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ४,००,००० |
| वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. | २,५५,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,०४,९०० |
| ठेवी | रु. | १९,६६,००० |
| इन्व्हेस्टमेन्टस | रु. | १,६१,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २४,००,००० |

बँकेचीं वैशिष्ट्यें :—

(१) बँक गेलीं १० वर्षे 'अ' वर्गांत असून सभासदांना दरसाल सव्वा सहा टक्के डिव्हिडंड व १० ते १२ टक्के रिबेट देत आहे.
(२) बँकेंत सभासद व बिगर सभासद यांचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
(३) बँकेनें सहकारी तत्त्वांचा संपूर्ण अवलंब करून सभासदांना काटकसरीची संवय लावली आहे. काटकसर फंडाची रक्कम एकूण रु. १६,२५,००० पर्यंत जमा असून ती खेळत्या भांडवलाच्या ६५ टक्के आहे. दरसाल चार लाखांनीं ही रक्कम वाढत आहे.
(४) सन १९६०–६१ च्या नफ्यांतून बँकेनें रु. १३,५०२ इतकी रक्कम पुरग्रस्त सभासदांकरितां खर्च केली आहे.
(५) बँकेचे ठेवींचे दर आकर्षक आहेत.

ना. कृ. कुलकर्णी, मॅनेजर. कृ. गो. कुंभार, कार्याध्यक्ष. द. ल. मडगांवकर, अध्यक्ष.

# अँग्लो-इंडिअन लोकांचें ब्रिटनला देशांतर

भारतामधील अँग्लो-इंडिअन लोकांत भारत सोडून कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांत जाण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. त्यांतल्या-त्यांत ब्रिटनला जाऊन स्थायिक होणें ते अधिक पसंत करतात. दरसाल सुमारें १,००० ते २,००० अँग्लो-इंडिअन लोक भारत सोडत आहेत. ह्यांपैकीं बहुतेक लोक मद्रास, बंगलोर आणि कलकत्ता भागांतील असतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पुष्कळशा अँग्लो-इंडिअन लोकांनीं कोणत्या तरी कारणावरून देश सोडला. त्यांपैकी बरेच लोक सुखवस्तू होते. पण आतां जे लोक ब्रिटनमध्यें जात आहेत ते गरीब आणि बिनकसबी आहेत. ब्रिटिश सरकारनें त्यांना कांहीं सवलती देऊं केल्या असल्यामुळें ब्रिटनला जाणें त्यांनीं पसंत केलें आहे. ह्या लोकांपैकीं कोणाला भारतांत परत पाठविण्याचा प्रसंग येणारच नाहीं, असें ब्रिटिश सरकारला वाटत असावें. कारण, त्यांच्या परतीच्या प्रवासाबद्दल आर्थिक हमी न घेतां सरकार त्यांना ब्रिटनमध्यें येऊं देतें. शिवाय ब्रिटनमध्यें गेल्यावर प्रत्येक अँग्लो-इंडिअन इसमाला नोकरी मिळत आहे. हे लोक ब्रिटनमध्यें जाण्यास कां तयार होतात आणि तेथें गेल्यावर त्यांना समाधान वाटणारी परिस्थिति लाभते का, असे प्रश्न साहजिकच उत्पन्न होतात. ह्या संबंधीं बोलतांना ह्या लोकांचे एक पुढारी म्हणाले कीं भारतावर ब्रिटनचें राज्य असतांना अँग्लो-इंडिअन लोकांना चांगला मान मिळत असे. पण नंतर परिस्थिती बदलली व तिच्याशीं जमवून घेणें त्यांना जड जाऊं लागले. ब्रिटनमध्यें वेटरसारखीं कामें करणारे हे लोक हिंदुस्थानांत तशींच कामें करण्यास नाखुष असतात. त्यांची मानसिक अवस्था दाखविणारी ही वस्तुस्थिति आहे.

ब्रिटिश राजवट असतांना ह्या लोकांना कांहीं खास हक्क असत. त्यांच्याकरतां वेगळ्या शाळा असत आणि त्या शाळांना शिक्षणासाठी म्हणून खास मदत सरकारकडून मिळत असे. अनाथ मुलांना खास आर्थिक मदत देण्यांत येत असे. रेल्वे, टेलिग्राफ आणि कस्टम्स खात्यांत त्यांच्यासाठीं नोकरीच्या जागा राखून ठेवण्यांत येत असत. भारतीय सरकारनें ह्या विशिष्ट सवलती कांहीं काळापर्यंत चालू ठेवल्या होत्या. पण, आतां त्या रद्द करण्यांत आल्या आहेत. मद्रास राज्यानें मात्र १९६३ पर्यंत त्यांच्या शाळांना मिळणारी खास मदत चालू ठेवण्याचें कबूल केलें आहे. अँग्लो-इंडियन असोसिएशनच्या एका अधिकाऱ्याचे माहितीप्रमाणें हा समाज एकंदरीनें गरीब आहे. त्यामधील बऱ्या स्थितींतील लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी फार थोडे आहेत. असोसिएशनतर्फे उच्च शिक्षणासाठी देण्यांत येणाऱ्या मदतीचा लाभहि पूर्णपणें घेण्यांत येत नाहीं. ह्या समाजांतील लोकांचा कल यंत्रावरील कामें करण्याकडे अधिक आहे. ज्याला पुस्तकी विद्या असें म्हणतात, तिकडे त्यांचा कल फारसा नाहीं. हायस्कूलच्या शिक्षणाअखेर मिळणारे सर्टिफिकेट घेणारे विद्यार्थीहि फार कमी असतात आणि ह्या दाखल्याशिवाय सरकारी नोकरी मिळणें तर कठीण असते. त्यामुळें अँग्लो-इंडिअन समाजांत बेकारी फार आढळते. ब्रिटनमध्यें दर आठवड्याला ९ पौंड हे किमान वेतन आहे. त्यामुळें त्या देशाकडे ते आकर्षित होतात.

भारतापेक्षा ब्रिटनमधील किमान वेतन हें आकर्षक आहे हें खरें. निदान कागदावर तरी तें तसें भासतें. पण, खरा प्रश्न असा आहे कीं, ब्रिटनला जाणाऱ्या अँग्लो-इंडिअन माणसाला तेथील जीवन तुलनेनें अधिक सुखकारक वाटतें किंवा नाहीं? ह्या प्रश्नाला उत्तर देतांना असोसिएशनच्या एका स्थानिक अध्यक्षानें असें सांगितलें कीं ब्रिटनमध्यें ह्या लोकांना अधिक जोमानें कष्ट करावे लागतात. घरांतील स्वयंपाक व इतर कामेंहि त्यांनाच करावी लागतात. त्यामुळें पुष्कळसे लोक निराश होऊन भारतांत परतहि येतात.


**रिगल बेकरी**

डेक्कन जिमखाना, गोखले स्मारक चौक

आमचे येथें सँड्विच् व ब्राऊन ब्रेड वगैरे माल मिळेल.

प्रो. एस्. एस्. कुलकर्णी,

**दि इसलामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.**

स्थापना : १९२६ ] उरूण-इसलामपूर ( जि. सांगली )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. ३७,८०५ |
| रिझर्व्ह फंड | रु. १६,९६० |
| ठेवी | रु. १,५१,८६० |
| खेळतें भांडवल | रु. ३,८६,८७० |

डी. डी. लाटकर, मॅनेजर. एम. डी. पवार, चेअरमन.

[ स्थापना १९२१ ]

**गरगट्टी अँड सन्स**

शहापूर-बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो!

# तुमचा बँकांवर विश्वास आहे कीं नाहीं ?

## नसेल तर हें वाचा !

आजच्या शहाण्यासुरत्या जगांत सुद्धां अजून कित्येक लोकांचा बँकांवर विश्वास नसल्याचें आढळून येतें. म्हणून हे लोक आपली चलनी नोटांच्या रूपांतील बचत एखाद्या डब्यांत ठेवतात आणि तो काळजीपूर्वक दडवून ठेवतात. पुष्कळसे लोक अशी संचित संपत्ति मनांतहि येणार नाहीं अशा ठिकाणीं ठेवतात. त्यांतले कांहीं जण ती पुरूनहि ठेवतात. पण ह्याचा परिणाम कधीं कधीं फारच वाईट होतो. एकट्या अमेरिकेंत दरसाल ५०,००० लोक अशा वेगवेगळ्या रीतींनें दडवून ठेवलेल्या नोटा खराब झाल्यावर बदलून घेण्यासाठीं अमेरिकेच्या ट्रेझरीकडे जातात. इतर देशांतील राष्ट्रीय बँकांचाहि असाच अनुभव आहे. कांहीं वेळा नोटा बदलून घेण्यासाठीं आलेल्या लोकांची घोर निराशा होते. कारण, नोटेचा कांहीं भाग तरी शिल्लक असल्याशिवाय कोणतीच बँक फाटक्या अगर खराब नोटेबद्दल नुकसानभरपाई देत नाहीं. लंडनमधील एका वृद्धेचेंच हें उदाहरण पहा. ही स्त्री कित्येक वर्षें पैशाची बचत करीत होती. अशी बचत करतां करतां तिच्याजवळ २०० पौंडांची माया साठली. म्हातारीनें २०० पौंडांच्या नोटा ठेवण्यासाठीं जागा शोधली ती मात्र अजब. स्वयंपाकघरांतील वापरांत नसणाऱ्या शेगडींत तिनें ही गंगाजळी ठेवली. पण मग केव्हां तरी कडाक्याचा हिंवाळा आला आणि म्हातारीला नेहमीपेक्षां अधिक उबेची जरूर वाटूं लागली. ह्या वेळेपर्यंत शेगडींतील नोटांचें तिला पूर्ण विस्मरण झालें होतें. थंडीपासून बचाव करण्यासाठीं तिनें वापरांत नसलेली शेगडी पेटविली आणि मग व्हायचें तेंच झालें. २०० पौंडांच्या नोटांची राख झाली. बँकेकडून तिला कांहीही मिळूं शकलें नाहीं.

बाल्टीमोर शहरांतील एक अमेरिकन स्त्री मात्र अधिक सुदैवी ठरली. तिनेंहि वापरण्यांत नसलेल्या एका शेगडीमध्यें ८०० डॉलर्सच्या नोटा ठेवल्या होत्या. ह्या बाईचा मुलगा होता उधळ्या. त्याच्यापासून पुंजी सुरक्षित रहावी म्हणून ही बाई आपलीं बचत ठेवण्याची जागा बदलत असे. त्यामुळें नोटा कुठें ठेवल्या हें तिचें तिलाच आठवेनासें झालें. एकदां तिनें नेमकी नको असलेली शेगडी पेटविली. डॉलर्सच्या नोटा अर्थातच जळाल्या. पण त्यामधील प्रत्येक नोट राखेच्या पातळ पापुद्र्याच्या स्वरूपांत शाबूत होती. बाईनें ही राखेची चवड वॉशिंग्टनला ट्रेझरींत नेली. राखेंतून सुद्धां नोटांच्या निशाण्या दिसत असल्यामुळें बाईला सर्व नोटा बदलून मिळाल्या. ब्रिस्टल शहरांतील एका बाईनें ७५० पौंडांच्या नोटा विजेवर चालणाऱ्या धुलाईच्या यंत्रांत ठेवल्या होत्या. अनवधानानें बाईनें धुलाईचें यंत्र चालूं केलें. त्याबरोबर धुलाईच्या यंत्रांतील कपड्यांवर पौंडी नोटांचे शेंकडों तुकडे पडले. बाईनें ते गोळा केले व बँक ऑफ इंग्लंडच्या अधिकाऱ्यांकडे नेले. पण नोटांच्या कपट्यांचा उपयोग करून अवघ्या ५४ पौंडांच्या नोटा पुन्हां जुळविण्यांत तज्ज्ञांना यश आलें. ह्या नोटा बँकेनें अर्थातच बदलून दिल्या.

नोटा बदलून देणाऱ्या तज्ज्ञ लोकांना हें माहीत असते कीं कागदी नोटा खातां येतील पण पचवितां येणार नाहींत. एकदां एका शेतकऱ्यांच्या गाईनें त्याची नोट ठेवण्याची पिशवी पहातां पहातां गिळंकृत केली. गिळालेल्या नोटा गाय पचवूं शकणार नाहीं अशी माहिती त्याला बँकेच्या अधिकाऱ्यांनीं दिली. त्याबरोबर त्यानें त्या गाईला ठार केलें आणि तिच्या पोटांतलि नोटांची पिशवी हस्तगत केली. गाईची किंमत होती ७ पौंड; पण तिनें १० पौंडांच्या नोटा गिळलेल्या होत्या. त्यानें गाईच्या पोटांतून काढलेल्या खराब नोटा अगर त्यांचे तुकडे बँक ऑफ इंग्लंडकडे पाठविले. बँकेनें त्याला सर्व रक्कम नव्या नोटाच्या रूपांत दिली.

अग्निशिवाय इतर कारणांनीं खराब झालेल्या अगर अंशतः नष्ट झालेल्या चलनी नोटा बहुतेक देशांतून पुन्हां बदलून देण्यांत येतात. नोटेपैकी ६० टक्के भाग जर तज्ज्ञांना जुळवतां आला तर नोटेच्या मालकाला संपूर्ण रक्कम देण्यांत येते. ४० टक्क्यापेक्षा अधिक पण ६० टक्क्यापेक्षा कमी इतकाच भाग पुन्हां जुळवता आला तर नोटेच्या दर्शनीं किंमतीच्या निम्मी किंमतच देण्यांत येते. ह्या प्रथेला कारण आहे. नोटेचा कांहीं भाग जळलेला असला तर तो जळलेला भाग पुन्हां व्यवहारांत येण्याची शक्यता नसते. पण जी नोट नोट अंशतः फाटलेली असेल तिचा फाटलेला तुकडा पुन्हा व्यवहारांत येण्याची शक्यता असते. म्हणून एखाद्या कुत्र्यानें नोटेचा अर्धा भाग खाल्लेला असेल तर नोटेच्या मालकाला दर्शनी किंमतीच्या अर्धीच किंमत मिळूं शकेल. नोटांची खराबी अगर अंशतः नाश अनेक रीतींनें होऊं शकतो. नोटा ठेवलेलें भांडें जर जमिनींत पुरलेलें असेल आणि ते हवाबंद केलेलें नसेल तर नोटा बुरशीच्या भक्ष्यस्थानी पडतात. अमेरिकेंत मोरीच्या बरण्या नोटा लपवून ठेवण्यासाठी पुष्कळदा वापरण्यांत येतात. कांहीं लोक दोन्ही तोंडे बंद केलेल्या धातूच्या नळ्या वापरतात. पण, तरीहि नोटा सुरक्षित राहात नाहींत. बरण्यांचीं झांकणें अगर नळ्या गंजतात. मग त्यांना पडलेल्या भोकांतून ओल आंत शिरते व आपलें काम करते.

चलनी नोटांचे मोठे शत्रू म्हणजे उंदीर. उंदीर नोटा खात नाहींत. पण आपल्या बिळांत नेऊन ठेवतात. पांढऱ्या मुंग्या मात्र नोटा खातात. कारण त्या पचवून त्यांचें अन्नांत रूपांतर करण्याची किमया त्यांना साधलेली आहे. नोटांना वापरण्यांत येणारा कागद त्यांना खाद्य म्हणून अतिशय आवडतो. नोटांचे लहान लहान तुकडे जुळविण्याचे काम फार बिकट असते. त्या कामीं मोठी कुशलता आणि चिकाटी अंगीं असावी लागते. दिसायला थोडे चमत्कारिक आहे, पण हें काम करणारें अमेरिकेंतील सर्वच्या सर्व म्हणजे १२ तज्ज्ञ स्त्रिया आहेत ! जळलेल्या नोटा जुळविण्यासाठी त्या खास उपकरणें वापरतात. ज्या चलनी नोटा जळून पापुद्र्याच्या रूपांत जशाच्या तशा राहतात त्यांची जुळणी करणें अतिशय अवघड असते. पुष्कळदा ह्या जळलेल्या नोटांवर कागदावरील निशाण्या दिसत असतात. अमेरिकेंत जळालेल्या नोटेचा थोडासा भाग जरी शिल्लक असला तरी नोटेची पूर्ण किंमत देण्याची पद्धत आहे. मात्र त्यासाठी नोट कशी व केव्हां जळाली ह्याबद्दल शपथेवर जबाब दाखल करावा लागतो. नोटेचा ६० टक्क्यापेक्षा अधिक भाग सुरक्षित राहिला असल्यास शपथेवर जबाब दाखल करण्याचें कारण पडत नाहीं. एकंदरीनें काय, कष्टानें केलेली आपली बचत बँकेंतच ठेवणें चांगलें. त्या बचतीवर व्याज मिळण्याचीहि सोय असते.

### बुद्धाच्या जीवनावरील चित्रपटाविरुद्ध तक्रार

जपानमधील एका चित्रपट कंपनीनें बुद्धाच्या जीवनावर एक चित्रपट काढला आहे. ह्या चित्रपटाविरुद्ध सीलोन व ब्रह्मदेश ह्या दोन बुद्धधर्मीय देशांनीं जोराची तक्रार केली आहे. चित्रपटांत ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करण्यांत आला असून त्यामधील कांहीं प्रसंग हीन अभिरुचीचे द्योतक आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. चित्रपटाचें नांव 'बुद्धचरित' अथवा 'शाक्य' असें आहे. हॉलिवुडमध्यें काढण्यांत येणाऱ्या भव्य आणि दृष्टीला सुखविणाऱ्या पद्धतीवर चित्रपट घेण्यांत आला आहे. त्यावरून तो युरोपच्या व अमेरिकेच्या चित्रपटाच्या बाजारपेठेवर लक्ष ठेवून काढण्यांत आला असावा, असा तर्क करण्यांत येत आहे. हा चित्रपट प्रथम भारतांत काढण्यांत यावयाचा होता. परंतु भारत सरकारनें कथानकांतील कांहीं भागाला आक्षेप घेतला. हा भाग ऐतिहासिक सत्याला धरून नव्हता, असें म्हणतात. त्यानंतर चित्रपट निर्मात्यांनीं चित्रपट जपानमध्येंच काढला. त्यांत एका फिलिपिनो नटीला काम देण्यांत आलें. बुद्धाच्या पत्नीवर अजातशत्रूनें बलात्कार केल्याचें व नंतर तिनें आत्महत्या केल्याचें दृश्य चित्रपटांत दाखविण्यांत आलें आहे. ह्या दृश्यावर विशेष आक्षेप घेण्यांत आला आहे. बुद्धाला निर्वाणपदाची प्राप्ति झाल्यावर इंद्रमूर्ति भंग पावल्याचेंहि दाखविण्यांत आलें आहे. त्यामुळेंहि हिंदूंच्या भावना दुखवल्या जाण्याचा संभव आहे.

### दुधाचा पुरवठा दूषित होण्याचा संभव

गेल्या महिन्यांत रशियानें अणुबॉम्बच्या स्फोटांचे अनेक प्रयोग केले. त्यांत एक अणुबॉंब ५० मेगॅटन शक्तीचा होता. ह्या प्रचंड बॉंबच्या स्फोटामुळें ब्रिटनच्या दूधपुरवठ्यावर विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे. अणुस्फोटामुळें पसरणाऱ्या विषारी धूलीकणांमुळें दूध आरोग्याला धोका देणारें होण्याची शक्यता आहे. ब्रिटिश सरकारला कदाचित् दुधाची विक्री कित्येक आठवडे बंद करावी लागेल. रशियानें केलेला स्फोट ज्या उंचीवर केला असेल त्या मानानें ब्रिटनवरील दूषित धूलीकणांचा वर्षाव कमी-अधिक असेल. ब्रिटनमधील दुधाची व गवताची तपासणी करण्यांत येणार आहे. दूध दूषित ठरल्यास डब्यांतील दुधाचा अगर दुधाच्या भुकटीचा उपयोग करावा लागेल.

### अनाथ-अपंगांना मदत करण्याची योजना

संघटित उद्योगधंद्यांतून काम करणाऱ्या कामगारांना सामाजिक सुरक्षितता लाभावी म्हणून मध्यवर्ती सरकारनें व्यवस्था केली आहे. आतां समाजांतील ज्या लोकांना कांहीं कारणानें काम करतां येत नाहीं अगर जगण्याचें साधन नाहीं, अशा लोकांना कांहीं मर्यादेपर्यंत मदत करण्याची एक योजना भारत-सरकारच्या मजूर खात्यानें आंखली आहे. शरीरानें अपंग असलेले लोक, वृद्धत्वामुळें काम करण्यास असमर्थ असलेले लोक, ज्या स्त्रियांना अगर मुलांना योगक्षेमाचें कांहींच साधन नाहीं, अशांना ही मदत देण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

### कोयना योजनेसाठी कर्ज

कोयना जलविद्युत् योजनेसाठीं भारत-सरकारनें दुसऱ्या तिमाहीचा हप्ता म्हणून २२-२२ लाख रुपयांचें कर्ज महाराष्ट्र-सरकारला मंजूर केलें आहे. १९५४-५५ पासून ह्या योजनेसाठी मध्यवर्ती सरकारनें २८·७१ कोटी रुपये कर्जरूपानें दिलेले आहेत.

**आसाममधील खताचा कारखाना**—आसाममध्यें नहारकारिआ येथें उभारण्यांत येत असलेला सार्वजनिक मालकीच्या विभागांतील खताचा कारखाना १९६४ मध्यें सुरू होईल असा अंदाज आहे. कारखान्यासंबंधींचें प्राथमिक काम फर्टिलायझर कॉर्पोरेशनकडे सोंपविण्यांत आलें आहे. यंत्रसामग्रीसाठी मागविण्यांत आलेल्या टेंडर्सची तपासणी करण्याचें काम चालू आहे. नहारकारिआ येथील तेलाच्या खाणींतून उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक वायूचा कारखान्यासाठी उपयोग करून घेण्यांत येणार आहे.

**साखर कामगारांना बोनस**— श्रीरामपूर तालुक्यांतील महाराष्ट्र शुगर मिल्सच्या ३,००० कामगारांना १९५९-६० सालचा बोनस म्हणून प्रत्येकी पावणेसहा महिन्यांच्या मूळच्या पगाराइतकी रक्कम मिळणार आहे. ह्याबाबतच्या करारावर साखर कामगार संघटना व कारखान्याचे चालक ह्यांच्यातर्फे सह्या झाल्या आहेत. कराराप्रमाणें कारखान्यानें कामगारांना दिवाळीपूर्वी ५ लाख रुपये द्यावयाचे आहेत.

**मिश्र पोलादाचें उत्पादन**—हत्यारासाठी लागणारे व मिश्र पोलाद् निर्माण करण्यासाठी खाजगी मालकीचे आणखी कारखाने काढण्यांत येणार आहेत. भारत सरकारनें असें १,२०,००० टन पोलाद् निर्माण करण्यासाठी परवाने दिले आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारताला अशा प्रकारचें २,००,००० टन पोलाद् लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**शहरांतील जमिनीच्या वाढत्या किंमती**—नगररचनेच्या कामासाठी लागणारी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शहरांतील जमिनी ताब्यांत घेण्यासंबंधींचा एक कायदा मध्यवर्ती सरकारनें तयार केला आहे. शहरांतील जमिनीच्या वाढत्या किंमतींना आळा घालण्यासाठी तो तयार करण्यांत आला आहे. अशा कायद्याची जरूरी नियोजन समितीनें सुचविली आहे.

मून फोटो स्टुडिओ
जोगेश्वरीसमोर, पुणें २.



॥ श्री ॥

# दी बृहन्महाराष्ट्र

## शुगर सिंडिकेट लिमिटेड,

५८०, सदाशिव पेठ, लक्ष्मी पथ, पुणें २.

***************

मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळी ।
ते योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ श्रीज्ञानेश्वरी

***********

**महाराष्ट्रांतील जनतेचें सहाय्य व सहकार्य, कै. श्री. आगाशे यांचे अविरत श्रम व संचालक मंडळाचा दक्ष कारभार, यामुळें सिंडिकेटचा साखर कारखाना यशस्वी झाला आहे.**

**********

कंपनीनें मागील वर्षीं ऑर्डिनरी शेअरवर २० टक्के ( करपात्र ) डिव्हिडंड दिलें आहे.

*********

## नवीन हंगाम दसऱ्याचे शुभमुहुर्तावर सुरू झाला आहे.

*******

**आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.**

संचालक मंडळ

**श्री. शं. ल. लिमये,** बी. एस्सी., एल्एल्. बी.
अध्यक्ष.

श्री. भ. ग. माडुले, बी. एस्सी., एलएल्. बी., वकील.
श्री. ग. ह. सबनीस
श्री. श्री. र. केसकर, वकील.
श्री. वि. कृ. साठे, बी. ए. ( टिळक ), माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य.

श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो. न. जोशी, बी. एससी.
श्री. रा. मा. देशमुख, एम्. ए., एल्एल्. बी. (कॅंट), बार-अॅट-लॉ, एम्. पी.

श्री. के. व्यं. चांफेकर,
बी. ई., ए. एम्. आय. ई.,
मॅनेजर

‘ रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल ’

आजच्या विध्वंसावरच उद्याचें सुंदर, डौलदार, पुणें उभें राहणार आहे.

आमचे सर्व पूरग्रस्त ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक या सर्वांना
आमच्या शुभेच्छा आम्ही वरील निश्चयासह पाठवीत आहों.

पुण्याच्या पुनर्वसनाच्या कार्यांत ५०,००० रुपये देऊन आपला वांटा उचलणारी,

# पुणें सेंट्रल

को-ऑपरेटिव्ह बँक, लि., पुणें-२.

ठेवी : सव्वातीन कोटी
स्वस्त व सुरक्षित ठेवघरें

खेळतें भांडवल : साडेसहा कोटी
३० शाखांचें कार्यक्षम जाळें

शि. म. काळे, एम्. एल्. ए.,
अध्यक्ष.

वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.

यंदाच्या दीपावलीनिमित्त—

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड

आपल्या गोड शुभेच्छा व्यक्त करीत आहे

महाराष्ट्र साखर कारखानदारीच्या क्षेत्रांतील—

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि. ची वैशिष्ट्यपूर्ण प्रगति

– या अभिमानास्पद प्रगतीचे कांहीं ठळक विशेष –

( १ ) १९३४ सालीं साखरेच्या उत्पादनास सुरुवात.
( २ ) १९४४ मध्यें डिस्टिलरी सुरू होऊन स्पिरिटच्या उत्पादनास सुरुवात झाली.
( ३ ) १९६०-६१ सालीं उत्पादनशक्तींत महाराष्ट्रांत अग्रेसर झालेल्या या कारखान्यानें साखर उत्पादनाचा उच्चांक गांठला.

– आणि आतां –

— प्रगतीचा नवा टप्पा —

कोल्हापुरांत ॲसेटिक ॲसिडच्या नवीन कारखान्याची लवकरच उभारणी होत आहे.

अद्ययावत् सुधारणा, कलात्मक रचना व अद्ययावत् यंत्रसामग्री हें आमच्या कारखान्याचें आगळें वैशिष्ट्य आहे.

मॅनेजिंग एजंटस्
दि युनायटेड एजन्सीज प्रा. लि.,
कोल्हापूर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ‘ दुर्गाधिवास ’, ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.